# الهندوسية في ميزان تعاليمها الأصلية والعقل والفطرة السليمة

# हिंदू धर्म त्याच्या मूळ शिकवणी, तर्क आणि सामान्य ज्ञानाच्या समतोलात

प्रश्नोत्तरे

डॉ. हैसम तलअत

सुरु अल्लाहच्या नावाने, सर्व स्तुती अल्लाहसाठीच आहे. अल्लाहची कृपा आणि शांती असो अल्लाहचे संदेष्टा, त्याचे कुटुंब, साथीदार आणि त्याच्याशी एकनिष्ठ असलेल्यांवर. तद्नंतर:

हिंदू धर्म हा एक धर्म असू शकतो, परंतु अधिक अचूक व्याख्येमध्ये तो आहे: जीवनाचा एक मार्ग.

हिंदू धर्माचे अनुयायी जगातील लोकसंख्येच्या सुमारे १५% आहेत तरी त्याचे अनुयायी एक अब्ज आणि २०० दशलक्ष लोकांपेक्षा जास्त आहेत.

हिंदू धर्मात काळानुरूप फार बदल झाला आहे...

वेदांच्या युगानंतर हिंदू धर्म मानसिक, वैज्ञानिक आणि जन्मजात समस्यांनी भरलेला आहे, त्यापैकी काही आपण या पुस्तकात पाहू.

होय!

हिंदू धर्म मूळ वेदांच्या (हिंदू धर्माचे मूळ स्त्रोत) शिकवणीपासून झपाट्याने दूर गेला आहे आणि लोकांनी, संन्यासी आणि भगवद्गीतेच्या शिकवणींचे पालन केले आहे.

भगवद्गीता आणि गूढ तंत्र.

या छोट्याशा पुस्तकात मी सध्याच्या हिंदू धर्माचा तर्क, आधुनिक विज्ञान, तर्कशास्त्र आणि वेदांच्या मूळ शिकवणीची चाचणी घेण्याचा प्रयत्न करेन जे आजपर्यंत हिंदूंच्या हातात आहेत आणि मला खात्री आहे की सत्याचे जे अवशेष वेदांमध्ये आहेत आणि हिंदूच्या प्रवृत्तीत आहेत ते हिंदूंना शांततेच्या मार्गे सत्य धर्माकडे नेण्यासाठी पुरेसे आहेत.

वेद : हे हिंदू धर्मातील सर्वात पवित्र ग्रंथ आहेत.

प्रकृती : मनुष्याच्या अस्तित्वाचा उद्देश आणि हेतू विचारात घेण्याची प्रेरणा ही प्रकृति आहे. आणि या प्रेरनेचा हेतू अल्लाहवर विश्वास ठेवणे आणि त्याने ठरवून दिलेल्या नियमांनुसार त्याची प्रार्थना करणे होय.

सत्य धर्म : वेदांमध्ये समाविष्ट सत्याचे ते अवशेष आहेत जे अल्लाहकडून सर्व जगासाठी प्राप्त झालेले आहेत आणि हाच प्रकृतीचा आवाज आहे.

आणि हा उपनिषदाचा तोच संदेश आहे जो अल्लाहच्या एकेश्वरवादाच्या प्रतीकांबद्दल मार्गदर्शन करतो.

या छोट्याशा पुस्तकात मी वेदकालीन हिंदू धर्म आणि आजचा हिंदू धर्म यांची साधी तुलना करण्याचा प्रयत्न करतो!

तरी हिंदू धर्मामध्ये खूप बदल झालेआहेत ...

तो वेदांमधील शुद्ध सुस्पष्ट एकेश्वरवादी शिकवणींच्या अवशेषांपासून खूप दूर गेलो आहे.आजच्या हिंदू धर्मात तुम्हाला अस्तित्वाच्या एकात्मतेवर विश्वास आढळतो जिथे निर्माता सृष्टीशी एकरूप आहे, जिथे सृष्टी स्वतःच निर्माता

बनते. हा आश्चर्यकारक विश्वास केवळ वेदांच्या स्पष्ट शिकवणींचाच विरोध करत नाही तर तर्कशुद्ध अंतर्ज्ञानांना देखील विरोध करतो. हे हिंदुवांनो ! हे कसे शक्य आहे की देव प्रत्येक गोष्टीत वास करतो, मग तुम्ही, विविध विधी आणि पद्धतींनी त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करता, आणि तो मुळात तुमच्या आताच आहे?

ही एक उघड मानसिक समस्या नाही का?

मग अस्तित्त्वाच्या एकात्मतेतील विश्वासाने सत्याची सापेक्षता सांगण्याची आवश्यकता भासते, कारण सर्व धर्म जे मूर्ती किंवा दगडांची पूजा करतात ते पुढे देवाचीच पूजा करतात, कारण या श्रद्धेनुसार देव ही मूर्ती आणि दगडच आहे, तथा देव प्रत्येक गोष्टीत आहे आणि तोच सर्वकाही आहे.

सत्याचा हा सापेक्षवाद अर्थ आणि मूल्य नष्ट करतो, जसे मी पुस्तकात स्पष्ट करेन.

वरील गोष्टींमध्ये हे सुद्धा जोडा की वेद स्पष्टपणे सृष्टीपासून वेगळ्या देवतेवर विश्वास ठेवण्यास सांगतात, कारण ही सर्व निर्मिति अल्लाहचीच निर्मिति आहे आणि अल्लाह त्याच्या निर्मितिमध्ये राहण्यास योग्य नाही.

वेद, विशेषत: ऋग्वेदात म्हटले आहे : "हे अल्लाह ! सूर्य आणि जग दोघेही तुला घेरू शकत नाहीत किंवा वेढू शकत नाही."[1]

---

[1] http://stholistic.com/prayer/hindu/hol_hindu-samsara-and-karma.htm

हा वेदांचा स्पष्ट पुरावा आहे की अल्लाह त्याच्या सृष्टीपासून स्वतंत्र असल्यामुळे अस्तित्वाच्या एकतेवरचा विश्वास चुकीचा आहे.

सध्याच्या हिंदू धर्मात, तुम्हाला पुनर्जन्मावर विश्वास आढळतो, जिथे मनुष्यांच्या आत्मा मृत्यूनंतर इतर प्राण्यांमध्ये हस्तांतरित होतात आणि नवीन सजीवांमध्ये पुनर्जन्म घेतात, जसे प्रत्येक मनुष्याला याआधी कुण्या सजीवामध्ये जीवन लाभले होते इत्यादी. या श्रद्धेमुळे अनेक समस्या निर्माण होतात, जसेकी आत्म्यांचे हस्तांतरण जर खरे असेल, तर लहान मुले प्रौढांसारखी मानसिक क्षमता घेऊन का जन्माला येत नाही?[1]

शिवाय, आत्म्यांच्या स्थलांतराचा सिद्धांत पुनरावृत्ती झालेल्या जन्मांच्या क्रमावर आधारित आहे, तर हे कसे शक्य आहे, कारण समकालीन विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की जीवनाची एक सुरुवात असते आणि पृथ्वीची सुद्धा एक सुरुवात आहे आणि ती अनंतकालीन नाही.

मग, जर आत्म्यांचा पुनर्जन्म खरा असेल, तर असे मानले पाहिजे की सजीवांची संख्या हि नेहमी 'एकच" असते, कारण ते एकमेकांमध्ये पुनर्जन्म घेतलेले आहेत, आणि आज कोणीही असे म्हणत नाही.

---

(ही साइट बौद्ध जर्नलची आहे जी बौद्ध धर्म आणि त्याच्या विधींवर ज्ञान संशोधन प्रदान करते).

[1] Cogan, Robert. (1998), Critical Thinking: Step by Step, University Press of America, pp. 202–203.

महत्त्वाचे म्हणजे, वेद आत्म्यांच्या हस्तांतराबाबत काहीच बोलत नाहीत, इथपर्यंत की हिंदू विद्वान श्री स्त्यकाम आणि दिलंकर म्हणतात: "पुनर्जन्माचा सिद्धांत वेदांमध्ये नाही, आणि मी असे म्हणणाऱ्यांना आव्हान देतो."[1]

दिलंकरांच्या शब्दांच्या अचूकतेचा सर्वोत्तम पुरावा म्हणजे हिंदू "शारदा श्राद्ध" नावाचा एक प्राचीन धार्मिक विधी करतात आणि या विधींचा उद्देश "मृतांच्या आत्म्यांना शांत देणे" हे आहे.

जर मग ते मृतांच्या आत्मांना शांती प्रदान करण्याचे प्रयत्न करीत असतील तर आत्मांच्या हस्तांतरणाचे काय अर्थ?

सध्याच्या हिंदू धर्माच्या मान्यतांपैकी एक मान्यता आहे: "कर्म", अर्थात मनुष्य त्याच्या पूर्वीच्या कर्मानुसार जन्माला येतो, म्हणून जो कोणी भ्रष्ट असेल तो दुसऱ्या नवीन जीवनात खालच्या वर्गात किंवा मोठ्या दुःखात जन्म घेईल.

त्यानुसार, हिंदू पीडित व्यक्तीकडे मागील जन्मात केलेल्या पापांचे परिणाम म्हणून पाहतात आणि हा विकृत गैरसमज संपूर्ण जीवन भ्रष्ट करतो, कारण यामुळे मानवतेची कोणतीही सेवा होत नाही, उलट हे मानले जाते की लोकांवर आलेली संकटे ही मागील जन्मात केलेल्या गुन्ह्याची नैसर्गिक शिक्षा आहे. हा मागासलेपणा, अन्याय आणि वर्गीकरणाचा एक प्रकारचा समेट आहे.

[1] अवागमन, पृ. १०४, पुस्तकातून उद्धृत: हिंदूंना इस्लामचे आमंत्रण, पृष्ठ ९९.

पण सर्वात मोठी अडचण अशी आहे: वेदांमध्ये कर्माची ही शिकवण आहे तरी कुठे?

वेद सांगतात की स्वर्ग आणि नरक आहे जो देव लोकांना त्यांच्या कर्मानुसार देतो, इतर जीवनात पुनर्जन्म नाही.

ऋग्वेद म्हणतो: "ज्या ठिकाणी सर्व प्रकारचे आनंद आणि सुखे साठलेली आहेत, आणि जिथं जिवाच्या इच्छेनुसार तू देतोस त्या ठिकाणी मला अमर कर."[1]

तसेच सध्याच्या हिंदू धर्मातील मूलभूत मान्यतांपैकी एक: पुनरावृत्ती होणारे जन्म आणि आत्म्यांचे स्थलांतर यापासून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करणे आणि "मोक्ष" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टप्प्यावर पोहोचणे आहे ज्यामध्ये मनुष्य ईश्वरी आत्म्याशी एकरूप होतो, परंतु ही कल्पना पूर्णपणे मानवीय अस्तित्वाप्रती निराशावादी दृष्टिकोनावर आधारित आहे. म्हणून अस्तित्वाचे ध्येय अस्तित्वातून बाहेर पडण्याचा प्रयत्न बनतो!

ही कल्पना समाजासाठी घातक आहे, कारण ती माणसाला भीतीची जाणीव करून देत नाही.त्याने कितीही घृणास्पद कृत्ये केली तरी तो पुन्हा जन्म घेईल आणि एक दिवस येणाऱ्या जन्मात नक्कीच त्याचा उद्धार होईल.

हे वेदांच्या शिकवणीच्या पूर्णपणे विरुद्ध आहे, ज्यात असे नमूद केले आहे की छळणाऱ्या आणि पापींना एका विशिष्ट

---

[1] ऋग्वेद, मंडळ: ९, सूक्त: ११३, मंत्र: ९-११.

ठिकाणी शिक्षा दिली जाते, जसे ऋग्वेद म्हणते: "एक अतिशय खोल जागा, ज्यामध्ये पापींसाठी खोल तळ आहे."[1]

मग पुनर्जन्माच्या कल्पनेसाठी काय वाव आहे?

सध्याच्या हिंदू धर्माच्या सर्वात प्रमुख वैज्ञानिक समस्या ज्या आहेत त्यामध्ये : विश्वाच्या उत्पत्तीच्या स्वरूपाबद्दल त्याचे मत हे एक आहे. वर्तमान हिंदू धर्म असे गृहीत धरतो की विश्व विरघळते आणि नंतर तयार होते आणि पुढे अनंतापर्यंत हे चक्र चालू असते, आधुनिक विज्ञानाच्या विरुद्ध हि एक विचित्र वैज्ञानिक त्रुटी आहे.

हे सर्वज्ञात आहे की आधुनिक विज्ञान सांगतो की या विश्वाची एक परिपूर्ण सुरुवात होती आणि त्यापूर्वी इतर कोणतेही विश्व नव्हते.

हे विश्व वैज्ञानिकदृष्ट्या नवखे आहे... पूर्वीच्या कोणत्याही उदाहरणापेक्षा सर्जनशील आहे.

तसे, हीच शिकवण वेदांमध्ये आढळते. वेदांमध्ये अचानक प्रकट झालेले ऐहिक जीवन तसेच परलोक आहे. हिंदू धर्माच्या उत्तरार्धात आलेल्या तत्त्वज्ञानांमध्ये, जसे पुराण, जगाची पुनरावृत्ती आणि शाश्वतता दिसून येते.

आजच्या हिंदू धर्माने वेदांच्या सिद्धांताचा विरोध केला आहे, तो आधुनिक विज्ञानाच्या आणि वेदांनी सांगितलेले सत्य मानणाऱ्या इस्लामच्या विरोधात आहे.

---

[1] ऋग्वेद, मंडळ: ४, सूक्त: ५, मंत्र: ५.

अल्लाहने पवित्र कुरआनमध्ये म्हटल्याप्रमाणे मुस्लिमांचा विश्वास आहे की हे विश्व पूर्वोदाहरणाशिवाय प्रकट झाले, जसे अल्लाहने त्याच्या पुस्तकात म्हटले आहे “तो (अल्लाह) स्वर्ग आणि पृथ्वीचा निर्माता आहे, तरी जेव्हा तो एखादी गोष्ट करू इच्छितो तेव्हा तो फक्त त्याला म्हणतो, हो आणि ती होऊन जाते." (अल-बकरा 117).

इस्लामच्या संकल्पनेत विश्व सर्जनशील आहे, म्हणजे: ते कोणत्याही पूर्वोदाहरणाशिवाय प्रकट झाले आहे.

हे जिथपर्यंत विज्ञान पोहोचले आहे, तेच १४०० वर्षांपूर्वी मेंढ्या पाळणाऱ्या एका इसमाने ज्यांना मुहम्मद बिन अब्दुल्ला, अल्लाहचे दूत आणि इस्लामचे प्रेषित म्हणतात सांगितले होते, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो).

या पुस्तकात, मी हिंदू धर्माला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांवर चर्चा करणार आहे आणि त्याचवेळी जगासाठी इस्लामी दृष्टीकोण, जीवन, बक्षीस आणि शिक्षा तसेच आपल्या अस्तित्वाचा उद्देश मांडणार आहे, जो वेदांच्या अवशेषांशी आणि अंतःप्रेरणेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

मी समजावून सांगतो की मानवी जीवन कसे जगावे हे जाणून घेण्याच्या गरजेचे उत्तर देण्यासाठी आणि अंतःप्रेरणा, तर्क आणि विज्ञान यांच्याशी सुसंगत अशा पद्धतीने मानवी अस्तित्वाचा अर्थ आणि मानवी अस्तित्वाच्या उद्देशाचे विश्लेषण करण्यासाठी इस्लाम हे सर्वात अचूक, विश्वासार्ह आणि शहाणपणाचे मॉडेल आहे.

हे पुस्तक इस्लाम धर्माच्या अचूकतेसाठी काही पुरावे प्रदान करते, तसेच वेदांमध्ये या धर्माविषयी आलेल्या खुसखबरी हि दाखवते.तरी वेदांनी इस्लाम आणि प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांची खुशखबर दिली आहे आणि हिंदूंना त्यांच्यावर इमान राखण्याचे आवाहन केले आहे.

इस्लाम हा पृथ्वीवरील दुसऱ्या धर्मांसारखा धर्म नाही, तर तो एकमेव एकेश्वरवादी धर्म आहे ज्यासाठी अल्लाहने सर्व संदेष्ट्यांना पाठवले. तरी सर्व संदेष्टे लोकांना एकेश्वरवादाची हाक देऊन गेले. परंतु आज इस्लामशिवाय कोणताही धर्म या शुद्ध एकेश्वरवादावर राहिलेला नाही. इतर सर्व धर्मांमध्ये कमी-जास्त बहुदेववाद दाखल झाला आहे.

अल्लाह मानवाकडून इस्लामशिवाय दुसरा धर्म स्वीकारत नाही, अल्लाहने आपल्या पुस्तकामध्ये फर्माविले आहे {आणि जो कोणी इस्लामशिवाय दुसरा धर्म पसन्त करतो, तो त्याच्याकडून स्वीकारला जाणार नाही, आणि तो परलोकात तोटा सोसणाऱ्यांपैकी असेल. (सुरह आले इम्रान : ८५)

इस्लामच तो धर्म आहे ज्याच्या शिकवणी घेऊन अल्लाहने सर्व पैगंबर आणि दूत पाठवले.

इस्लामचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे: याचा अर्थच अल्लाहला शरण जाणे आणि केवळ अल्लाहचीच उपासना करणे तसेच सध्याच्या हिंदू धर्माप्रमाणे मूर्ती किंवा इतर वस्तुंमध्ये देवाचे कोणतेही अवतार नाकारणे होय.

मग एखादी व्यक्ती खऱ्या अर्थात अल्लाहला मानणारी कशी बनते, तसेच इस्लामचे अर्थ आणि इस्लामची आवश्यकता यांचे स्पष्टीकरण देऊन पुस्तकाचा शेवट होतो.

तर चला अल्लाहच्या बर्कतीच्या आशेवर पुस्तकाचे शुभारंभ करूया..

### १- हिंदू धर्म म्हणजे काय?

हिंदू धर्म: हा एक धर्म आहे, किंबहुना त्यास "एक जीवनपद्धती" म्हणणे जास्त योग्य ठरेन. यामध्ये अनेक विधी, संस्कार, उपासना, पवित्र पुस्तके आणि लौकिक आणि अस्तित्वात्मक संकल्पना समाविष्ट आहेत.[1]

हिंदू धर्म अनेक शतकांच्या कालावधीत विविध धर्मांच्या मान्यता स्वीकारून तयार झाला आहे. तो वैविध्यपूर्ण आणि कधीकधी परस्परविरोधी विश्वास प्रणालीला परवानगी देतो आणि आजच्या हिंदू धर्माला त्याबद्दल काही गैर वाटत नाही. कारण आजच्या हिंदू धर्माला एकच पंथ किंवा एकच संदर्भ नाही किंवा न्यायासाठी अनिवार्य मजकूरही नाही.

जरी वेद हे हिंदूंचे सर्वांत पवित्र ग्रंथ असले तरी, हिंदू, जसे आपण या पुस्तकात दाखवणार आहोत, ते त्यांच्यापेक्षा चमत्कारिकरित्या वेगळे झाले आहेत. वेदांच्या विरोधात, हिंदू धर्म विविध धारणा आणि भिन्न कल्पना स्वीकारतो ज्यांचा पहिल्या वैदिक युगाशी काहीही संबंध नाही.

---

[1] हिंदू धर्माचा अभ्यास, अरविंद शर्मा (विना अनुवादित).

हिंदू धर्माचा संपूर्ण उद्देश दुःखातून मुक्त होणे आहे. त्यांच्या संकल्पनेतील दुःखापासून मुक्ती कशी मिळवायची हे आम्ही नंतर समजावून सांगू.

आणि त्यांनी मोक्षाच्या वेदांच्या सिद्धांताचे कसे उल्लंघन केले, ज्यामध्ये सत्याचे अनेक अवशेष आहेत.[1]

### २- या गुंतागुंतीतून हा धर्म कसा निर्माण झाला?

हिंदुत्व म्हणजे भारतीयत्व : भारत अर्थात एक राज्य, हवामान, इतिहास, विविधतेचे गुंफण आणि परंपरा.

हा जवळजवळ भारतापर्यन्त मर्यादित एक धर्म आहे, कारण जगातील ९५% हिंदू येथेच आढळून येतात.[2]

पहिल्या वेदांच्या आधारावर हिंदू धर्माचा उदय झाला, परंतु दुर्दैवाने ते तत्त्वज्ञान, विश्वास, पुस्तके आणि शतकानुशतके तयार झालेल्या धारणांसह मिसळले गेले. आणि वेदोत्तर हिंदू धर्माने संन्यासी, गूढ तंत्र आणि भगवद्गीता यांच्या शिकवणींचे पालन केले.

ई.स.पू. १५०० पासून ते ५०० इसवीपर्यंत, यातील अनेक धारणा आणि तत्त्वज्ञानांचा वेदांशी संघर्ष झाला आणि वेदांवर त्यांचा वर्चस्व इतका पसरला की आज या धारणा आणि तत्त्वज्ञानाशिवाय आपल्याला पृष्ठभागावर काहीच दिसत नाही.

---

1 हिंदू धर्म: सिद्धांत आणि सराव, जीनिन डी. फाऊलर (विना अनुवादित).

2 http://www.pewforum.org/files/2012/12/globalReligion-tables.pdf

### ३ - हिंदूंची श्रद्धा नक्की काय आहे?

आजचा हिंदू धर्म ही एक अशी श्रद्धा आहे जी मोठ्या संख्येने देवांवर विश्वास ठेवते, हिंदू धर्मात असंख्य देव आहेत आणि तरीही हिंदू एका परमेश्वरावर विश्वास ठेवतात.

त्या सर्व अवतारांमध्ये ज्यांना ते पवित्र मानतात देव राहतो अशी त्यांची कल्पना आहे.

येथे, काहीजण अशी कल्पना करू शकतात की: हिंदूंचा विश्वास तर एकाच देवावर आहे, ह्या मूर्त्या आणि अवतार देवाच्या प्रतिमा आहेत आणि असा विचार मूर्तिपूजा नाही!

परन्तु हे अत्यंत चुकीचे आहे!

मूर्त्या या एकाच देवाच्या प्रतिमा आहेत हा विश्वास संपूर्ण मानवी इतिहासातील पैगंबरांच्या शिकवणी आणि वेदांच्या शिकवणींच्या विरोधात असलेल्या मूर्तिपूजक विश्वासाचा उगम आहे.

पैगंबरांचा आणि वेदांच्या शिकवणींचा विरोध करणारे सर्व बहुदेववादी देवावर (अल्लाहवर) विश्वास ठेवत होते, परंतु त्यांनी मूर्तींना देवाचे प्रतिनिधित्व दिले. तरी जोपर्यंत हे बहुदेववादी आपल्या मूर्त्या सोडणार नाही त्यांचा देवावर (अल्लाहवर) आणि त्याच्या एक होण्यावर तसेच त्याच्या पैगंबरांवर व वेदांवर विश्वास, अविश्वासच सिद्ध होणार आहे.

कारण वेदांमध्ये मुर्त्या बाळगण्यास, त्यांची जवळीक साधण्यास किंवा त्यांना पवित्र मानण्यास स्पष्ट आणि निःसंदिग्ध मनाई आहे.

वेद म्हणतात: "जो देवा (अल्लाह) शिवाय इतर गोष्टींची पूजा करतो, तो अंधारात गर्क होईल आणि तो कायमस्वरूपी अग्नीच्या यातना चाखेल."[1]

आज हिंदू धर्मात भरलेल्या या मूर्ती जो कोणी ग्रहण करेल, वेदानुसार तो नरकात कायमचा राहील.

वेद असेही म्हणतात: "सर्वांचा मालक, अदृश्य जाणणारा, ज्याला इतर देवतांच्या मदतीची गरज नाही, तोच खरा देव (अल्लाह) आहे जो मनुष्याच्या पूजेला पात्र आहे. आणि जे अल्लाहशिवाय इतर देवांना मानतात, ते वाईट आहेत, त्यांना नेहमीच मोठी आणि भयंकर संकटे येतात."[2]

भगवद्गीतेमध्ये म्हटले आहे: "जे देवांची पूजा करतात त्यांना देवता प्राप्त होतात, जे पूर्वजांची पूजा करतात त्यांना पितर मिळतात, जे सैतानाची पूजा करतात त्यांना सैतान प्राप्त होतो आणि जे माझी (अल्लाहची) पूजा करतात ते मला प्राप्त करतात."[3]

हे मजकूर आणि इतर अनेक पुरावे हिंदूंना एकेश्वरवाद ग्रहण करण्याचे आणि या मूर्तींचा त्याग करण्याचे आवाहन करतात.

---

1 यजुर्वेद, सूक्त : ४०, मंत्र : ९.

2 ऋग्वेद, मंडळ १, सोक्त : ७, मंत्र : ९.

3 भगवद्गीता, ९-२५.

अगदी महर्षी दयानंद सरस्वती म्हणतात: "वेदांमध्ये असे एक अक्षर सुद्धा सापडत नाही जे दगड किंवा इतर गोष्टींपासून बनवलेल्या मूर्तींची पूजा सुचविते."

पण नंतरच्या टप्प्यावर आलेल्या खोट्या शिकवणींमुळे हिंदूंनी वेदांमधील एकेश्वरवादाचा सिद्धांत सोडून दिला.

अल्लाहने त्याचा प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) वर उतरविले दिव्य कुरआन सुद्धा पुष्टी करते की जे मूर्तींची पूजा करतात ते दावा करतात की ते एका देवावर विश्वास ठेवतात, पण या मूर्तिपूजेमुळे ते अल्लाहचे अविश्वासूच ठरतात.

सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र कुराणमध्ये म्हटले आहे

{وَلَئِن سَأَلْتَهُم مَّنْ خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ لَيَقُولُنَّ اللَّـهُ}

{आणि जर तुम्ही त्यांना विचाराल की आकाश आणि पृथ्वी कोणी निर्माण केली, तर नक्की ते हेच म्हणतील कि अल्लाहने} (सुरह जुमर : ३८)

सर्वशक्तिमान अल्लाह म्हणाला

{وَلَئِن سَأَلْتَهُم مَّنْ خَلَقَهُمْ لَيَقُولُنَّ اللَّـهُ}

{आणि जर तुम्ही त्यांना विचाराल की तुम्हाला कोणी निर्माण केले तर नक्की ते हेच म्हणतील कि अल्लाहने} (सुरह अल-जुखरुफ : ८७)

कुरआन आणि वेदांच्या ठाम मतानुसार या मूर्ती ग्रहण केल्यामुळे एखादी व्यक्ती देवावर अविश्वासू ठरते.

सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र कुराणमध्ये म्हटले आहे

{إِنَّمَا تَعْبُدُونَ مِن دُونِ اللَّـهِ أَوْثَانًا وَتَخْلُقُونَ إِفْكًا ۚ إِنَّ الَّذِينَ تَعْبُدُونَ مِن دُونِ اللَّـهِ لَا يَمْلِكُونَ لَكُمْ رِزْقًا فَابْتَغُوا عِندَ اللَّـهِ الرِّزْقَ وَاعْبُدُوهُ وَاشْكُرُوا لَهُ ۖ إِلَيْهِ تُرْجَعُونَ}

तुम्ही अल्लाहला सोडून ज्यांची पूजा करीत आहात ते केवळ पुतळे आहेत आणि तुम्ही एक असत्य घडवीत आहात, वास्तविकतः अल्लाहशिवाय ज्यांची तुम्ही उपासना करता ते तुम्हाला कोणतीही उपजीविका देण्याची ऐपत बाळगत नाहीत. अल्लाहजवळ उपजीविका मागा आणि त्याचीच भक्ती करा आणि त्याच्याप्रती कृतज्ञता दाखवा आणि त्याच्याकडेच तुम्ही परतविले जाणार आहात. सुरह अल् अनकबूत आयत १७

तरी अल्लाहकडे उपजीविका मागा, आणि त्याचीच उपासना करा, कारण तोच आहे ज्याच्याकडे आपण सर्व परत जाऊ.

ईश्वराच्या एकेश्वरवादासाठी आणि सर्व प्रकारच्या बहुदेववादाला नकार देण्यासाठी आज पृथ्वीवर इस्लामशिवाय काहीही शिल्लक नाही.

म्हणून प्रत्येक हिंदूने इस्लामच्या विषयात अंतर्दृष्टीने आणि असहिष्णुता न ठेवता पहावे आणि या धर्मातील एकेश्वरवादाच्या सिद्धांतावर विचार मंथन केले पाहिजे तसेच विचार केला पाहिजे कि त्याची अंतरात्मा आणि वेदाच्या शिकवणी आपसात जुळतात किंवा नाही।

अल्लाहने मानवजातीकडे पाठवलेल्या सर्व संदेष्ट्यांचा संदेश : अल्लाहला पूजे अर्चनेमध्ये एक मानण्यात समावलेले

आहे. आणि हे, सर्व मूर्तींपासून अलिप्त होऊन, संदेष्ट्यांनी आणलेल्या (शिकवणी) आणि त्यांचे सर्वशेवट मोहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांच्या शिकवणी अंगीकारून शक्य आहे.

### ४- अनेकोनेक मूर्तींसह एका देवाचे प्रतिनिधित्व करण्याची कल्पना हिंदू धर्मात कशी आली?

वेदांच्या युगानंतरच्या सध्याच्या हिंदू धर्माची प्रमुख समस्या ही आहे की एका देवाच्या अनेक गुणधर्मांना अनेक आत्मे आवश्यक असतात, म्हणजे: अनेक देवता आवश्यक असतात.

ते असे गृहीत धरतात की प्रत्येक दैवी गुणधर्मासाठी त्या गुणधर्माचे प्रतिनिधित्व करणारी एक मूर्ती असते.

तरी त्यांचा निर्माता झाला:

ब्रह्मा: जो विश्वाचा निर्माता आहे.

आणि विष्णु: तो विश्वाचा रक्षक आहे.

शिव: तो विश्वाचा नाश करणारा आहे.[1]

हे एक गृहितक आहे जे कारण आणि अंतःप्रेरणेच्या स्वयंसिद्धांच्या विरोधाभास करते आणि वेदांमध्ये आढळणाऱ्या शिकवणींचा विरोध करते, कारण गुणांच्या विविधतेमुळे व्यक्तित्वाचा विविध होण्याची आवश्यकता नसते.

तरी एकच व्यक्ती बुद्धिमान, बलवान आणि सभ्य असू शकतो.

---

[1] ईस्टर्न फिलॉसॉफी अँड रिलिजनचा एनसायक्लोपीडिया, स्टीफन शूमाकर, पृष्ठ ३९७.

गुणांच्या विविधतेमुळे तो मनुष्य विविध व्यक्ती होणे गरजेचे नाही.

एकच हुशार माणूस खंबीर आणि लेखक ही असू शकतो .

अल्लाहसाठी सर्वोत्कृष्ठ उदाहरण आहे

वेद सुद्धा या वस्तुस्थितीची पुष्टी करतात, जसे ऋग्वेदात नमूद केले आहे: "याला इंद्र, मित्र आणि वायू असे म्हणतात आणि तेच मातरिश्वा आहे. ज्ञानी लोक एकाच देवाचा वेगवेगळ्या नावांनी उल्लेख करतात."[1]

आणि वेदांमध्ये भगवंता (अल्लाह) ची नावे व गुणधर्म असलेले ग्रंथ पुष्कळ आहेत.

तरी सर्व नावे आणि संज्ञा एकाच व्यक्तित्वासाठी निर्धारित आहेत.

याच शिकवणी पूर्व वेदांमध्ये होत्या आणि इस्लामिक विश्वास सुद्धा यावरच आधारित आहे. इस्लाममध्ये एकमेव अल्लाह साठी सर्वात सुंदर नावे आणि उदात्त गुणधर्म आहेत. सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो ..

{وَإِلَـٰهُكُمْ إِلَـٰهٌ وَاحِدٌ ۖ لَّا إِلَـٰهَ إِلَّا هُوَ الرَّحْمَـٰنُ الرَّحِيمُ}

आणि तुमचा पूज्य एकच देव आहे. त्याच्याशिवाय दुसरा देव नाही, तो परम दयाळू, परम कृपाळू आहे. (१६३) सूरह अल-बकरा

तरी अल्लाह, तोच परम दयाळू आणि परम कृपाळू आहे.

---

[1] ऋग्वेद: मंडळ: १, सोक्त: १६४, मंत्र: ४६.

सर्वशक्तिमान अल्लाह पवित्र कुराण मध्ये म्हणतो

{هُوَ اللَّـهُ الَّذِي لَا إِلَـٰهَ إِلَّا هُوَ الْمَلِكُ الْقُدُّوسُ السَّلَامُ الْمُؤْمِنُ الْمُهَيْمِنُ الْعَزِيزُ الْجَبَّارُ الْمُتَكَبِّرُ ۚ سُبْحَانَ اللَّـهِ عَمَّا يُشْرِكُونَ}

तो अल्लाहच आहे ज्याच्या व्यतिरिक्त कोणी उपास्य नाही, तो बादशाह आहे अत्यंत पवित्र, सर्वस्वी शांती, अभयदान करणारा, प्रभावशाली, सर्वांवर प्रभावी आपली आज्ञा बळाने लागू करणारा आणि मोठाच बनून राहणारा, पवित्र आहे अल्लाह त्या अनेकेश्वरवादापासून जे हे लोक करीत आहेत. (२३) सुरह अल-हशर.

तरी अल्लाह साठी नाम आणि गुणांची बहुलता सिद्ध आहे.

वेगवेगळ्या मूर्तींच्या प्रतिमांमध्ये देवाच्या गुणधर्मांना मूर्त रूप देण्याच्या कल्पनेतील दुसरी समस्या ही आहे की या मुर्तीपुजनामध्ये विश्वासाठी कोणतीही सुरक्षा नाही.

म्हणून, पवित्र कुरआन अल्लाह सोबत या सर्व मूर्तिपूजक संकल्पना नाकारतो आणि हे सिद्ध करतो की अल्लाहसोबत अन्य पूज्य मानणे संपूर्ण विश्वाची असुरक्षितता ओढवून घेणे आहे.

{لَوْ كَانَ فِيهِمَا آلِهَةٌ إِلَّا اللَّـهُ لَفَسَدَتَا ۚ فَسُبْحَانَ اللَّـهِ رَبِّ الْعَرْشِ عَمَّا يَصِفُونَ}

जर त्या दोघा (आकाश व पृथ्वी) त एका अल्लाहशिवाय दुसरे उपास्य असते तर दोहोंची व्यवस्था बिघडून गेली असती. तरी पवित्र आहे राजसिंहासनाचा स्वामी अल्लाह त्या गोष्टीपासून जे हे लोक रचीत आहेत. (२२) सूरह अल-आंबिया.

जर अल्लाह बरोबर दुसरा पूज्य असता तर आकाश आणि पृथ्वी भ्रष्ट झाली असती.

{وَلَوِ اتَّبَعَ الْحَقُّ أَهْوَاءَهُمْ لَفَسَدَتِ السَّمَاوَاتُ وَالْأَرْضُ وَمَن فِيهِنَّ ۚ بَلْ أَتَيْنَاهُم بِذِكْرِهِمْ فَهُمْ عَن ذِكْرِهِم مُّعْرِضُونَ}

आणि सत्य जर का त्यांच्या इच्छे प्रमाणे चालले असते तर आकाश व पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानची सर्व व्यवस्था कोलमडली असती - नव्हे, तर आम्ही त्यांचा स्वतःचाच उल्लेख त्यांच्यापाशी आणला आहे आणि ते आपल्या उल्लेखापासून तोंड फिरवीत आहेत.

(सूरह अल-मोमिनून : ७१)

### ५- निर्माता आणि निर्माण यांच्यातील नातेसंबंधाकडे हिंदू कसे पाहतात?

आज बहुतेक हिंदू अस्तित्वाच्या एकात्मतेवर विश्वास ठेवतात, जिथे निर्माता सृष्टीशी एकरूप आहे, सध्याच्या हिंदू धर्मात देव त्याच्या निर्माणामध्ये वास करतो, जेणेकरून निर्माता आणि निर्माण एकच गोष्ट होऊन जातात.[1]

हे विज्ञान, कारण, निरीक्षण आणि वेद यांच्या सर्वात सोप्या स्वयंसिद्धांच्या विरुद्ध आहे.

अस्तित्वाच्या एकतेच्या तत्त्वज्ञानामध्ये अनेक वैज्ञानिक आणि मानसिक प्रश्न उद्भवतात, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:

---

1 एनसायक्लोपीडिया ऑफ हिंदूइझम, जोन्स, रायन आणि जेम्स डी., पृष्ठ ३१५ (विनाअनुवादित).

पहिला प्रश्न : त्यांच्या मते प्रत्येक गोष्टीत देव असतो, मग “मोक्ष” म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवाशी एकरूप होण्यासाठी कर्मकांड करण्याचा अर्थ काय?

स्वतः तुमच्यातच असलेल्या एखाद्या गोष्टीपर्यंत तुम्ही कसे पोहोचाल... तुम्ही त्यात उपस्थित आहात आणि ती तुमच्यामध्ये आहे?

दुसरा प्रश्न : त्यांच्या, अस्तित्वाच्या एकतेच्या संकल्पनेनुसार चुका आणि पापे हे स्वतःच देवता आहेत, कारण त्यांच्या जवळ देवता स्वतःच चूक आहे, पाप आहे, तोच व्यभिचार आहे आणि तोच हत्या आहे, मग जेव्हा तो प्रत्येक गोष्टीत उपस्थित आहे, आणि तोच सर्व गोष्टींचे सार आहे; मग चुका आणि पापांपासून मुक्ती कशासाठी?

ते ऐहिक इच्छा आणि वासनांपासून दूर राहण्यास इतके उत्सुक का आहेत?

अस्तित्वाच्या एकात्मतेमध्ये पाप नाही का?

जग हेच देव नव्हे काय?

या सध्याच्या हिंदू संकल्पनेनुसार चांगले कार्य करण्याच्या तळमळीला काहीही किंमत नाही.

पण प्रत्येकाला चांगले करण्याची तळमळ असते आणि ते कर्तव्य आहे हे माहीत असते, बरोबर ना?

चांगले करण्याची तळमळ ही शुद्ध अंतःप्रेरणेच्या आवाहनाला प्रतिसाद आहे. हा अस्तित्वाच्या एकतेच्या तत्त्वज्ञानाच्या त्रुटीचा थेट जन्मजात पुरावा आहे.

तिसरा प्रश्न : अस्तित्त्वाच्या एकतेवर विश्वास ठेवण्यासाठी सत्याच्या सापेक्षतेचे विधान आवश्यक आहे, कारण सर्व धर्म जे मूर्ती किंवा दगडांची पूजा करतात त्यांच्यासाठी ती देवाचीच पूजा आहे, कारण त्यांच्या धारणेत देवच मूर्ती आहे आणि तोच दगड आहे. म्हणून देव प्रत्येक गोष्टीत आहे आणि तोच सर्व काही आहे.

सत्याचा हा सापेक्षतावाद अर्थ आणि मूल्य गमावण्यास बाध्य करतो, कारण सर्वकाही योग्य होऊन जातो !

वरील गोष्टींमध्ये हे सुद्धा जोडा: अस्तित्वाच्या एकतेवर विश्वास या प्रश्नाचे ही उत्तर देत नाही की : जग कोठून आले?

त्यामुळे निर्माणकर्ता हाच निर्माण आहे हे गृहितक तर्कशुद्ध नाही, कारण यामध्ये एखाद्या वस्तूचे वास्तवात येणे त्याच वस्तूच्या वास्तवावर अवलंबून आहे. आणि हे एक विचित्र विरोधाभास आहे, आणि तार्किकदृष्ट्या अशक्य.

आणि हे एक विचित्र विरोधाभास आहे, आणि तार्किकदृष्ट्या अशक्य.

एखादी गोष्ट स्वतःच्या अस्तित्वात येण्याचे कारण कसे असू शकते, जेव्हा अद्याप ती स्वतः अस्तित्वात आलेलीच नाही?

चौथा प्रश्न: हे देखील वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे की सर्व काही असलेले विश्व हे निर्माण झालेले आहे आणि हे सर्व तज्ज्ञ लोकांनी सिद्ध केले आहे.

तरी ब्रह्मांड हे त्याच्या सर्व शक्ती, पदार्थ, स्थान आणि वेळ यासह एक निर्माण आहे...

अनंत पुराव्यासह हे सिद्ध झाले आहे की विश्वाची एक सुरुवात आहे, वैज्ञानिकदृष्ट्या: येथे कोणतेही विश्व नव्हते आणि नंतर विश्व प्रकट झाले.

मग जोपर्यंत ब्रह्मांड नाही तोपर्यंत अस्तित्वाची एकात्मता कशी म्हणायची?

जर अस्तित्वाची एकता खरी असेल, तर त्याला जगाचे अनंतकाळ किंवा किमान पदार्थाचे शाश्वतत्व आवश्यक आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, समकालीन हिंदू हे भौतिक जग शाश्वत आहे असे म्हणण्याचा आग्रह धरतात, कारण हि एक आवश्यक बाब आहे जे अस्तित्वाच्या एकतेचे समर्थन करते.

हिंदू विद्वान विवेकानंद म्हणतात: "काळ स्थानावर प्रभाव टाकत नाही आणि स्थान नष्टही होत नाही."[1]

समकालीन हिंदूंना भौतिक जगाच्या शाश्वततेच्या संकल्पनेला रेटून नेण्यासाठी अस्तित्वाच्या एकात्मतेच्या कल्पनेशी सहमत व्हावे लागले.

आणि त्यांनी त्यात प्रवेश केला नसता, आणि ते सुरुवातीला अस्तित्वाच्या एकतेवर विश्वास ठेवतही नव्हते, परंतु सैतान आदामच्या पुत्राकडे चोहोबाजूने येतो आणि जेव्हा कधी त्याला संधी मिळेल पैगम्बरांच्या धर्मापासून मनुष्याला विचलित करतो.

---

[1] हिंदू धर्म, विवेकानंद, p61-63. डॉ. इब्राहिम बिन अब्दुल गफूर यांनी पीएचडी मिळवण्यासाठी लिहिलेले "हिंदूंना इस्लामचे आमंत्रण", इलाफ प्रकाशन आणि वितरण गृह, पृ. १२२. या पुस्तकातून उद्धृत

सर्वशक्तिमान अल्लाहने हदीस कुदसीमध्ये म्हटले आहे :

"إنِّي خَلَقْتُ عِبَادِي حُنَفَاءَ كُلَّهُمْ، وإنَّهُمْ أَتَتْهُمُ الشَّيَاطِينُ فَاجْتَالَتْهُمْ عن دِينِهِمْ، وَحَرَّمَتْ عليهم ما أَحْلَلْتُ لهمْ، وَأَمَرَتْهُمْ أَنْ يُشْرِكُوا بي ما لَمْ أُنْزِلْ به سُلْطَانًا".[16]

"मी माझ्या सर्व सेवकांना एकच लक्ष्य वाले निर्माण केले होते, नंतर सैतान त्यांच्याकडे आले आणि त्यांना त्यांच्या धर्मापासून दूर नेले. आणि त्यांच्यासाठी मी जे वैध केले होते ते त्यांना वर्जित केले. आणि त्यांना हुकूम दिला की माझ्यासोबत त्यांना सामील करा ज्याबाबतीत मी कोणतेही मार्गदर्शन दिले नाही."[1]

सर्व मानव अल्लाहच्या एकेश्वरवादावर एकमत होते, पण सैतान त्यांच्याकडे आला आणि त्यांना या अश्रध्येच्या मोहात पाडले.

आणि पैगंबर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो), म्हणाले: "सैतान मानवाच्या वाटेत (त्याला मार्गभ्रष्ट करण्यासाठी) त्याच्या मार्गात बसलेला आहे."[2]

सैतान मनुष्यासाठी प्रलोभनाचा प्रत्येक मार्ग शोधतो, आणि पैगम्बरांनी आणलेल्या एकेश्वरवाद आणि उपासनेच्या शिकवणी शिवाय वाचण्याचा कोणताही मार्ग नाही.

वेदांनी स्पष्ट केले आहे की जग हे निर्मित आहे आणि त्याला सुरुवात आहे.

---

1 सहिह मुस्लिम, ह: २८६५.

2 सहीह सुनन अन-नसाई, हदीस : ३१३४

आणि निश्चितच अल्लाह त्याच्या निर्मितीपासून स्वतंत्र आहे त्यांच्यामध्ये विघटन पावत नाही.

तरी अस्तित्वाच्या एकतेवर विश्वास ठेवण्याच्या या टप्प्यावर हिंदू कसे पोहोचले?

ऋग्वेद म्हणतो: "हे अल्लाह! सूर्य आणि जग हे दोघेही तुला घेरून तुला सामावून घेऊ शकत नाहीत."[1]

वेदांमधून हा स्पष्ट पुरावा आहे की अस्तित्वाच्या एकतेवर विश्वास चुकीचा आहे. अल्लाह त्याच्या निर्मितीपासून स्वतंत्र आहे आणि सूर्य आणि चंद्र हे देव नाहीत.

ऋग्वेदात असेही म्हटले आहे: "अल्लाह तोच आहे ज्याने रात्र आणि दिवस निर्माण केले आणि तोच जगाचा आणि त्यात जे काही आहे त्याचा मालक आहे आणि त्यानेच सूर्य आणि चंद्र, पृथ्वी आणि आकाश निर्माण केले."[2]

अस्तित्वाची एकता आणि भौतिक जगाची शाश्वतता नाकारण्यात कोणती शिकवण यापेक्षा स्पष्ट असेल?

आणि यजुर्वेद म्हणते: "तो, तो आहे ज्याने त्याच्या आधी काहीही निर्माण झाले नाही, आणि तो (च) आपला निर्माता आणि मालक आहे, आणि त्याला सर्वकाही माहित आहे."[3]

अल्लाह च्या आधी काहीही निर्माण झालेले नाही. तो सर्वप्रथम आहे आणि जग अल्लाहने निर्माण केले आहे आणि

---

1 ऋग्वेद, मंडळ : १, सोक्त: १०, मंत्र: ८.

2 ऋग्वेद, मंडळ : १०, सोक्त: १९०, मंत्र: २-३.

3 यजुर्वेद, सोक्त: ३२, मंत्र: १३.

ते शाश्वत नाही: "तो महान आहे, पृथ्वी आणि आकाशाचा मालक आहे."[1]

आणि कुराण त्याच स्पष्ट सत्याची पुष्टी करतो की अल्लाहने त्याचा प्रेषित मुहम्मद बिन अब्दुल्ला यांच्याकडे १४०० वर्षांहून अधिक वर्षांपूर्वी ईश्वरीय संदेश पाठविला की निसंदेह अल्लाह त्याच्या निर्मितीपासून वेगळा आहे, त्याच्या सिंहासनावर (अर्शवर) विराजमान आहे. तो निर्मितीमध्ये विघटित होत नाही आणि निर्माण त्याच्यामध्ये विरघळत नाही.

सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो

{اللَّـهُ الَّذِي خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا فِي سِتَّةِ أَيَّامٍ ثُمَّ اسْتَوَىٰ عَلَى الْعَرْشِ ۖ مَا لَكُم مِّن دُونِهِ مِن وَلِيٍّ وَلَا شَفِيعٍ ۚ أَفَلَا تَتَذَكَّرُونَ}

अल्लाह तो (च) आहे, ज्याने आकाशांना आणि जमिनीला आणि जे काही त्यांच्या दरम्यान आहे, सर्व काही सहा दिवसांत निर्माण केले, मग अर्श (ईशसिंहासना) वर विराजमान झाला. तुमच्याकरिता, त्याच्याखेरीज कोणीही मदत करणारा, शिफारस करणारा नाही, मग काय तरीही तुम्ही समजून घेत नाही? (सुरह सजदा ४ )

पैगंबरांच्या श्रद्धेचा उगम, त्यांच्या धर्माचा आणि त्यांच्या नियमाचा उगम असा आहे की निश्चितच अल्लाह, एकच निर्माता, एकमेव, प्रकट आहे, म्हणजेच त्याच्या निर्मितीपासून तो वेगळा आहे, त्यांच्यामध्ये सम्मिलीत नाही!

---

[1] ऋग्वेद, मंडळ: १, सोक्त: १००, मंत्र: १.

अस्तित्वाच्या एकतेच्या तत्त्वज्ञानातील पाचवी समस्या अशी आहे की: हे तत्त्वज्ञान सर्वात महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर देत नाही की : जग कोठून आले?

या तत्त्वज्ञानानुसार जग कसे प्रकट झाले?

मग: हे तत्त्वज्ञान सर्वप्रथम कोणी मांडले?

आणि त्याचा पुरावा काय?

आधुनिक विज्ञान, तर्क, वेद आणि पैगंबरांच्या धर्माच्या विरोधात असलेल्या या विश्वासाभोवती अनेक प्रश्न आणि अनेक समस्या आहेत.

### ६- हिंदू धर्म जीवन आणि मृत्यूकडे कसा बघतो?

आजचा हिंदू धर्म पुनर्जन्माच्या कल्पनेवर आणि पिढीच्या अंतहीन चक्रावर आधारित आहे: हिंदू संकल्पनेत आपण पुनर्जन्मांच्या गोल चक्रात फिरत असतो, तरी प्रत्येक जन्माला येणार त्या आधी जगामध्ये एका अस्तित्वात होता आणि त्याचा आत्मा त्याच्या मृत्यूनंतर दुसऱ्या अस्तित्वात स्थलांतर होतो. इत्यादी, आणि यालाच हिंदू धर्मात संसार या शब्दाने ओळखले जाते. आत्म्यांच्या स्थलांतराच्या या संकल्पनेत अनेक बौद्धिक आणि वैज्ञानिक समस्या आहेत, जसे :[1]

पहिली समस्या: याला "टर्टुलियनचा आक्षेप" म्हणून ओळखले जाते. तो म्हणतो: जर पुनर्जन्म स्थलांतर खरे असेल,

---

[1] कोगन, रॉबर्ट. (1998), क्रिटिकल थिंकिंग: स्टेप बाय स्टेप, युनिव्हर्सिटी प्रेस ऑफ अमेरिका, पीपी. 202-203.

तर लहान मुले प्रौढांसारखीच मानसिक क्षमता घेऊन कशी जन्माला येऊ शकत नाहीत?[1]

दुसरा प्रश्न : जर आत्म्यांचा पुनर्जन्म खरा होता, तर असे गृहीत धरायला हवे की सजीवांची संख्या निश्चित आहे, कारण ते जन्माच्या चक्रात एकमेकांमध्ये पुनर्जन्म घेतात आणि एकही शहाणा माणूस आज हे म्हणत नाही!

तरी हे सिद्ध होते की एक काळ असा होता की ज्या काळात पृथ्वी अस्तित्वात नव्हती, आणि एक काळ असा होता जेव्हा पृथ्वीवर कोणतेही सजीव नव्हते आणि एक काळ असा होता जेव्हा सजीव एवढ्या संख्येत नव्हते, खूप कमी होते, आणि नंतर काळाबरोबर वाढत गेले आणि यावर सुद्धा आज मानवजातीचे एकमत आहे.

एक काळ असा होता की लोक आजच्या तुलनेत अत्यंत कमी होते.

तरी मानवांची संख्या निश्चित नसण्यावर एकमत आहे, मग आत्म्यांचा पुनर्जन्म निश्चित चक्रात कसा होतो?

तिसरा प्रश्न : त्या तत्त्वज्ञानाला मानणाऱ्यांशिवाय भूतकाळातील - मागील जन्म - ज्यामध्ये तो होता - आठवणारा कोणी का नाही?

---

[1] रुथ सीमेन्सच्या केसचे वर्णन: https://www.ncbi.nlm.nih.gov/pubmed/12116612 (डॉ. फौझ कुर्दीच्या वेबसाइटवरील लेखांनुसार).

रुथ सिमन्स नावाची एक अमेरिकन स्त्री होती तिने ती ब्राइडी मर्फी नावाच्या दुसऱ्या महिलेचा पुनर्जन्म असल्याचा दावा केला. रुथ सीमेन्सला

आयर्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकात ब्राइडी मर्फी असतानाचा तिचा भूतकाळ आठवू लागला. संशोधकांनी रुथ सीमेन्सच्या जीवनाची तपासणी केल्यानंतर, असे आढळून आले की तिला ब्राइडी मर्फी नावाचा आयर्लंडचा जुना शेजारी होता. तिने ब्रॅडीच्या आयर्लंडच्या आठवणी घेतल्या आणि त्या स्वतःच्या असल्याचा दावा करून स्वतःला ब्राइडी घोषित केले.[1]

पुनर्जन्म हा एक भ्रम आणि कल्पना आहे आणि ते विज्ञान आणि ज्ञानाच्या सर्वात सोप्या स्वयंसिद्धांच्या विरोधी आहे.

पॉल एडवर्ड्स, एनसायक्लोपीडिया ऑफ फिलॉसॉफीचे मुख्य संपादक आणि न्यूयॉर्क विद्यापीठातील प्राध्यापक म्हणतात, "पुनर्जन्म ही केवळ एक कल्पनारम्य गोष्ट आहे जी आधुनिक विज्ञानाला विरोध करते."[2]

जर एखादी व्यक्ती मरण पावली तर ती दुसऱ्या जन्मात जन्म घेत नाही.

1 Edwards, Paul. (2001), Reincarnation: A Critical Examination, Prometheus Books

2 युवराज कृष्ण: भारतीय विद्या भवन, १९९७.

वेद ही नेहमी या वस्तुस्थितीवर जोर देतात, आणि वेदांमध्ये पुनर्जन्म किंवा संसाराविषयी कोणतीही चर्चा नाही.[1]

अगदी हिंदू विद्वान श्री स्त्यकाम विद्यालंकार म्हणतात: "पुनर्जन्माची शिकवण वेदांमध्ये नाही आणि जे म्हणतात त्यांना मी आव्हान देतो."[2]

विद्यालंकारांच्या शब्दांच्या अचूकतेचा उत्तम पुरावा म्हणजे, हिंदू "श्राद्ध" नावाचा एक धार्मिक विधी करतात ज्याचा उद्देश मृतांच्या आत्म्याला शांत करणे आहे. मग जेव्हा हिंदू मृतांच्या आत्म्यांना शांती पोहचवितात तर आत्म्यांच्या पुनर्जन्माचा काय अर्थ उरतो?

मग जेव्हा हिंदू मृतांच्या आत्म्यांना शांती पोहचवितात तर आत्म्यांच्या पुनर्जन्माचा काय अर्थ उरतो?

आणि अल्लाहने आपल्या प्रेषित मुहम्मदांवर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) प्रकट केलेला दिव्य कुराण पुनर्जन्माचा दावा करणाऱ्यांना प्रत्युत्तर देतो ...

{إِنْ هِيَ إِلَّا حَيَاتُنَا الدُّنْيَا نَمُوتُ وَنَحْيَا وَمَا نَحْنُ بِمَبْعُوثِينَ}

जीवन तर केवळ याच जगाचे जीवन आहे, ज्यात आम्ही मरत जगत असतो हे नव्हे की आम्हाला (मेल्यानंतर) पुन्हा उठविले जाईल. अल मुअमिनून (३७)

---

1 आवागमन, पृ. १०४, पुस्तकातून उद्‌धृत: हिंदूंना इस्लामचे आमंत्रण, डॉ. इब्राहिम बिन अब्दुल गफूर यांनी डॉक्टरेट मिळवण्यासाठी लिहिलेले, एलाफ पब्लिशिंग अँड डिस्ट्रीब्युशन हाऊस, पृ. ९९.

2 अल-कुर्तुबी आपल्या तफसीरमध्ये म्हणतात : ही आयत त्यांना नकार देते जे असा दावा करतात की सृष्टीमध्ये असे जीव आहेत जे मृत्यूनंतर पुनरुत्थान होण्यापूर्वी परत येतात.

अल्लाहने त्यांच्या या दाव्याला उत्तर देत कुराणमध्ये सांगितले

{أَلَمْ يَرَوْا كَمْ أَهْلَكْنَا قَبْلَهُم مِّنَ الْقُرُونِ أَنَّهُمْ إِلَيْهِمْ لَا يَرْجِعُونَ}

काय त्यांनी नाही पाहिले की त्यांच्यापूर्वी कित्येक जनसमूहांना आम्ही नष्ट करून टाकले की ते यांच्याकडे परतणार नाहीत. सूरह यासीन. (३१)

तरी जो मरण पावला त्याला या जगात परत येणे किंवा दुसरे जन्म मिळणे शक्य नाही.[1]

अल्लाहने सांगितले

{لَا يَذُوقُونَ فِيهَا الْمَوْتَ إِلَّا الْمَوْتَةَ الْأُولَىٰ}

तिथे ते पहिल्या मृत्युखेरीज (जो जगात घडला) मृत्युचा स्वाद चाखणार नाहीत सुरह अल-दुखान (५६)

तर ही मुस्लिमांची श्रद्धा आहे आणि ही (च) वेदांची श्रद्धा आहे, जी दुर्दैवाने हिंदूंनी सोडून दिली.

पुनर्जन्माची चौथी समस्या: त्यांचा असा दावा आहे की परमात्म्याशी ऐक्य किंवा मोक्ष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अवस्थेपर्यंत पोहोचणे, या पुनर्जन्मपासून मुक्ती मिळवणे हे त्यांचे ध्येय आहे आणि याचा अर्थ असा होतो की वारंवार जन्म घेणे हे यातना आहे.

पण पुनर्जन्म म्हणजे यातना आहे असे कोण म्हणतो?

लोकांना जर तुम्ही विचारले की तुम्हाला पुन्हा जन्म घ्यायचा आहे आणि पुन्हा जीवनाचा अनुभव घ्यायचा आहे, तर

---

[1] https://en.wikipedia.org/wiki/Rape_in_India

त्यांच्यापैकी बरेच लोक होय उत्तर देण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.

शिवाय, अस्तितवाला वेदना समजण्याचा हा निराशावादी दृष्टिकोन खोटा आहे. हे अस्तित्व खूप चांगले आहे आणि त्यामध्ये असंख्य फायदे आहेत.

खरे म्हणजे अस्तित्वात नसलेल्या गोष्टीपासून मोक्ष म्हणजे भ्रामक मोक्ष!

पाचवी समस्या: पुनर्जन्माचे तत्त्वज्ञान कोणताही गुन्हा किंवा अवज्ञा करण्याबद्दल निष्काळजीकडे ढकलते, कारण ते गुन्ह्याचे औचित्य सिद्ध करते, कारण मनुष्य निश्चितपणे दूसरे जन्म घेणार आहेच तर त्याने या जन्माचा आनंद घेतला पाहिजे जो तो जगत आहे.

हे कोणत्याही गुन्ह्याशी सामंजस्याचे प्रतिनिधित्व करते आणि कदाचित याच कारणास्तव जगातील सर्वाधिक गुन्हेगारी दरांपैकी भारत एक आहे, विशेषत: बलात्कारामध्ये.[1]

भारतात सामूहिक बलात्काराच्या गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

---

[1] https://www.ncbi.nlm.nih.gov/pubmed/8931651
(यूएस नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी रिसर्चची वेबसाइट, जी एक सरकारी वेबसाइट आहे आणि जगातील सर्वात मोठ्या वैद्यकीय संशोधन संदर्भांपैकी एक आहे).

## ७ - हिंदूंमध्ये पुनर्जन्म आणि आत्म्याचे स्थलांतर या कल्पनेचा स्रोत काय आहे?

या कल्पना कशा उदयास आल्या, त्यांची मांडणी सर्वप्रथम कोणी केली, किंवा त्यासाठी कोणता पुरावा आहे हे कोणालाही माहीत नाही.

वेदांमध्ये पुनर्जन्माचा कोणताही पुरावा नाही, वेदांमध्ये आत्मेच्या स्थलांतराबद्दल एकही शब्द नाही. या कल्पना फक्त नवीनतम पुराणांच्या तत्त्वज्ञानात दिसून येतात.

हे सुद्धा नाकारता येणार नाही की हे, खाण्यापिण्याशिवाय दीर्घकाळ बसून राहिल्याचा परिणाम स्वरूप उठणाऱ्या आभासांप्रमाणेच, हे विचार एखाद्या हिंदू संन्यासीच्या मनात अचानक उठले असावे, जसे की प्राण विधीत केले जाते.

हे ज्ञात आहे की प्राण विधीमध्ये खाण्यापिण्याशिवाय दीर्घकाळ एका विशिष्ट स्थितीत बसल्या जाते.

हे अन्न पाण्याशिवाय तासंतास एका विशिष्ट मुद्रेत निश्चिन्त बसून असणे होय. जे कालांतराने, रक्तातील ग्लुकोज कमी झाल्यामुळे मेंदूच्या आयनांमध्ये असंतुलनासाठी कारणीभूत ठरते. ज्यामुळे एंडोर्फिनचे अनियंत्रित स्राव होते आणि वास्तविक मतिभ्रम सुरू होतो.[1]

संन्याश्यांनी जे पाहिले आणि पुनर्जन्माबद्दल पुराणांमध्ये जे लिहीले आहे ते भ्रम किंवा सेरेब्रल ॲनेस्थेसियाच्या जवळ आहे.

---

[1] पूर्व स्रोत.

हे आधुनिक विज्ञानाच्या अहवालानुसार आहे, जसे की यूएस नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी रिसर्च, जी एक सरकारी वेबसाइट आणि जगातील सर्वात मोठ्या वैद्यकीय संशोधन संदर्भांपैकी एक आहे, मध्ये असे म्हटले आहे की दीर्घकाळापर्यंत हायपोग्लाइसेमियामुळे भ्रम निर्माण होतो.[1]

इमाम अल-जहबी (अल्लाह त्यांच्यावर कृपा करो) म्हणतात : "मग अज्ञानी उपासक,

जेव्हा संन्यास घेतो, कष्ट भोगतो आणि भूक सहन करतो, मांस व फळे त्यागतो, अत्यन्त थोड्यापुरता मर्यादित होतो, तेव्हा त्याला मानसिक धोका निर्माण होतो. सैतान त्याच्यामध्ये दाखल होतो आणि बाहेर येतो व त्याला असे वाटते जणू देव त्याच्यामध्ये उतरला आहे, त्याला आकाशवाणी होत आहे आणि तो फार उत्क्रांत झाला आहे मग सैतान त्याला फसवू लागतो आणि त्याच्याशी कुजबुज सुरु करतो."[2]

म्हणून, इस्लामने अशा प्रकारची तपस्या आणि अशा प्रकारे स्वत:ला कष्ट देण्यापासुन रोखले आहे.

स्वतःवरील हा ताण कालांतराने सदोष धारणा आणि धर्मभ्रष्ट होण्यास कारणीभूत ठरतो.

सर्वशक्तिमान अल्लाहने नोबल कुराणमध्ये म्हटले आहे

{قُلْ مَنْ حَرَّمَ زِينَةَ اللَّـهِ الَّتِي أَخْرَجَ لِعِبَادِهِ وَالطَّيِّبَاتِ مِنَ الرِّزْقِ}

---

1 सियर आलाम अल-नुबला, अहमद इब्न अबी अल-हवारी यांनी अनुवादित केलेले, डॉ. फौझ कुर्दीच्या वेबसाइटवरून उद्धृत.

2 (सुनन अबी दाऊद ह. ४९०४, हदीस सही )

{सांगा: अल्लाहने त्याच्या सेवकांसाठी उत्पन्न केलेल्या शोभेला आणि त्याच्या उत्तम उपजीविकेला कोणी मनाई केली आहे?} (३२) सूरह अल-अअराफ.

आणि अल्लाहचे पैगंबर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) म्हणाले: “स्वतःवर खूप कठोर होऊ नका, नसता अल्लाह तुमच्यावर कठोर होईल. जसे काही लोक स्वतःवर कठोर झाले, तर अल्लाह त्यांच्यावर कठोर झाला, तरी हे (बघा) सायलो आणि घरांमध्ये त्यांचे अवशेष.

{وَرَهْبَانِيَّةً ابْتَدَعُوهَا مَا كَتَبْنَاهَا عَلَيْهِمْ}

आणि वैराग्याचा मार्ग त्यांनी स्वतः शोधून कढला, आम्ही तो त्यांच्यासाठी अनिवार्य केला नव्हता (२७) सूरत अल-हदीद.[1]

या अतिरेकाने भ्रम निर्माण केला ज्यामुळे या वेद-विरोधी धारणा निर्माण झाल्या, जे आज हिंदू धर्माचे मूळ बनले आहे.

याउलट, जर आपण वास्तविक चमत्कारांकडे बघितले (ज्यांना मोजज़े म्हणतात, जे अल्लाह तर्फे त्याच्या पैगंबरांकरवी लोकांसमोर सादर केले जातात) ज्याद्वारे अल्लाह त्याच्या पैगंबरांना पाठिंबा देतो, हे चमत्कार अचानक आणि पूर्व तयारीशिवाय घडतात आणि लोक ते स्वतःच्या डोळ्यांनी पाहतात आणि त्याची साक्ष देतात, आणि कोणत्याही माणसाला तसे सादर करणे शक्य नाही.

[1] "Energy – (according to New Age thinking)", The Skeptic's Dictionary, 2011-12-19.

पैगंबरांच्या बातम्या आणि हिंदू संन्यासी द्रष्ट्यांच्या बातम्यांमध्ये हाच फरक आहे.

### ८- हिंदू ब्रह्मांडाकडे कसे बघतात?

हिंदू तत्त्वज्ञानानुसार ब्रह्मांड विरघळण्याच्या अवस्थेत आहे आणि नंतर पुन्हा ते प्रकट होईल,आणि कायमस्वरूपी असेच होत राहील.

ते असे की विश्वाची निर्मिती होते, नंतर तो विरघळतो, नंतर पुन्हा तयार होतो, आणि असेच होत राहते.

विश्वाचे विरघळणे आणि परत तयार होणे हि धारणा एक वैज्ञानिक चूक आहे.

वैज्ञानिक दृष्ट्या या ब्रह्माण्डाच्या आधी दुसरे ब्रह्माण्ड नव्हते उलट ते सर्वप्रथम, पूर्वीच्या कोणत्याही उदाहरणाशिवाय उत्पत्तीत आहे.

आणि हीच मुसलमानांची श्रद्धा आहे जी १४०० वर्षांपूर्वी, करारावर मक्कातील लोकांच्या मेंढ्या पाळणाऱ्या एका माणसाने सांगितली होती, ज्याला मुहम्मद बिन अब्दुल्ला, अल्लाहचे पैगम्बर आणि इस्लामचे प्रेषित म्हणतात (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो). अल्लाहने त्यांच्याकडे संदेश पाठविला की हे जग पूर्वी कोणत्याही उदाहरणाशिवाय नवनिर्मित आहे. जसे अल्लाह कुराण मध्ये फर्मावितो

{بَدِيعُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۖ وَإِذَا قَضَىٰ أَمْرًا فَإِنَّمَا يَقُولُ لَهُ كُن فَيَكُونُ}

(तो अल्लाहच) आकाश आणि पृथ्वीचा निर्माता आहे, आणि जेव्हा तो एखाद्या गोष्टीचा निर्णय घेतो तेव्हा तो फक्त त्याला म्हणतो "हो", आणि ते होऊन जाते. (११७) सूरह अल-बकरा.

**९- हिंदू धर्मानुसार मानवी शरीर कशाने बनते?**

हिंदू धर्मानुसार मानवी शरीर हे पाणी, पृथ्वी, वायु, अग्नी आणि आकाश (पोकळी) या पाच घटकांच्या शक्तींनी बनलेले आहे.

आणि संपूर्ण विश्व, त्यातील सर्व काही, या पाच घटकांपासून बनले आहे.

पाच घटकांपैकी प्रत्येकाला त्याचे संबंधित ग्रह आहेत. मंगळ अग्निमय आहे आणि शनि पार्थिव आहे, आणि मनुष्याचे प्रत्येक अवयव पाच घटकांशी संबंधित आहे तरी प्लीहा पार्थिव आहे आणि हृदय अग्निमय आहे.

अस्तित्वात असलेल्या प्रत्येक गोष्टीचे, अगदी काळाचे सुद्धा पंच घटकांनुसार वर्गीकरण केले जाते, त्यांच्यामते रोग सुद्धा पंच तत्वांच्या असंतुलनाशिवाय दुसरे काहीही नाही.

पाच घटकांची ही कल्पना पुराणांद्वारे प्रसारित झाली, जे उपासमारीसह केल्या जाणाऱ्या विधी आणि तासंतास शांतपणे ध्यान करण्याचे प्रतिनिधीत्व करतात.

दुर्दैवाने, पाच घटकांची ही कल्पना जगामध्ये पसरली आणि परिणामी ऊर्जा थेरपीची अनेक विज्ञाने उदयास आली.

एनर्जी थेरपी, मॅक्रोबायोटिक्स, फेंग शुई, कलर थेरपी आणि इतर पद्धतींचे विज्ञान या घटकांच्या नियंत्रणावर आधारित आहे.

या पाच घटकांवर नियंत्रण ठेवल्याने उपजीविका प्राप्त होते आणि कष्ट दूर होते.

आज हिंदू मंदिरांमध्ये, या पाच घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मालिश केली जाते, आणि हे गृहीत धरले जाते की हे अनेक रोगांवर उपचार आहे.

आणि पंच तत्वांची ही कल्पना कोणत्याही बाबतीत विज्ञानाशी निगडित नाही.

त्याचा भौतिकशास्त्र किंवा औषधाशी काहीही संबंध नाही.

उलट, विज्ञान त्याला आणि त्याच्याशी संबंधित प्रथा एक प्रकारची अंधश्रद्धा, भ्रम आणि फसवणूक मानते.

पाच घटकांची कल्पना छद्म विज्ञान म्हणून वर्गीकृत केली गेली आहे.[1]

आणि या संबंधित प्रथा काल्पनिक आणि भ्रम असल्याचे ठरवले गेले आहे.[2]

पाच घटकांची कल्पना एखाद्या संन्यासीच्या मनात त्याच प्रकारे उत्पन्न झाली असावी ज्याप्रमाणे पुनर्जन्म आणि आत्म्यांच्या पुनर्जन्माची कल्पना उत्पन्न झाली, कारण त्यासाठी कोणतेही तर्कसंगत, वैज्ञानिक किंवा तार्किक पुरावे नाहीत.

---

1 "Some Notes on Wilhelm Reich, M.D", Quackwatch.org, 15-02-2002.

2 मी "अध्यात्मिक नास्तिकता" या स्वतंत्र पुस्तकात ऊर्जा उपचाराच्या मुद्द्यावर संपूर्ण चर्चा केली आहे.

तो फक्त एक काल्पनिक विचार आहे.

समस्या अशी आहे की या कल्पनेच्या पद्धती केवळ अस्पष्ट मूर्तिपूजा आणि ग्रह, आकार, चिन्हे, रंग आणि ताबीज यांच्याशी संलग्न आहेत ज्यावर अल्लाहने कोणतेही मार्गदर्शन दिलेले नाही.[1]

इस्लामने पाच घटकांच्या कल्पनेशी संबंधित या प्रथांविरुद्ध आधुनिक विज्ञानाअगोदर चेतावणी दिली आहे, कारण या पद्धतींमुळे योग्य उपचार मिळण्यास विलंब होतो आणि वास्तविक जगाच्या समांतर भ्रमात राहून मानवी जीवन जगण्यास कारणीभूत ठरते. अल्लाहशिवाय इतरांशी आसक्ती कडे घेऊन जातो, म्हणून इस्लामने या प्रथांविरूद्ध जोरदार सावधानतेचा इशारा दिला, अल्लाहने हदीस कुदसीमध्ये म्हटले आहे

"أصبحَ من عبادي مؤمنٌ بي وكافرٌ فأمَّا من قالَ مُطِرنا بفضلِ اللَّهِ ورحمتِهِ فذلكَ مؤمنٌ بي كافرٌ بالكوكبِ، وأما من قال مُطِرنا بنَوْءِ كذا وكذا فذلكَ كافرٌ بي مؤمنٌ بالكواكبِ".[37]

“माझ्या सेवकांपैकी कुणी माझ्यावर विश्वास ठेवणारा झाला आणि कुणी अविश्वासू बनला आहे, तरी जो म्हणाला की अल्लाहच्या कृपेने आणि त्याच्या दयेने पाऊस पडला, तो माझ्यावर विश्वास ठेवणारा, ग्रहांवर विश्वास ठेवणारा नाही आणि जो म्हणतो अमुक अमुक ग्रहांमुळे पाऊस पडला, तो माझा इंकारी, ग्रहांवर विश्वास ठेवणारा आहे.”[2]

---

1 सहिह मुस्लिम, हदीस: ७१.
2 सहिह अल-जामे’, हदीस : १६३२.

जो कोणी ग्रहांवर आणि त्यांचा मानवांवर होणाऱ्या परिणामांवर विश्वास ठेवतो आणि हे की ते उपजीविकेमध्ये हस्तक्षेप करतात तर तो अल्लाह चा इंकारी होतो आणि जो अल्लाहवर विश्वास ठेवतो तो मानवी नशिबात ग्रहांच्या हस्तक्षेपावर विश्वास ठेवत नाही.

अल्लाहचे पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) म्हणाले

"إنَّ الرُّقى، والتَّمائمَ، والتِّوَلَةَ شركٌ".[38]

"निश्चीतच, मंत्र, ताबीज आणि टवाळ हे बहुदेववाद आहेत."[1]

म्हणून, मुस्लिम पाच घटकांच्या प्रभावाच्या मिथकांवर आणि त्यांच्याशी संबंधित चमत्कार आणि ताबीजवर विश्वास ठेवत नाही.

उलट, इस्लामने असे म्हटले आहे की तावीज, भूमितीय आकार, ऊर्जा पेंडुलम आणि पाच घटकांशी संबंधित इतर बाबी बनवणे आणि असे समजणे की या ताविजांनी फायदे मिळतात किंवा हानी टळते हे बहुदेववाद आणि ईश्वरावरील अविश्वास यांचे सार आहे.

وقد رأى رسول الله صلى الله عليه وسلم رجلاً وفي يده حلقة من صُفْر فقال: "ما هذا؟ قال: مِن الواهنةِ قال: ما تَزيدُك إلَّا وَهْنًا، انبِذْها عنكَ فإنَّكَ إنْ تمُتْ وهي عليك وُكِلْتَ عليها".[39]

अल्लाहच्या पैगम्बरांनी (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो), हातात जस्ताचा कडा घातलेला एक माणूस

[1] सही इब्ने हिब्बान ६०८५

पाहिला, तर त्याला विचारले "हे काय आहे"? तो म्हणाला: कमजोरीमुळे घातलेला आहे. पैगम्बर म्हणाले : "तो तुझ्या कमजोरी मध्ये वाढच करेल. ताबडतोप त्याला काढून फेक, कारण जर हे तुझ्या अंगावर असताना तुला मरण आले तर तुला त्याच्याच सुपूर्द केले जाईल.[1]

आणि दुसऱ्या कथनानुसार : "तो तुझ्या अंगावर असताना तू मरण पावला असतास, तर तू कधीच यशस्वी झाला नसता."[2]

इस्लामचे विद्वान इब्न तैमियाह, (त्यांच्यावर अल्लाहची दया असो), असे म्हटले: "फायदे देणारे आणि हानी दूर करणारे तावीज तयार करणे हा मोठा बहुदेववाद आहे."[3]

हाच सिद्धांत भगवद्गीते द्वारा स्थापित केलेला आहे: "जे देवांची पूजा करतात त्यांना देवता प्राप्त होतात, जे पूर्वजांची पूजा करतात त्यांना पूर्वज प्राप्त होतात, जे सैतानाची पूजा करतात त्यांना सैतान प्राप्त होतो आणि जे माझी पूजा करतात त्यांना मी प्राप्त होतो."[4]

तरी जो कोणी अल्लाहशिवाय या तावीजांबरोबर संबंध ठेवणारा आहे तो अल्लाहशिवाय दुसऱ्याचा उपासक आहे.

आणि वेदांनुसार, त्याचे नशीब, नरकात अमरत्व आहे. यजुरवेद म्हणते: "जो अल्लाहशिवाय इतर गोष्टींची पूजा करतो,

---

1 अल-हैतमी अल-मक्की, अल-जवाजिर, व्हॉल्यूम 1, पृ. 166 (सहिह)
2 मजमू अल-फतावा, खंड ९, पृष्ठ ३४.
3 भगवद्गीता, ९-२५.
4 यजुर्वेद, सोक्त: ४०, मंत्र : ९.

तो अंधारात बुडतो आणि नरकाच्या यातना कायमचा चाखतो."[1]

आपला प्रभु (जो पवित्र आहे) फ़रमावितो : गोष्ट अशी आहे की समस्त कार्ये अल्लाहच्याच हाती आहेत. (सूरह अर्रअद ३१)

अल्लाहचे पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) म्हणाले जेव्हा कधी तुम्ही मागाल अल्लाहला मागा आणि जर तुम्ही मदत घ्याल तर अल्लाहची मदत घ्या."[2]

म्हणून, मुस्लिम पाच घटक, ग्रह, चमत्कार आणि ताबीज यांच्या प्रभावाच्या पुराणकथेवर विश्वास ठेवत नाही, तर तो मूर्तिपूजा, भ्रम, धूर्तता आणि अंधश्रद्धेचा स्रोत आहे असे मानतो.

### हिंदू समाज आहे तरी काय?

पुनर्जन्म आणि कर्माच्या कल्पनेवर विश्वास ठवणारा हिंदू समाज हा अपरिहार्यपणे जातीवादी समाज आहे.

कारण हिंदुमतानुसार वाईट माणूस पुढचा जन्म होता त्यापेक्षा खालच्या वर्गात जन्म घेईल.

आणि असेच होत राहील म्हणून, पीडित त्याच्या दुःखास पात्र आहे.

हे गरीब आणि पीडित लोकांवर जुलूमशाही लादणे आणि त्यांच्याबद्दल उदासीनता आहे... हे जणू जुलूमास मान्यता देण्यासारखेच आहे.

हिंदू धर्मात, लोक चार वर्गांमध्ये विभागलेले आहेत:

---

[1] सुनन अल-तिर्मिजी, खंड: २५१६ सही.

[2] ऋग्वेद, मंडळ : १, सोक्त : १, मंत्र : ६.

१ - ब्राह्मण: शिक्षक आणि पुजारी.

२ - क्षत्रिय: योद्धा आणि राजे.

३ - वैश्य: शेतकरी आणि व्यापारी.

४ - क्षुद्र: कामगार.

आणि सर्वात खालचा वर्ग आहे: अस्पृश्य क्षुद्र जे - त्यांच्या मान्यतेनुसार - अपवित्र कृत्ये करतात जसे की स्वच्छता आणि सेवा.

प्रत्येक व्यक्तीचा वर्ग त्याच्या कामाचा, कपड्यांचा आणि अन्नाचा प्रकार ठरवतो.

आणि त्यांची लग्नकार्ये त्याच वर्गात होऊ शकते.

एखादी व्यक्ती ज्या वर्गात जन्माला आली मरेपर्यंत त्याच वर्गाशी संलग्न असणे त्याला बंधनकारक असते.

ही वर्ग संकल्पना, मी म्हटल्याप्रमाणे, पुनर्जन्म आणि कर्म - शिक्षा आणि बक्षीस - या सिद्धांतावरील विश्वासातून उद्भवते. तरी क्षुद्र अस्पृश्य होण्यास पात्र आहे, कारण मागील जन्मांमध्ये नक्कीच तो पापी होता आणि म्हणूनच त्याचा या वर्गात जन्म झाला.

हा विकृत गैरसमज संपूर्ण मानवतेला भ्रष्ट करतो आणि या समजुतीने अशी मानसिकता जन्माला येऊ शकते की क्षुद्रांना मदत करणे हा जणू कर्माचा एक प्रकारे अनादर आहे.

मागासलेपणा, अन्याय, जातीवाद आणि अत्याचार यांचा हा एक प्रकारचा समेट आहे.

पुनर्जन्म आणि कर्माच्या तत्त्वज्ञानाने जातीवादाची निर्मिती केली आहे. या दोन्ही चुकीच्या धारणांनी गरीब, आजारी आणि दुर्बल लोकांची अशी स्थती करून ठेवली आहे की त्यांच्या हातात काहीही उरले नाही.

त्यांना मदत करण्याची आणि मदतीचा हात देण्याची संधी हिंदू धर्माने गमावली आहे.

हा हिंदू दृष्टिकोन हा मानवी वृत्तीच्या स्वभावाच्या विरुद्ध आहे, जी वृत्ती दुर्बल, गरजू आणि आजारी लोकांबद्दल सहानुभूती दाखविणारी प्रवृत्ती आणि त्यांना सेवा प्रदान करण्यासाठी आणि त्यांच्या दुःखापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करण्यासाठी त्यांच्याप्रति कर्तव्याची भावना निर्माण करणारी प्रवृत्ती आहे.

मला समजत नाही की वेदांमध्ये लिहिलेल्या शेवटच्या दिवसाच्या श्रद्धेपासून हिंदू कसे दूर गेले, ज्या विश्वासाने माणसाचे जीवन सुधारले जाते आणि जगाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन सुधारला जातो. तरी परलोकात अल्लाहसमोर माणसाचा हिशोब घेतला जाईल, आणि सर्व मानव निर्दोष जन्माला येतात, आणि दुःखी लोकांना मदतीचा हात देणे परलोकात अल्लाहजवळ माणसाचा दर्जा उंचावतो.

तरी या दोन दृष्टिकोनांपैकी कोणता चांगला आणि मनुष्यासाठी सर्वात योग्य आणि त्याच्या अंतःप्रेरणेच्या जवळ आहे?

कर्माचे तत्वज्ञान... की वेदांची शिकवण?

ऋग्वेदात आले आहे: "हे देवा, तू सत्पुरुषाला उत्तम बक्षीस देतोस."[1]

आणि ते म्हणते: "ज्या ठिकाणी सर्व प्रकारचे सुख आणि आनंद आहेत आणि जिथे आत्म्याला जे हवे आहे ते मिळते त्या ठिकाणी मला अमर कर."[2]

ही वेदांची शिकवण आहे.

एक नंदनवन आहे ज्यामध्ये नीतिमान आनंदित होतील.

वेदांनुसार, पापींसाठी तयार केलेली यातना देखील आहे.

ऋग्वेद म्हणतो: "दूर अत्यंत खोलीचे ठिकाण आहे ज्याच्या तळाशी पापींचे ठिकाण आहे."[3]

तर पुनर्जन्म आणि आत्म्यांच्या स्थलांतराच्या कल्पनेमध्ये ही ठिकाणे कोठे आहेत?

कर्माच्या तत्त्वज्ञानात पापी लोकांसाठी सर्वात खोल स्थान कोठे आहे?

त्यामुळे एकूणच कर्माचे तत्त्वज्ञान हे वेदांच्या आत्म्याच्या विरुद्ध मानवी आविष्कार आणि कल्पना आहे.

सर्व संदेष्ट्यांचा विश्वास हाच होता की : शेवट (पुनरुत्थानाचा) दिवस, स्वर्ग आणि नरक यावर विश्वास ठेवणे आणि हे की लोक पापमुक्त निर्दोष जन्माला येतात.

---

1 ऋग्वेद, मंडळ: ९, सोक्त: ११३, मंत्र: ९-११.

2 ऋग्वेद, मंडळ: ४, सोक्त: ५, मंत्र: ५.

3 सहिह मुस्लिम, हदीस : २६९९.

हाच पंथ आहे जो अंतःप्रेरणेशी सहमत आणि सामंजस्य करतो आणि अन्याय, मागासलेपण, जातीवाद आणि अत्याचाराचा विरोध करतो.

संदेष्ट्यांचा धर्म माणसाला उन्नत करण्याचा प्रयत्न करतो आणि लोकांना समान बनवण्याची मागणी करतो.

आणि इस्लाममध्ये मनुष्याचे मूल्य त्याच्या जातीत नाही, त्याच्या स्वरुपात नाही, त्याच्या आरोग्याच्या स्थितीत नाही किंवा त्याच्या भौतिक स्तरावर नाही, किंबहुना मनुष्याचे मूल्य त्याने केलेल्या चांगल्या कर्मांच्या प्रमाणात आहे.

इस्लाम सर्वांच्या उन्नतीकडे बोलवितो आणि वंश आणि खानदाना (च्या वर्चस्वाकडे) दुर्लक्ष करण्याचे आवाहन करतो.

इतकेच नव्हे तर अस्पृश्यता आणि जातीवाद पूर्णपणे नाकारतो.

सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र कुराणमध्ये म्हटले आहे :

{يَا أَيُّهَا النَّاسُ إِنَّا خَلَقْنَاكُم مِّن ذَكَرٍ وَأُنثَىٰ وَجَعَلْنَاكُمْ شُعُوبًا وَقَبَائِلَ لِتَعَارَفُوا ۚ إِنَّ أَكْرَمَكُمْ عِندَ اللَّـهِ أَتْقَاكُمْ ۚ إِنَّ اللَّـهَ عَلِيمٌ خَبِيرٌ}

हे लोकहो, आम्ही तुम्हाला एक पुरुष आणि एका स्त्रीपासून निर्माण केले आहे आणि आम्ही तुम्हाला कुळे आणि जमाती बनवल्या आहेत, जेणेकरून तुम्ही एकमेकांना ओळखू शकाल. अल्लाहजवळ तुमच्यातील सर्वात आदरणीय तो आहे जो तुमच्यापैकी सर्वात धार्मिक आहे. अल्लाह सर्वज्ञ, सर्व खबर ठेवणारा आहे. (१३) सुरह अल-हुजुरात.

अल्लाहचे पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) म्हणाले

" مَن بَطَّأَ به عَمَلُهُ، لَمْ يُسْرِعْ به نَسَبُهُ".[48]

"ज्याचे कृत्य त्याला मागे टाकते, त्याचा वंश त्याला पुढे घेऊन जाऊ शकत नाही."[1]

आणि पैगम्बर, त्याच्यावर शांती असो, म्हणाले:

"لا يأتيني الناس بأعمالهم وتأتوني بأنسابكم".[49]

"लोक त्यांची कर्मे माझ्याकडे आणत नाहीत आणि तुम्ही तुमचा वंश माझ्याकडे आणता."[2]

इस्लाममध्ये वंशावळी (चे अभिमान बाळगण्याला) किंमत किंवा वजन नाही.

अल्लाहचे पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) म्हणाले:

"يا أيها الناس ألا إن ربكم واحد، وإن أباكم واحد، ألا لا فضل لعربي على عجمي، ولا لعجمي على عربي، ولا لأحمر على أسود، ولا لأسود على أحمر إلا بالتقوي".[50] وقال صلى الله عليه وسلم:

"अरे लोकहो!, तुमचा प्रभु एकच आहे आणि तुमचा पिता एक आहे, याद राखा कुण्या अरबीला (अरबस्तानाच्या राहणाऱ्याला) गैरअरबी वर श्रेष्ठत्व प्राप्त नाही, आणि कुण्या गैरअरबी ला अरबावर श्रेष्ठत्व प्राप्त नाही, कुणी लाल (गोऱ्या)

1 अल वादी यांनी या हदीस ला सही मुसनद मध्ये "हसन" म्हटले आहे. १४२६

2 अल-बयहकी यांनी शुअबु -ल-इमानमध्ये वर्णन केले आहे आणि हदीस सही आहे, अल-सिलसिलह अल-सहिहा, हदीस : २७००.

व्यक्तीला काळ्यावर श्रेष्ठत्व प्राप्त नाही, आणि कुण्या काळ्याला गोऱ्यावर श्रेष्ठत्व प्राप्त नाही. श्रेष्ठत्व तर फक्त अल्लाहचे भय राखल्याने प्राप्त होतो." आणि पैगम्बर, त्याच्यावर शांती असो, म्हणाले:[1]

"ابغوني الضُّعَفاءَ ، فإنما تُرزقون و تُنصَرون بضُعفائِكم".[51]

"माझ्यासाठी दुर्बलांचा शोध घ्या, कारण तुम्हांला तुमच्या दुर्बलांमुळे पुरविले जाते आणि तुमची मदत केली जाते."[2]

एकीकडे हे चित्र पहा: "माझ्यासाठी दुर्बलांचा शोध घ्या, कारण तुम्हांला तुमच्या दुर्बलांमुळे पुरविले जाते आणि तुमची मदत केली जाते." आणि दुसरीकडे ते चित्र आहे जसे हिंदू दुर्बलांकडे पाहतात.

खरोखरच मानवी आत्म्यामध्ये गरीब, दुर्बल, साधे आणि मूर्ख लोकांबद्दल आपुलकी निर्माण केली गेली आहे तरी आजच्या हिंदू धर्माचा या प्रवृत्तीला विरोध करणे ही खरी समस्या आहे.

### 11- हिंदू खरेच गायींची पूजा करतात का?

हिंदू धर्मात गायीला देणगीचा स्त्रोत म्हणून विशेष पूजनीय आहे. आणखी एक मुद्दा आहे, जो समकालीन हिंदू संकल्पना आहे की गाईंसह इतर प्राण्यांमध्ये देव वास करतो, ज्याला

---

1 सुनन अबी दाऊद आणि अल-तिर्मीजी, अल-अल्बानी यांनी सहिह अल-जामे आणि सहीह अबी दाऊद, खंड: २५९४ मध्ये प्रमाणित केले आहे.

2 द लिजेंड ऑफ होली काउ, द्विजेंद्र नारायण (विनाअनुवादित).

म्हणतात: अस्तित्त्वाच्या एकतेचे तत्त्वज्ञान. हिंदू धर्मात गायीचे विविध प्रकार आहेत.

भारताच्या विविध भागात गायींसाठी विशेष समारंभ सतत आयोजित केले जातात.[1]

दुसरीकडे, वेद प्रत्येक गोष्टीवर आणि प्रत्येक प्राण्यावर देवाचे उदात्तीकरण आणि गौरव सादर करते.

ऋग्वेदात असे म्हटले आहे: "मी सर्व गोष्टींपूर्वी अस्तित्वात असलेला देव आहे, आणि मी सर्व जगाचा मालक आहे, आणि सर्व देणग्यांचा मीच खरा दाता आणि मालक आहे, तरी सर्व आत्म्यांनी मलाच मदती आणि तरतुदीसाठी बोलावले पाहिजे"[2]

हा सूर्यासारखा स्पष्ट मजकूर आहे जो अस्तित्वाच्या एकतेची कल्पना नाकारतो, कारण अल्लाह जगाचा निर्माता आहे आणि जगापासून स्वतंत्र आहे.

तसेच या मजकुरात भौतिक जगाला पवित्र समजण्याविरुद्ध किंवा प्राण्यांकडून मदत मागण्याबद्दल चेतावणी देण्यात आली आहे, म्हणून अल्लाह, गायींचा निर्माता आणि प्रत्येक गोष्टीचा निर्माता याशिवाय कोणाचाही मदत मागण्यासाठी धाव करु नये.

आणि केवळ ईश्वराच्या अधीन राहण्याची शिकवण इस्लामच्या सिद्धांताचे सार आहे.

---

[1] ऋग्वेद, मंडळ: १०, सोक्त: ४८, मंत्र: १.

[2] https://www.ncbi.nlm.nih.gov/pubmed/8931651

इस्लाम घोषित करतो की गायी आणि आपल्या सभोवतालची सर्व सामग्री आपल्या अधीन आहे, अल्लाहने त्यांना त्याच्या कृपेने निर्माण केले आहे, असे सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र कुराणमध्ये म्हटले आहे.

{وَسَخَّرَ لَكُم مَّا فِي السَّمَاوَاتِ وَمَا فِي الْأَرْضِ جَمِيعًا مِّنْهُ ۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَاتٍ لِّقَوْمٍ يَتَفَكَّرُونَ}

आणि आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे, ते सर्व त्याने तुमच्यासाठी वश केले आहे, निःसंशयपणे चिंतन करणाऱ्यांसाठी त्यात निशाण्या आहेत. (१३) सुरह अल-जासिया)

ही इस्लामची श्रद्धा आहे, आणि हीच माणसाची प्रवृत्ती आहे.

हिंदू इस्लामशिवाय वेदांनी दिलेल्या एकेश्वरवादाच्या शिकवणीकडे परत येऊ शकणार नाहीत किंवा अल्लाहच्या अधीन होऊ शकणार नाही. इस्लाम हा वेदांमधील सर्व सत्याचा अनुमोदन करणारा आहे आणि तोच सर्व मानवी चुका सुधारतो आणि अल्लाहची प्रकटीकरणामधील सर्व मानवी हस्तक्षेप नाकारतो.

**12- पण हिंदू धर्मात त्यागभावना खूप आहे आणि पापापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला जातो, हे एक वैशिष्ट्यपूर्ण गुण नाही का?**

मी पूर्वी हिंदू धर्मातील अत्याधिक कठोरतेच्या मुद्द्याचा उल्लेख केला आहे, परंतु मी येथे सांगू इच्छितो की पाप आणि पश्चात्ताप या दैवी आदेशाशी संबंधित नैसर्गिक बाबी आहेत.

आम्ही बांधील असल्यामुळे, काही चूक झाल्यास आम्हाला पश्चाताप होतो.

ही एक प्रवृत्ती आहे, सर्वशक्तिमान अल्लाहने कुरआनमध्ये म्हटले आहे

{فِطْرَتَ اللَّـهِ الَّتِي فَطَرَ النَّاسَ عَلَيْهَا}

{अल्लाहची रचलेली एक प्रवृत्ती आहे ज्यावर त्याने सर्व माणसे निर्माण केली आहे.} (सुरह अर-रूम : ३०)

या अंतःप्रेरणेसमोर, एखाद्या व्यक्तीला चांगल्या आणि सत्याच्या मूल्यांचे कोणतेही उल्लंघन झाल्यास विवेकाचे बोचणे जाणवते.

आणि सर्वशक्तिमान अल्लाहने अंतिम संदेश - इस्लाम - मध्ये चांगुलपणा आणि सत्याच्या मूल्यांचे उल्लंघन करण्यापासून क्षमा आणि पश्चात्ताप मिळविण्याच्या मार्गाचे मार्गदर्शन केले आहे तसेच अल्लाहने लोकांच्या तक्रारींना प्रतिसाद देण्याची आज्ञा देखील दिली आहे आणि अशा प्रकारे अल्लाह पाप धुऊन टाकतो.

परंतु आपल्याला हिंदू धर्मात पापांना प्रतिकार करण्याचा एक दुसरा मार्ग सापडतो, आणि तो म्हणजे स्वतःला अत्यंत कष्ट देणे होय. तसेच विविध प्रथा, ध्यान आणि विधी यांचा एक संच आहे ज्यामुळे त्यांच्या करणाऱ्याला पूर्ण शांती लाभते.

### 13- पण पूर्ण शांतता आणि ध्यानधारणा ही हिंदू धर्माची चांगली गोष्ट नाही का?

हिंदू धर्मातील "ध्यान" जसे कि योगाच्या आसनांमध्ये आढळते जे नवीनतम पुराणांमध्ये आले आहे ते अल्लाहच्या निर्मितीला योग्य नाही तसेच त्याच्या ज्ञानाला अनुसरुण नाही आणि त्याच्या अद्‌भुत निर्मिती आणि आशीर्वादांचा विचारही नाही.

त्याऐवजी, त्यांच्यासाठी ध्यान म्हणजे एक प्रकारची पूर्ण शांतता आणि कोणत्याही चांगल्या वाईट विचारांपासून मन रिकामे करणे होय.

हे मृत्यूच्या शांततेसारखी एक पूर्ण शांतता आहे ज्यामध्ये मन विचार करण्यापासून दूर होते Silence your Mind During Yoga..

वेदातोत्तर कालखंडात प्रकट झालेल्या या विचित्र स्थिर ध्यान सत्रांचा त्यांच्या विचारसरणीवर परिणाम झाला आणि त्यांना भ्रम आणि कल्पना येऊ लागल्या आणि भुते त्यांच्या मनात घोळू लागली.

त्यांच्यापैकी काहींना असे वाटते की त्याने ज्ञान प्राप्त केले आहे, आणि मी आधी स्पष्ट केल्याप्रमाणे मेंदूच्या आयनांच्या असंतुलनामुळे आणि पूर्ण शांततेमुळे त्याच्यासोबत जे घडले ते भ्रमापेक्षा अधिक काही नाही.[1]

---

[1] रेकी फॉर बिगिनर्स, डेव्हिड एफ. फायनल्स, पृ. ३०-३५, (पूर्व उपचार तत्त्वज्ञानाचे समकालीन अनुप्रयोग, डॉ. हैफा बिंत नासेर अल-रशीद) वरून उद्‌धृत.

दीर्घ स्थिर ध्यान आणि तीव्र भूक अशा भ्रमांना कारणीभूत ठरते, हे जगातील स्थिर ध्यान शाळांचे सर्वात प्रसिद्ध संस्थापक मिकाओ उसुई Mikao Usui कबूल करतात.

ज्याक्षणी एखाद्याने मान्य केले की तो देहभान गमावू लागला आणि अनेक तासांच्या उपासमार आणि वंचिततेनंतर भ्रमित होऊ लागला त्याचक्षणी  त्याच्या मनात अनेक विचार येऊ लागतात.[1]

मनोचिकित्सक डोनोव्हन रॉक्लिफ Donovan Rawcliffe यांनी एका स्वतंत्र संशोधनात याची पुष्टी केली आहे की या पद्धतींच्या परिणामी उद्भवणारे विचार हे विभ्रमांमुळे होणाऱ्या पॅथॉलॉजिकल भ्रमांपासून वेगळे नाहीत.[2]

या व्यतिरिक्त, बहुतेक योग सत्रे हे आरोग्य दोष आहेत, आणि त्यांची सवय झाल्यास संभ्रम आणि गोंधळाची स्थिती निर्माण होते व स्थळ आणि वेळेची जाणीव नष्ट होते आणि यामुळे स्मरणशक्ती कमकुवत होते आणि अल्झायमरचा वेग वाढतो.[3]

हिंदू धर्म वेदांच्या या प्रथा आणि पैगंबरांच्या शिकवणीपासून दूर गेला आहे.

इस्लामने अल्लाहच्या निर्मितीमध्ये चिंतन, मनन करण्याचे आवाहन केले आहे आणि हे चिंतन मनन कर्म, आज्ञाधारकता,

---

1 Rawcliffe, Donovan, (१९८८), Occult and Supernatural phenomena, Dover Publications, p. १२३

2 An introduction to complementary medicine, Simon Borg Olivier, p.२९० ("हरकतुल अस्र अल-जदीद", डॉ. हैफा बिंत नासेर अल-रशीद यामधून उद्धृत).

3 सहिह सुनन अल-तिर्मिज़ी, हदीस : २५०७.

ईश्वराचे आभार मानणे आणि जीवनात परिश्रम करणे यास कारणीभूत ठरते, आणि मनःशांतीपेक्षा मोठी शांतता असू शकत नाही.

खरे चिंतन हे देवाच्या आज्ञाधारकतेकडे आणि पश्चात्तापाकडे घेऊन जाते.

{الَّذِينَ يَذْكُرُونَ اللَّـهَ قِيَامًا وَقُعُودًا وَعَلَىٰ جُنُوبِهِمْ وَيَتَفَكَّرُونَ فِي خَلْقِ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ رَبَّنَا مَا خَلَقْتَ هَـٰذَا بَاطِلًا سُبْحَانَكَ فَقِنَا عَذَابَ النَّارِ}

जे लोक उठता बसता आणि पडल्या पडल्या अल्लाहच्या आकाश आणि पृथ्वीच्या निर्मितीबद्दल चिंतन करतात की हे आमच्या पालनकर्त्या हे सर्व काही तू निरुपयोगी निर्माण केलेले नाही, तू तर पाक आहेस, तरी आम्हाला नर्काच्या अग्नी पासून वाचव. (१९१) सुरह आले इम्रान.

इस्लामचे हे विचार मानवी प्रवृत्तीच्या स्वभावानुसार आहे आणि एखाद्या व्यक्तीला त्याच्या सभोवतालच्या अल्लाहच्या देणग्यांबद्दल आभार मानण्यास आणि या देणग्यांबद्दल विचार करण्यास मदत करते.

राहिले सध्याच्या हिंदू धर्मातील ध्यान आसने तर ते सैतानाचे आवास आहेत, जिथे सैतान या लोकांना एकाग्र ध्यान आसनादरम्यान काही मदत, स्वप्न आणि प्रकटीकरण प्रदान करतात. मग त्यांच्या मनात पुनर्जन्माचे विचार येतात. आत्म्यांच्या पुनर्जन्माच्या कल्पनेसह अस्तित्वाच्या एकतेचे विचार येतात तसेच देवाचे मूर्तींमध्ये अवताराची कल्पना त्यांच्या मनामध्ये घोळू लागते. मग ते संन्यासी हे विचार आणि

शिकवण आपल्या मानणाऱ्यांसमोर मांडतात जेणेकरून स्वतःही भटकतात आणि दुसऱ्यांचीही दिशाभूल करतात.

### १४- सध्याच्या हिंदू धर्मात आढळते तसे एकांतवासात निघून जाण्यात गैर काय आहे?

हिंदू धर्म अंतःप्रेरणा आणि वासनेशी लढतो त्यांना इस्लामिक कायद्याप्रमाणे व्यवस्थित करण्याऐवजी शरीरास जाळण्याचे प्रयत्न करतो. सध्याचा हिंदू धर्म माणसाला संन्यासाकडे आणि जगत्यागण्याकडे घेऊन जातो.

तर हिंदू धर्म मानतो की वृत्ति विसरणे म्हणजे शरीर विसरणे होय.

म्हणून ज्या हिंदूला मोक्ष हवा आहे तो तिथेच आपले शरीर कुजवण्यासाठी अवशेषात जातो आणि मरेपर्यंत आपले उर्वरित आयुष्य भिक्षु म्हणून घालवतो.

हा एक भयंकर असंतुलन आहे जो माणूस, कुटुंब आणि समाज नष्ट करतो.

अंतःप्रेरणा आणि वासना ही एक दैवी देणगी आहे जी कुटुंबाची स्थापना करण्यासाठी, समाजाची स्थापना करण्यासाठी, धडपडत राहण्यासाठी आणि जीवनाच्या उभारणीसाठी आहे.

तःप्रेरणेचा उपचार शरीराला जाळून न करता, ती जोपासून आणि नैसर्गिक मार्गे त्याचा उपयोग करून केला जातो.

हे कोण आहे ज्याने सांगितले की आपल्या अस्तित्वाचा उद्देश हेच आहे की : जेवणासाठी भीक मागणे आणि उर्वरित

दिवस खंडहरांमध्ये घालविणे व अशाच प्रकारे जीवनाचे अंत करणे.

कोण सांगितले की आपण भगवे वस्त्र परिधान करून मरेपर्यंत जगावेगळे राहण्यासाठी आलो आहोत?

अगदी सामान्य कीटकांना सुद्धा अस्तित्वाचे महत्व, पृथ्वीची निर्मिती आणि जीवन सुधारण्याच्या कार्याबद्दल आपल्यापेक्षा जास्त माहिती असते. तुम्हाला मधमाशांचे थवे स्वतःच्या आणि त्यांच्या संततीच्या भल्यासाठी प्रयत्न आणि सुव्यवस्थितपणे काम करताना आढळतात आणि तुम्हाला आतड्यांमध्ये लहान जीवाणू व्यवस्थित आढळतात जे फायदा उचलतात आणि फायदा पोहचवितात.

आणि संपूर्ण जीवन हे नियम आणि कार्याने चालते.

सध्याचा हिंदू धर्म बेरोजगारी, निष्क्रियता आणि भिकमागण्याकडे घेऊन जातो. हिंदू धर्मात भीक मागणे ही एक जीवनशैली बनली आहे.

येथे प्रश्न असा आहे की, एखाद्या हिंदूंने लोकांपासून दूर, डोंगरमाथ्यावर आणि शहरापासून दूर असलेल्या ठिकाणी स्थायिक होण्याचा काय अर्थ होतो? त्यातून लोकांना काय फायदा होईल?

खरा धर्म आणि योग्य जीवनपद्धती हा आस्थेने, उपदेशाचा, लोकांमध्ये मिसळण्याचा, त्यांना सुधारण्याचा आणि त्यांच्यापासून होणाऱ्या त्रासांवर धीर धरण्याचा मार्ग आहे जो

दऱ्या-खोऱ्यांत आणि वाळवंटातही त्यांच्यापासून दूर जात नाही!

अल्लाहचे पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) म्हणाले : "जो मुस्लिम लोकांमध्ये मिसळतो आणि त्यांच्या त्रासावर धीर धरतो, तो अशा मुस्लिमापेक्षा चांगला आहे जो लोकांमध्ये मिसळत नाही आणि त्यांच्या त्रासावर धीर धरत नाही."[1]

### १५- वासनेचा प्रतिकार करण्याचा आणि पापांपासून मुक्त होण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे?

वासना आणि अंतःप्रेरणेच्या प्रतिकाराची उत्पत्ती ही जन्मजात उत्पत्ती आणि अनिवार्य उत्पत्ती आहे आणि मुस्लिम दैवी प्रकटीकरणाच्या आज्ञेनुसार वासनेला शिस्तबद्ध करण्याच्या पद्धतीचे पालन करतात.

तरी वैध विवाह, नजर खाली ठेवणे, छुपे व जाहीर अल्लाहचे भय आणि अवज्ञा केल्यास शिक्षेचा दैवी इशारा हे काही त्याचे उपाय आहेत.

एखाद्या व्यक्तीने चूक केली आणि कमकुवत ठरला तर पश्चात्ताप करण्याचा एक मार्ग आहे.

परंतु हिंदू धर्मात आपल्याला मोक्षप्राप्तीची इच्छा असणारी हिंदू व्यक्ती आपली पत्नी, मुले आणि नोकरी सोडून फुटपाथवर आणि खंडहरांमध्ये झोपेत, जेवणासाठी भीक मागते आणि मरेपर्यंत आपल्या शरीराला अशाच प्रकारे

[1] ५९] सहिह सुनन अबी दाऊद, हदीस: १६९२

जाळत असल्याचे आपल्याला आढळते. हा स्वयंशिस्तीचा योग्य मार्ग आहे का?

हिंदू संन्यासी, ज्यांची संख्या आज भारतात ५ दशलक्षांपेक्षा जास्त आहे, ते त्यांचे आश्रित गमावल्याच्या पापाने समाधानी नाहीत, परंतु त्यांना स्वतःला आधार आणि आहार देण्याची गरज आहे.

इस्लामने मानवी आत्म्याला सर्वोत्तम आणि उत्कृष्टपणे परिष्कृत केले आहे.

इस्लामने त्याच्या आश्रितांच्या अधिकारात माणसाची काटकसर करण्याची अभेद्यता स्थापित केली आहे. अल्लाहचे पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाहची शांती आणि कृपा असो) म्हणाले : "एखाद्या व्यक्तीने आपल्या पाल्याला वाया घालविणे मोठे पाप आहे."[1]

तरी इस्लामने ठरवले की आत्मसुधारणा व स्वयंशिस्त हे जग न सोडता सत्कृत्ये करून व वासनेचा प्रतिकार करून करावे. इस्लाम मध्ये एक व्यक्ती आपल्या समाजात राहून त्याची बांधणी करू शकते आणि त्याच वेळी अल्लाह जवळ मोक्षही मिळवू शकते आणि यासाठी त्याला हिंदू धर्मा प्रमाणे देह जाळण्याची आवश्यकताही नाही

अल्लाहने सांगितले

{وَأَمَّا مَنْ خَافَ مَقَامَ رَبِّهِ وَنَهَى النَّفْسَ عَنِ الْهَوَىٰ ﴿٤٠﴾ فَإِنَّ الْجَنَّةَ هِيَ الْمَأْوَىٰ ﴿٤١﴾}

---

[1] हिंदू: त्यांची धार्मिक श्रद्धा आणि प्रथा, ज्युलियस जे. लिपनर, पृष्ठ ८.

४०. तथापि, जो मनुष्य आपल्या पालनकर्त्यासमोर उभे राहण्यापासून भीत राहिला असेल आणि आपल्या मनाला इच्छा-अभिलाषांपासून रोखले असेल.

४१. तर त्याचे ठिकाण जन्नत (स्वर्ग) च आहे. सुरह अल नाजिआत

अल्लाहची भीती बाळगणे आणि सत्कृत्ये करणे हाच स्वर्गाचा मार्ग आहे, जरी तुम्ही एखाद्या महालात जीवन जगत असाल.

आत्म्याला शिस्त लावण्यासाठी शरीर जाळण्याची गरज नाही.

{فَلَا اقْتَحَمَ الْعَقَبَةَ ﴿١١﴾ وَمَا أَدْرَاكَ مَا الْعَقَبَةُ ﴿١٢﴾ فَكُّ رَقَبَةٍ ﴿١٣﴾ أَوْ إِطْعَامٌ فِي يَوْمٍ ذِي مَسْغَبَةٍ ﴿١٤﴾ يَتِيمًا ذَا مَقْرَبَةٍ ﴿١٥﴾ أَوْ مِسْكِينًا ذَا مَتْرَبَةٍ ﴿١٦﴾ ثُمَّ كَانَ مِنَ الَّذِينَ آمَنُوا وَتَوَاصَوْا بِالصَّبْرِ وَتَوَاصَوْا بِالْمَرْحَمَةِ ﴿١٧﴾ أُولَـٰئِكَ أَصْحَابُ الْمَيْمَنَةِ ﴿١٨﴾}

११. तेव्हा, घाटीत प्रवेश करणे त्याला शक्य झाले नाही.

१२. तुम्हाला काय माहीत की तो घाटी मार्ग काय आहे?

१३. एखाद्याची मान सोडविणे (दास, दासी) मुक्त करणे.

१४. किंवा भुकेच्या दिवशी पोटभर जेवु घालणे.

१५. एखाद्या नातेवाईक अनाथाला.

१६. किंवा मातीस मिळालेल्या अतिशय गरीब माणसाला.

१७. मग त्या लोकांपैकी झाला असता, जे ईमान राखतात, आणि एकमेकांना धीर संयम व दया करुणा करण्याची ताकीद करतात.

१८. हेच लोक आहेत उजव्या बाजूचे. सुरह अल बलद

स्वर्ग प्राप्तीसाठी तुम्हाला गुलामांना मुक्त करावे लागेल, गरिबांना अन्न द्यावे लागेल, चांगले कर्म करावे लागेल आणि लोकांना चांगले करण्याचा सल्ला द्यावा लागेल.

अशा प्रकारे तुम्ही मुक्ती प्राप्त कराल.

लोकांपासून दूर होऊन आयुष्यभर भीक मागून नव्हे !

### १६ - इस्लाम हिंदू धर्म का नाकारतो?

आज हिंदू धर्म हा कोणताही धर्म किंवा संप्रदाय किंवा विश्वासाभिमुखता नाही, तर वेदांचे तत्त्वज्ञान आणि संन्यासी, गूढ तंत्र आणि अगणित विधी यांचे मिश्रण बनले आहे.

म्हणून, हिंदू धर्मात एकच भक्ती प्रणाली, किंवा परिभाषित वैशिष्ट्यांसह विधी प्रणाली, किंवा एक निश्चित धार्मिक पद्धत, किंवा हिंदूंना एकत्र आणणारी केंद्रीय धार्मिक रचना नाही. आज, तुम्हाला त्यातले काहीही सापडणार नाही, कारण तुम्ही अक्षरशः हजारो पूर्णपणे धर्मशास्त्रीयदृष्ट्या स्वतंत्र धार्मिक मंडळ्यांच्या डायस्पोरासमोर आहात![1]

देवाची उपासना इतकी गोंधळात टाकणारी गोष्ट कशी होऊ शकते ज्या बाबत त्याने काहीहि पुरावा उतरविला नाही?

धारणांचे हे गोंधळलेले मिश्रण जीवनाचा सारांश म्हणून कसे घेतले जाऊ शकते?

मग आताचे हिंदू देवाचा अवतार मानून मूर्ती पुजताना दिसतात !

[1] लेव्हीटिकस, अध्याय १५, वचने २०-२४.

जरी सर्वशक्तिमान अल्लाहने मूर्तींना त्याचे अवतार मानून त्याच्या जवळ जाणाऱ्यांना काफिर म्हणून वर्णन केले आहे.

{أَلَا لِلَّـهِ الدِّينُ الْخَالِصُ ۚ وَالَّذِينَ اتَّخَذُوا مِن دُونِهِ أَوْلِيَاءَ مَا نَعْبُدُهُمْ إِلَّا لِيُقَرِّبُونَا إِلَى اللَّـهِ زُلْفَىٰ إِنَّ اللَّـهَ يَحْكُمُ بَيْنَهُمْ فِي مَا هُمْ فِيهِ يَخْتَلِفُونَ ۗ إِنَّ اللَّـهَ لَا يَهْدِي مَنْ هُوَ كَاذِبٌ كَفَّارٌ}

ऐका! अल्लाहच्याचकरिता विशुद्ध (निर्भेळ) उपासना करणे आहे, आणि ज्या लोकांनी त्याच्याखेरीज अवलिया बनवून ठेवले आहेत (आणि असे म्हणतात) की आम्ही यांची उपासना केवळ एवढ्यासाठी करतो की हे (बुजुर्ग, थोर) आम्हाला अल्लाहच्या निकट करतील, हे लोक ज्या गोष्टीबाबत मतभेद करीत आहेत, तिचा (न्यायसंगत) फैसला अल्लाह स्वतः करील, खोट्या आणि कृतघ्न लोकांना अल्लाह मार्ग दाखवित नाही. (३) सुरह अज़-जुमर.

आणि हिंदूंनी, मूर्ती धारक होऊन, मी आधी सांगितल्याप्रमाणे वेदांचे खंडन केले, आणि त्यांनी त्यांच्या जन्मजात स्वभावाचे उल्लंघन केले, कारण त्यांना माहित आहे की त्यांनी त्यांच्या मूर्तींना देवाचे अवतार बनवल्याचा जन्मजात पुरावा त्यांच्याकडे नाही.

{أَمَّن يَبْدَأُ الْخَلْقَ ثُمَّ يُعِيدُهُ وَمَن يَرْزُقُكُم مِّنَ السَّمَاءِ وَالْأَرْضِ ۗ أَإِلَـٰهٌ مَّعَ اللَّـهِ ۚ قُلْ هَاتُوا بُرْهَانَكُمْ إِن كُنتُمْ صَادِقِينَ}

६४. असा कोण आहे जो सृष्टीला पहिल्यांदा निर्माण करतो, मग तिला पुन्हा निर्माण करील, जो तुम्हाला आकाश आणि जमिनितून आजिविका प्रदान करीत आहे. काय अल्लाहसोबत

दुसराही कोणी उपास्य आहे? सांगा, सच्चे असाल तर आपले प्रमाण (पुरावा) आणा. (६४) सुरह अन-नमल.

त्यांच्याजवळ काय पुरावा आहे !

त्यांच्याजवळ काय पुरावा आहे !

सध्याच्या हिंदू धर्माची समस्या अशी आहे की तो मूर्तिपूजकतेला अतिशयोक्ती देतो आणि त्याला धर्माचा आधारस्तंभ बनवतो.

तरी सर्वत्र मुरत्याच मुर्त्या आहेत.

(ते मानतात की) मूर्तीमध्ये देवता अवतरली आहे.

हिंदू धर्मात हजारो मूर्ती, प्रतिमा आणि चिन्हे आहेत.

हिंदू धर्म हा मूर्तींचा, मानवांचा आणि प्रतिकांचा धर्म बनला आहे.

आजचा हिंदू धर्म हे देखील म्हणतो: अस्तित्वाचे एकत्व.

आजचा हिंदू धर्म असेही म्हणतो: जगाचे अनंतकाळ.

हा जातीवादाचाही पाया आहे.

आजचा हिंदू धर्म मानवामध्ये देवाचा अवतार माणतो जसे : "अवतार".

मूर्ती आणि वस्तुंमध्ये देवता अवतार घेतात जसे : "शक्ती."

आणि वर्तमान हिंदू धर्म हे हि मानतो : आत्म्यांचा पुनर्जन्म.

आणि तो पुनर्जन्माचे हि समर्थन करतो.

तो पाच घटक आणि त्यांचे अनुसरण करणारे तावीज आणि ताबीज आणि त्यांची देवाशिवाय इतरांशी संलग्नता मानतो.

या सर्वांसाठी, इस्लाम हिंदू धर्म नाकारतो, कारण त्याने पैगंबरांच्या शिकवणींचे उल्लंघन केले आणि एकेश्वरवाद विसरला.

इस्लाम प्रत्येक हिंदूला इस्लामद्वारे अल्लाहकडे परत जाण्याचे आवाहन करतो, कारण त्याशिवाय अल्लाहजवळ मोक्ष मिळणार नाही.

अल्लाह ने सांगितले

{إِنَّ الدِّينَ عِندَ اللَّـهِ الْإِسْلَامُ}

{अल्लाह जवळ मान्य धर्म इस्लामच आहे} (१९) सुरह आले इम्रान.

सर्वशक्तिमान अल्लाह ने सांगितले :

{وَمَن يَبْتَغِ غَيْرَ الْإِسْلَامِ دِينًا فَلَن يُقْبَلَ مِنْهُ وَهُوَ فِي الْآخِرَةِ مِنَ الْخَاسِرِينَ}

{आणि जो कोणी इस्लाम सोडून दुसरा धर्म शोधतो, तो त्याच्याकडून स्वीकारला जाणार नाही आणि तो परलोकात नुकसान सोसणाऱ्यांमध्ये असेल.} (८५) सुरह आले इम्रान.

सर्वशक्तिमान अल्लाह ने सांगितले :

{الْيَوْمَ أَكْمَلْتُ لَكُمْ دِينَكُمْ وَأَتْمَمْتُ عَلَيْكُمْ نِعْمَتِي وَرَضِيتُ لَكُمُ الْإِسْلَامَ دِينًا}

{आज मी तुमच्यासाठी तुमचा धर्म परिपूर्ण केला आहे, आणि तुमच्यावरील माझा उपकार पूर्ण केला आहे आणि तुमच्यासाठी इस्लामला धर्म म्हणून स्वीकारले आहे. } (३) सुरह अल माइदा

या धर्म ... इस्लाम शिवाय हिंदू किंवा कोणत्याही मानवाचा उद्धार नाही.

इस्लाम हा पृथ्वीवरील धर्मांमधील सामान्य धर्म नाही, तर तो एकमेव एकेश्वरवादी धर्म आहे ज्या सह अल्लाहने सर्व संदेष्ट्यांना पाठवले. सर्व संदेष्ट्यांनी लोकांना एकेश्वरवादाची हाक दिली, आणि आज इस्लामशिवाय या शुद्ध एकेश्वरवादावर कोणताही धर्म शिल्लक राहिलेले नाही. बाकीच्या धर्मांमध्ये बहुदेववादाचा शिरकाव झाला आहे, मग तो कमी असो व जास्त.

इतर सर्व गोष्टींशिवाय केवळ ईश्वराची उपासना, त्याच्या आज्ञांचे पालन करणे, त्याच्या निषिद्धांचा त्याग करणे आणि त्याच्या मर्यादांवर थांबून जाणे. आणि भूतकाळ व भविष्याबद्दल त्याने सांगितलेल्या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवणे तसेच सर्व मूर्ती, प्रतिमा आणि चिन्हांना नकार देणे म्हणजेच इस्लाम आहे.

सर्वशक्तिमान अल्लाह ने सांगितले :

{سُبْحَانَ رَبِّكَ رَبِّ الْعِزَّةِ عَمَّا يَصِفُونَ}

पवित्र आहे तुमचा पालनकर्ता, जो मोठा प्रतिष्ठा बाळगणारा आहे, त्या प्रत्येक गोष्टीहून जी (अनेकेश्वरवादी) बोलत असतात. (१८०) सुरह अस-साफ्फात

हिंदू जे देवाचे मूर्तिमंत अवतार होण्याचे बोलतात अल्लाहने स्वतःला त्यापासून वेगळे केले आहे.

{وَسَلَامٌ عَلَى الْمُرْسَلِينَ}

{आणि दूतांवर शांती असो}

(१८१) सुरह अस-साफ्फात

अशा दूतांवर शांती असो जे लोकांना त्यांच्या परमेश्वराची ओळख करून देतात आणि त्याला प्रत्येक कमतरतांपासून दूर ठेवतात.

### १७ - प्रत्येक हिंदूने इस्लाम का स्वीकारावा?

एकीकडे निःसंदेह इस्लाम हाच तो धर्म आहे जो देवाने आपल्या सेवकांसाठी पसन्त केला आहे आणि तो दैवी नियम आहे, ज्याशिवाय दुसरा कोणताही धर्म तो स्वीकारत नाही. दुसरीकडे, हिंदू पुस्तकांमध्ये, ज्यात पूर्वदूतांच्या (पैगम्बरांच्या) भविष्यवाण्यांचे अवशेष असू शकतात. इस्लामच्या अनेक चांगल्या बातम्या आणि इस्लामचे प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाहची कृपा आणि शांती असो) यांच्या आगमनाचा उल्लेख केला गेला आहे, आणि असा दावा केला गेला आहे की जो हिंदू इस्लाम स्वीकारतो पुनरुत्थानाच्या दिवशी अल्लाहसमोर त्याच्या मोक्षप्राप्तीमध्ये कसलीही शंका राहत नाही.

मी इस्लामच्या हिंदू धर्मग्रंथातील काही आनंदाच्या बातम्यांचा उल्लेख करेन.

परंतु हिंदूंच्या पुस्तकांतील शुभवार्तांकडे वळण्यापूर्वी, हिंदू कायद्याची स्थिती आणि शुद्धीसाठी हिंदू त्यांचे शरीर कसे जाळतात या बद्दल जाणून घेणे योग्य ठरेल.

आणि हे की हिंदू अनैसर्गिक तपस्याचे विधी कसे करतात.

पुस्तकधारक (यहूदी आणि ख्रिश्चन) लोकांपासून पासून ही परिस्थिती लपलेली नाही, कारण या पुस्तकधारकांसाठी, विशेषतः ज्यूंना देखील शुद्धतेवर अनेक बंधने होते आणि

खानपानावर कठोर निर्बंध होते आणि त्यांच्या अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचारामुळे त्यांच्यावर कायदेविषयक तरतुदींशी संबंधित अनेक बंधने लादल्या गेले होते.

सर्वशक्तिमान अल्लाह पवित्र कुराण मध्ये म्हणतो

{فَبِظُلْمٍ مِّنَ الَّذِينَ هَادُوا حَرَّمْنَا عَلَيْهِمْ طَيِّبَاتٍ أُحِلَّتْ لَهُمْ وَبِصَدِّهِمْ عَن سَبِيلِ اللَّـهِ كَثِيرًا} ﴿١٦٠﴾

(तरी यहूदी लोकांच्या चुकीच्या कृत्यामुळे आणि लोकांना अल्लाहच्या मार्गापासून रोखल्यामुळे, आम्ही त्यांच्यासाठी वैध केलेल्या चांगल्या गोष्टी त्यांना प्रतिबंधित केल्या) (१६०) सुरह अल निसा.

तोरामधील लेव्हीटिकसच्या पुस्तकात ज्यू स्त्रीवरील मासिक पाळीचे नियम वाचणे तुमच्यासाठी पुरेसे आहे. तोराह म्हणते:

आणि मासिक पाळीच्या वेळी ती ज्या अंथरुणावर झोपते ते अशुद्ध आहे आणि ती ज्यावर बसते ते अशुद्ध आहे. आणि जो कोणी तिच्या पलंगाला स्पर्श करेल त्याने आपले कपडे धुवावे आणि पाण्याने स्नान करावे आणि संध्याकाळपर्यंत तो अशुद्ध राहील. आणि ती बसलेल्या कोणत्याही वस्तूला जो कोणी स्पर्श करेल त्याने आपले कपडे धुवावे व पाण्याने स्नान करावे आणि संध्याकाळपर्यंत तो अशुद्ध राहील. आणि जर पलंगावर किंवा ज्या वस्तूवर ती बसलेली असेल त्याला त्याने स्पर्श केला तर ते अशुद्ध आहे. आणि जर एखादा पुरुष तिच्याशी निजला आणि

तिला मासिक पाळी आली तर तो सात दिवस अशुद्ध राहील. आणि प्रत्येक बिछाना ज्यावर तो झोपेल अशुद्ध होईल.[1]

हे कठोर निर्णय इस्रायलच्या मुलांचा क्रौर्य आणि त्यांची अंतःकरणे कठोर झाल्यामुळे होते.

अलाहने त्यांना तोरामध्ये सांगितले होते की तो एक संदेष्टा पाठवेल जो त्यांच्यावरील हे सर्व बंधने उचलेल.

तोराह आपल्याला सांगते की प्रेषित याकोबच्या मृत्यूच्या वेळी, (त्यांच्यावर शांती असो), त्याने आपल्या बारा मुलांना एकत्र केले आणि त्यांना सल्ला देण्यास सुरुवात केली, तोरामधील याकोबच्या प्रसिद्ध मृत्यूपत्रात. तोराह म्हणते:

तेव्हा याकोबाने आपल्या मुलांना बोलावून सांगितले, "एकत्र व्हा, म्हणजे शेवटच्या दिवसांत तुमच्यावर काय घडेल ते मी तुम्हांला सांगेन. याकोबाच्या मुलांनो, एकत्र या आणि ऐका आणि तुमच्या बाप इस्राएलचे ऐका.

...

मग ते यहूदाला म्हणाले आणि यहूदा डेव्हिड, शलमोन आणि मशीहा (त्या सर्वांवर अल्लाहची कृपा आणि शांती असो) या संदेष्ट्यांचे आजोबा होते:

त्याने सांगितले :

---

1 उत्पत्ति, अध्याय: ४९, क्रमांकः १-२ आणि १०.

शिलोन येईपर्यंत राजदंड यहूदापासून दूर जाणत नाही आणि राज्यकर्ते त्याच्या संतती मधून होतील आणि लोकांचे अधीनता त्याच्याकडे असेल. [शु ६२].[1]

पुस्तक धारक लोकांमध्ये वाद नसलेला हा मजकूर एक महान आणि अतिशय महत्त्वाची सुवार्ता दर्शवतो!

ही एक चांगली बातमी आहे अशा एका इसमाबाबत जो लवकरच येणार आहे, आणि मग तो दूत (पैगम्बर) होईल आणि राज्य व धर्मकायदा त्याच्या हातात जाईल.

राजदंड यहूदापासून दूर जाणार नाही: राजदंड हा न्यायाचा राजदंड आहे, याचा अर्थ शिलोन येईपर्यंत संदेष्टे (पैगम्बर) शासक यहूदाच्या वंशजांमध्ये असतील

आणि लोक त्याच्या अधीन राहतील.

याकोब, त्याच्यावर शांती असो, ने भविष्यवाणी केलेले हे शिलोन आहे तरी कोण, आणि लोक कोणाच्या अधीन होतील?

या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी, आपण हे जाणून घेतले पाहिजे की इस्रायलच्या संदेष्ट्यांपैकी शेवटचा संदेष्टा येशू मशीहा होता, (त्यांच्यावर शांती असो) आणि तो यहूदाचा वंशज होता.

त्यानंतर इस्रायलच्या मुलांमध्ये संदेष्ट्यांचा अचानक थांबा झाला!

---

1 https://www.christiancourier.com/articles/1101 -who-is-the-mysterious-shiloh Rest-giver or peace-bringer. http://www.abideinchrist.com/messages/gen49v8.html Shiloh is the man of rest, the giver of rest or rest-bringer

आणि याकोब (त्याच्यावर शांती असो) च्या भविष्यवाणीनुसार, असे गृहीत धरले जाते की इस्राएलच्या मुलांमध्ये संदेष्टे (पैगम्बर) होणे थांबल्यानंतर यहूदाच्या संतती व्यतिरिक्त दुसर्यार एका व्यक्तीकडे नियम, पैगम्बरी आणि कायदा प्रसारित झाला असेल, नव्हे का?

ही व्यक्ती मसिहा नाही हे उघड आहे, कारण ख्रिस्त हा यहूदाचा वंशज होता!

आणि ही व्यक्ती, त्याच्या राष्ट्राला याकोबच्या भविष्यवाणीनुसार यहूदाची भूमी प्राप्त होईल, “यहूदाचा राजदंड नाहीसा  होणार नाही, राज्यकर्ते त्याच्या संतती मधून होतील आणि लोकांचे अधीनता त्याच्याकडे असेल. या येणाऱ्या संदेष्ट्याचे राष्ट्र भूमी ताब्यात घेईल...पॅलेस्टाईन ताब्यात घेईल, आणि सर्वात मोठी साम्राज्ये त्याच्या राष्ट्राचे अधीन होईल!

आणि उमर इब्न अल-खत्ताब अल्लाह त्याच्यावर प्रसन्न होवो, च्या ख़िलाफत दरम्यान, त्याला यहूदाचा देश प्राप्त झाला. आणि लेव्हंट, इराक आणि पर्शिया इस्लाम समोर झुकले.

या वस्तुस्थितीला दूरदृष्टीची किंवा संपादनाची गरज नाही!

म्हणून इतिहास आपल्याला सांगतो की याकोबने त्यांच्या मुलांना दिलेल्या समजुती मधील पैगम्बरी पूर्ण झाली आहे, आणि ती मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाहची कृपा आणि शांती असो) व्यतिरिक्त इतर कोणत्याही संदेष्ट्याला लागू होत नाही,

आणि त्याचा तपशिल त्याच्या राष्ट्रांशीवाय दुसऱ्या राष्ट्रांसोबत घडले नाही.

पण शिलोनचा अर्थ तरी काय?

शिलोन अर्थात : आराम देणारा किंवा साधने उठविणारा Rest-giver . जुन्या करारात विशेषीकृत असलेल्या अनेक बायबलसंबंधी अभ्यास साइट्स मध्ये हाच अर्थ आहे.[1]

याकोब (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा असो), त्यांना एका इसमाबाबत शुभसमाचार देतात जो त्यांच्यावरील मर्यादा आणि निर्बंध दूर करेल.

तरी आता आपल्याला अल्लाह सर्वशक्तिमानाचे हे म्हणणे वाचले पाहिजे

{الَّذِينَ يَتَّبِعُونَ الرَّسُولَ النَّبِيَّ الْأُمِّيَّ الَّذِي يَجِدُونَهُ مَكْتُوبًا عِندَهُمْ فِي التَّوْرَاةِ وَالْإِنجِيلِ يَأْمُرُهُم بِالْمَعْرُوفِ وَيَنْهَاهُمْ عَنِ الْمُنكَرِ وَيُحِلُّ لَهُمُ الطَّيِّبَاتِ وَيُحَرِّمُ عَلَيْهِمُ الْخَبَائِثَ وَيَضَعُ عَنْهُمْ إِصْرَهُمْ وَالْأَغْلَالَ الَّتِي كَانَتْ عَلَيْهِمْ}

१५७. जे लोक अशा अशिक्षित (जगातील गुरुजनांद्वारे शिक्षण न घेतलेल्या) पैगंबराचे अनुसरण करतात, जे त्या लोकांना आपल्या जवळच्या तौरात आणि इंजीलमध्ये लिहिलेले आढळतात. ते त्यांना नेकीच्या कामांचा आदेश देतात आणि दुष्कर्मांपासून रोखतात आणि पाक (स्वच्छ-शुद्ध) वस्तू हलाल (वैध) असल्याचे सांगतात आणि नापाक (अस्वच्छ-अशुद्ध) वस्तू हराम (अवैध) असल्याचे सांगतात आणि त्या

---

[1] हिंदू धर्माच्या शुभवर्तमानांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी, याकोब (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा असो) च्या त्यांच्या मुलांना सुवार्तेमध्ये त्याचे तपशीलवार वर्णन केले आहे, कारण तो इस्लामच्या बाहेरून इस्लामच्या वैधतेचा स्वतंत्र पुरावा आहे.

लोकांवर जे ओझे आणि गळ्याचे फास होते, त्यांना दूर करतात. [सुरह आराफ : १५७]

तो त्यांच्यावरील मर्यादा आणि निर्बंध दूर करेल : इस्लामच्या सहिष्णू आणि सुलभ कायद्याने हे सर्व मर्यादा आणि बंधने उठवली आहेत.

चला आता हिंदूंच्या पवित्र ग्रंथांकडे वळूया[1]

हिंदू धर्म अगदी वेगळा आहे, जसे पूर्वी उल्लेख केला गेला पापांपासून मुक्ती मिळविण्यासाठी वासना शमविण्याकरीता कठोर कर्मकांडाने ते भरलेले आहे.

हिंदू धर्माची पुस्तके एका महान पैगम्बराची शुभवार्ता देतात जो त्यांची बंधने दूर करील आणि त्यांना पापांपासून मुक्ती मिळवून देईल.

हिंदू ग्रंथात असे म्हटले आहे: "कल्कीचा जन्म माघ महिन्यात चंद्राच्या पुनरागमनाच्या बाराव्या दिवशी झाला आहे."[2]

कल्कि म्हणजे: पापांची शुद्धी करणारा.

आणि माघ महिना: हा वसंत ऋतूचा महिना आहे जो आत्म्यांवर प्रेम करतो.

तरी येणार संदेष्टा जो त्यांना त्यांच्या पापांपासून शुद्ध करेल त्याचा जन्म वसंत ऋतू महिन्याच्या बाराव्या दिवशी होईल.

---

1 कल्की पुराण, अध्याय : २, श्लोक: १५.

2 सहिह अल-सिरा अल-नबवी, मुहम्मद बिन नासेर अल-अल्बानी, पृ. १३, पुस्तकातून उद्धृत: हिंदूंना इस्लामचे आमंत्रण, पीएच.डी. प्रबंध: डॉ. इब्राहिम अब्दुल गफूर, पृष्ठ १९८.

आणि प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), जसे की बहुसंख्य मुस्लिम विद्वान मानतात, त्यांचा जन्म रबी अल-अव्वलच्या बाराव्या दिवशी झाला.[1]

त्यांच्या जन्मस्थानाबद्दल (अल्लाहची कृपा आणि शांती असो त्यांच्यावर), पवित्र हिंदू ग्रंथांमध्ये असे नमूद केले आहे: "कल्कीचा जन्म संभल गावात, घराच्या अंगणात, विष्णू यास नावाच्या माणसाच्या घरी होईल. "[2]

संभल गाव अर्थात : सुरक्षित शहर

आणि सुरक्षित शहर म्हणजे मक्का

{وَإِذْ قَالَ إِبْرَاهِيمُ رَبِّ اجْعَلْ هَٰذَا بَلَدًا آمِنًا}

{आणि जेव्हा अब्राहाम म्हणाला, "माझ्या प्रभू, याला सुरक्षित शहर बनव.} (१२६) सुरह अल-बकरा.

पैगंबरांचा जन्म (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) मक्का येथे झाला.

राहिले हे म्हणणे की : "विष्णुदास नावाच्या माणसाच्या घरात," "तर विष्णुदास " या शब्दाचा अर्थ: अब्दुल्लाह .

राहिली गोष्ट या येणार्या संदेष्ट्याच्या आईबद्दल तर, तिला सोमती असे म्हणतात: "कल्कीचा जन्म विष्णुदासच्या घरात त्याची पत्नी सोमतीपासून होईल."[3]

---

1 कल्कि पुराण , अध्याय: २, श्लोक: ४.
2 कल्कि पुराण , अध्याय: २, श्लोक: ११.
3 अल-हाकीमने अल-मुस्तदरकमध्ये कथन केले आहे, आणि म्हणाले : ही एक वर्णनकर्त्यांची प्रामाणिक साखळी असलेली हदीस आहे.

सोमतीचा अर्थ सुरक्षित असा होतो ज्याला अरबी मध्ये "आमीना" म्हणतात.

हे ज्ञात आहे की मुहम्मद बिन अब्दुल्लाह, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), त्यांच्या आईचे नाव आमीना आहे.

हिंदू धर्मानुसार, कल्की त्याच्या संभल गावातून बाहेर पडेल, सैतानाशी लढेल आणि अंधार, भ्रष्टाचार आणि अत्याचार दूर करेल आणि नंतर त्याच्या शेवटच्या दिवसात परत तेथे येईल, ज्यानंतर देव त्याला स्वर्गात उठवेल.

प्रत्येक मुस्लिमाला ही वस्तुस्थिती माहीत आहे. प्रेषित मुहम्मद बिन अब्दुल्ला, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), मक्का सोडून मदीनाला गेले आणि लोकांमध्ये एकेश्वरवाद पसरवला, नंतर त्याच्या मृत्यूच्या काही वर्षांपूर्वी विजयी म्हणून मक्केत परतले.

हिंदू धर्माने या येणार्या संदेष्ट्याच्या वैशिष्ट्यांमध्ये भर घातली आहे ज्याशी आपण सहमत नाही, जसे की कल्कीला त्यांनी - नेहमीप्रमाणे - देवाचे मूर्त स्वरूप ठरविले आहे, पण अल्लाह त्यांच्या या कल्पनेपेक्षा खूप श्रेष्ठ आहे, आणि वेदांच्या माध्यमातून या आधी तपशीलवार आम्ही या दोषारोपणाचा रद्द केला आहे.

अल्लाह त्याच्या निर्मितीमध्ये अवतरलेला नाही किंवा त्याचे आकाश किंवा पृथ्वी त्याला व्यापत नाही.

परंतु या येणाऱ्या पैगंबराबद्दल त्यांच्या पुस्तकांमध्ये मला चकित केलेल्या वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे तो पांढर्या घोड्यावर स्वार होईल आणि पैगम्बरांकडे, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), अल-मुर्तजीझ नावाचा पांढरा घोडा होता.[1]

हिंदू पुतळ्यांमध्ये येणाऱ्या संदेष्टा कल्कीची प्रतिमा पांढऱ्या घोड्यावर स्वार होऊन खांद्यावर तलवार उचलत असल्याचे चित्रित केले आहे आणि कल्कीच्या जेवढ्या हिंदू प्रतिमा आणि पुतळे तुम्ही बघाल सर्वांत असेच चित्रण केले गेले आहे.

तो एक लढवय्या संदेष्टा आहे, आणि हे प्रेषित मुहम्मद बिन अब्दुल्लाह यांचे वर्णन आहे, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), तरी ते तलवारीने लढले आणि अल्लाहच्या शत्रूंशी त्यांनी युद्ध केले.

तसेच त्यांच्या पुस्तकांमध्ये येणार्या कल्की संदेष्ट्याच्या वैशिष्ट्यांमधे हे सुद्धा आहे की, तो अदृश्य गोष्टींबद्दल सांगेन, तो त्यांच्या सर्वश्रेष्ठ लोकांपैकी एक असेल, तो कमी बोलणारा, उदार असेन, मजबूत शरीरयष्ठी असलेला कृतज्ञ असेल.

परंतु त्याचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे: "कल्की आपल्या चार साथीदारांच्या मदतीने सैतानाचा नाश करेन."[2]

प्रत्येक मुस्लिम जेव्हा हा मजकूर वाचतो तेव्हा त्याच्या मनात अबू बकर अल-सिद्दीक, उमर बिन अल-खत्ताब, उस्मान

---

1 कल्कि पुराण , अध्याय: २, श्लोक: ५.
2 कल्कि पुराण , अध्याय: २, श्लोक: ७.

बिन अफ्फान आणि अली बिन अबी तालिब (अल्लाह त्या सर्वांवर कृपा कर) यांचीच नवे येतात.

हे पैगंबराचे (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) सर्वात जवळचे सहकारी आहेत, आणि त्यांनीच पैगम्बरांना त्यांच्या इस्लामच्या आमंत्रणाच्या सुरुवातीपासून पाठिंबा दिला आणि ते त्यांच्या नंतर त्यांचे उत्तराधिकारी झाले.

पैगंबरांचे, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), चार अतिशय प्रतिष्ठित साथीदार होते जे त्यांच्या अत्यंत जवळ होते आणि त्यांच्या इस्लामकडे आमंत्रणामध्ये त्यांना प्रत्यक्ष पाठिंबा दिला.

आणि हेच त्यांच्या मृत्यूपश्चात पाठोपाठ त्यांचे खलिफा झाले.

१ - अबू बकर अल-सिद्दीक.

२ - उमर बिन अल-खत्ताब.

३ - उस्मान बिन अफ्फान .

४ - अली बिन अबी तालिब.

अली बिन अबी तालिब (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो) च्या मृत्यूने, योग्य-मार्गदर्शित खलीफांचा काळ संपला.

कल्किचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या युद्धात त्याला मदत करण्यासाठी देवदूत स्वर्गातून उतरतात.[1]

हे प्रेषित (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) च्या काळातील इस्लामि जिहादच्या वैशिष्ट्यातून एक

---

[1] कल्कि पुराण , अध्याय: ३, श्लोक: १-५.

वैशिष्ट्य आहे की त्यांच्या लढायांमध्ये आकाशातून त्यांच्या मदतीकरिता देवदूत उतरत असत. या बाबत अल्लाहने फर्माविले :

{إِذْ تَسْتَغِيثُونَ رَبَّكُمْ فَاسْتَجَابَ لَكُمْ أَنِّي مُمِدُّكُم بِأَلْفٍ مِّنَ الْمَلَائِكَةِ مُرْدِفِينَ}

९. त्या वेळेची आठवण करा, जेव्हा तुम्ही आपल्या पालनकर्त्यास दुआ (प्रार्थना) करीत होते, मग सर्वश्रेष्ठ अल्लाहने तुमची दुआ कबूल केली की मी तुमची एक हजार देवदूत (फरिश्त्यांद्वारे) मदत करीन जे लागोपाठ येत जातील. (सुरह अल-अन्फ़ाल)

हिंदूंच्या पुस्तकांमध्ये हे सुद्धा आहे की कल्की महान देवदूत "परशुराम" कडून शिकण्यासाठी पर्वतावर जाईल तद्नंतर तो उत्तरेकडे जाईल आणि अल्लाहने त्याला स्वर्गाकडे उचलण्यापूर्वी आपल्या वस्ती कडे परत येईल.[1]

आणि हिंदूंच्या मान्यतेनुसार परशुराम तो महान देवदूत (फरिश्ता) आहे जो अविश्वासू लोकांवर (अल्लाहच्या हुकुमाने) अज़ाब घेऊन येतो, आणि मुसलमानांजवळ त्याचेच नाव जिब्राइल आहे.

आणि वास्तविकता पैगंबर (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) "हिरा" च्या डोंगरावर गेले आणि जिब्राइल (अल्लाह ची कृपा त्यांच्यावर असो) तिथे उतरले. तद्नंतर ते उत्तरेकडे हिजरत करून मदिना ला पोहोचले आणि आपल्या मृत्यूच्या काही वर्षापूर्वी मक्केमध्ये विजेता होऊन परतले.

---

[1] भागवत पुराण खंड :१, अध्याय : ३ , श्लोक : २५.

आणि हिंदूंच्या पुस्तकांमध्ये कल्की शेवटचा दूत (पैगम्बर) होईल. [७३ ][1]

आणि हे ज्ञात आहे की प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) हे पैगंबर आणि दूतांपैकी शेवटचे आहेत .

{مَّا كَانَ مُحَمَّدٌ أَبَا أَحَدٍ مِّن رِّجَالِكُمْ وَلَـٰكِن رَّسُولَ اللَّـهِ وَخَاتَمَ النَّبِيِّينَ ۗ وَكَانَ اللَّـهُ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمًا}

४०. लोकांनो! मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) तुमच्या पुरुषांपैकी कोणाचेही पिता नाहीत, तथापि ते अल्लाहचे दूत (पैगंबर) आहेत आणि समस्त पैगंबरांमध्ये अंतिम पैगंबर आहेत, आणि अल्लाह प्रत्येक गोष्ट चांगल्या प्रकारे जाणणारा आहे. (सुरह अहजाब ४०)

हिंदूंच्या पुस्तकांमध्ये येणाऱ्या प्रेषिताचे गुणधर्म वर्णन करण्यात आले आहे, की तो खूप प्रशंसनीय ... नराशंस असेल.

टीप : नराशंस अर्थात प्रशंसनीय

म्हणजे मोहम्मद किंवा अहमद.

आणि हे दोन्ही, मुहम्मद आणि अहमद अल्लाहच्या पैगम्बरांची (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) नावे होती.

---

[1] अथर्ववेद, कांड: २०, सोक्त: १२७, मंत्र: २.

तसेच नराशंसची हि सुद्धा विशेषता आहे की त्याची स्वारी उंट असेल, त्याच्या बारा पत्न्या असतील, तो आपल्या रथाने आकाशाला स्पर्श करील, मग खाली उतरील.[1]

हे गुणधर्म प्रेषित मुहम्मद, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांच्याशिवाय कोणालाही लागू होत नाहीत.

त्यांच्या उंटावर स्वारी करण्याची हकीगत त्यांच्या जीवन चारित्र्यातून स्पष्ट आहे. हे, तसे, एक महत्त्वाचे चिन्ह आहे, हिंदू पुस्तकातील हे उल्लेख सांगतात की ते संदेष्ट्यांपैकी शेवटचे असतील, तथापि, ते कार आणि विमानांच्या शोधापूर्वी पाठवले जाईल.[2]

आणि या मध्ये आणखी एक संकेत आहे की हा येणारा संदेष्टा हिंदू ब्राह्मणांशिवाय असेल असा कारण त्यांनी उंटांना मनाई केली आहे.

त्यांना बारा बायका असतील, तर हे प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांच्या चरित्रावरून कळते की असे होते.

तो त्याच्या स्वारीने आकाशाला स्पर्श करील आणि नंतर खाली उतरेन, तर ही 'इसरा आणि मेराजच्या' प्रवासाची घटना आहे ज्यावर प्रत्येक मुस्लिम विश्वास ठेवतो की पैगंबरांना (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) अल्लाहने नकाशांचे आणि स्वर्गाचे प्रवास घडविले.

---

[1] हिंदूंना इस्लामचे आमंत्रण, पीएच.डी. प्रबंध. प्रबंधक : डॉ. इब्राहिम अब्दुलगफूर, पृष्ठ २१५.
[2] यजुर्वेद, कांड: २०, सूक्त : १२७, मंत्र : १.

त्याच अध्यायात, हिंदू धर्मग्रंथ सुद्धा नाराशन्सच्या स्थलांतराबद्दल बोलतात आणि त्यांची स्तुती करतात, असे म्हणतात: "लोकहो, नाराशन्सचा सन्मान करा, मी त्या स्थलांतरिताचे रक्षण करीन जो सुरक्षा आणि शांतता प्रस्थापित करतो."[७६ ][1]

तो स्थलांतरित: पैगंबरांच्या चरित्रातील सर्वात मोठी घटना म्हणजे लोकांमध्ये सुरक्षा आणि एकेश्वरवाद पसरवण्यासाठी प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांचे मक्का ते मदिना स्थलांतर.

आणि पुढील मंत्रात, ती त्यांच्या जिहादबद्दल बोलते (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), आणि म्हणते: "जो त्याची स्तुती करणार्यांलसह स्तुती करतो, तो युद्धांमध्ये जातो आणि लोकांसाठी शांतता कायम करतो."[2]

तो एक मुजाहिद पैगंबर आहे जो ईश्वराच्या मार्गात झटत लोकांमध्ये सुरक्षितता पसरवतो.

त्यांच्या पुस्तकांमध्ये इस्लामची खुशखबरी, इस्लामचे प्रेषित, त्यांचे चरित्र, त्यांचे आमंत्रण आणि मक्का अल-मुकर्रमा याबाबत अनेक मजकूर आहेत.

काही हिंदू यातील काही ग्रंथांशी असहमती दर्शवितात. ते यांचे स्पष्टपणे पैगंबराला (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि

---

1 यजुर्वेद, कांड: २०, सूक्त : १२७, मंत्र : ५.

2 अन्न-ब-उल अज़ीम (महान बातमी), डॉ. अब्दुल्ला दर्राज, (अल्लाह त्यांच्यावर दया करो), पृ. ४४-४५.

शांती असो) सूचित करणे नाकारतात. सत्याचा शोध घेणार्या हिंदूने या बाबींवर जास्त लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. मुळात, या शुभवार्ता आपुलकी निर्माण करण्याच्या उद्देशाने आहेत आणि आणखी काही नाही. म्हणून, मी त्यांची विपुलता आणि विविधता असूनही या आनंदाच्या बातमींवर फार लक्ष केंद्रित केले नाही, कारण इस्लामच्या अचूकतेचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे इस्लामचा संदेश, एकेश्वरवादाची हाक आणि त्यात अंतःप्रेरणेची हाक आहे. तसेच पृथ्वीवरील प्रत्येक धर्माचे मानवाचा हेतू आणि त्याचा शेवट जाणून घेण्याची मानवी गरज पूर्ण करण्यापासून अयशस्वी होणे होय.

तरी गोंधळलेल्या मूर्तिपूजकता, बहुदेववाद आणि नास्तिकता याशिवाय पृथ्वीवर काहीही राहिले नाही आणि इस्लामशिवाय कोणीही शुद्ध एकेश्वरवाद आणि अल्लाहच्या शुद्धतेवर कायम राहिले नाही.

{قُلْ هُوَ اللَّـهُ أَحَدٌ ﴿١﴾ اللَّـهُ الصَّمَدُ ﴿٢﴾ لَمْ يَلِدْ وَلَمْ يُولَدْ ﴿٣﴾ وَلَمْ يَكُن لَّهُ كُفُوًا أَحَدٌ ﴿٤﴾}

सांगून टाका : उपासणे योग्य अल्लाह तर एकच आहे.(१)
अल्लाह तर परिपूर्ण आहे. (२)
त्याने कुणाला जनले नाही किंवा तो जनला गेला नाही. (३)
आणि त्याच्या बरोबरीचे कोणीही नाही. (४)

सुरह अल-इखलास.

## १८ - इस्लाम म्हणजे काय?

उत्तर : इस्लाम आहे: सर्वशक्तिमान ईश्वर (अल्लाहची) अधीनता, त्यासमोर झुकणे आणि त्याचे आज्ञापालन.

सर्वशक्तिमान (अल्लाह) म्हणाले

{وَمَنْ أَحْسَنُ دِينًا مِّمَّنْ أَسْلَمَ وَجْهَهُ لِلَّـهِ وَهُوَ مُحْسِنٌ وَاتَّبَعَ مِلَّةَ إِبْرَاهِيمَ حَنِيفًا ۗ وَاتَّخَذَ اللَّـهُ إِبْرَاهِيمَ خَلِيلًا}

आणि धर्मामध्ये त्याहून चांगला कोण असू शकतो, जो अल्लाहकरिता पूर्णतः आत्मसमर्पण करील आणि तो सदाचारीही असेल आणि इब्राहीमच्या धर्माचे अनुसरण केलेला असेल जे एकाग्र होते आणि इब्राहीमला अल्लाहने आपला मित्र बनविले आहे. (१२५) सुरह निसा.

आणि त्याच्या चेहऱ्याचे देवाला शरण जाणे : म्हणजे, तो अल्लाहला समर्पण करतो आणि त्याच्या अधीन असतो, त्याची महिमा आहे, आणि आपल्या प्रभुची पवित्रता वर्णन करतो आणि धर्माबाबत हा व्यक्ती सर्वोत्तम आहे.

सर्वशक्तिमान (अल्लाह) म्हणाले :

{فَإِلَـٰهُكُمْ إِلَـٰهٌ وَاحِدٌ فَلَهُ أَسْلِمُوا ۗ وَبَشِّرِ الْمُخْبِتِينَ}

तुमचा देव एकच देव आहे, त्याच्याच अधीन राहा आहे आणि जे झुकणारे आहेत त्यांना आनंदाची बातमी द्या. (३४) सुरह अल-हज.

त्याच्याच अधीन राहा याचा अर्थ : त्याच्या शासनास अधीन राहा.

या श्लोक सूचित करतात की इस्लामचा अर्थ सर्वशक्तिमान ईश्वर अल्लाहला पूर्ण शरणागती, त्याच्या उदात्ततेमध्ये त्याला अधीनता आणि त्याच्या कायद्याचे आणि कार्यपद्धतीचे अनुमोदन आणि स्वीकृतीसह पालन करणे आहे आणि हेच इस्लामचे सार आणि वास्तविकता आहे.

इस्लाम म्हणजे अल्लाहला त्याच्या न्याय आणि कायद्यानुसार शरण जाणे.

इस्लाम हा सर्व मानवांसाठी अल्लाहचा धर्म आहे. असे सर्वशक्तिमान अल्लाह

{إِنَّ الدِّينَ عِندَ اللَّـهِ الْإِسْلَامُ}

म्हणाले : खरंच, अल्लाहजवळ मान्य धर्म तर इस्लामच आहे. (१९) सुरह आल इम्रान.

इस्लाम हा असा धर्म आहे ज्याशिवाय इतर धर्म अल्लाहला मान्य नाही.

{وَمَن يَبْتَغِ غَيْرَ الْإِسْلَامِ دِينًا فَلَن يُقْبَلَ مِنْهُ وَهُوَ فِي الْآخِرَةِ مِنَ الْخَاسِرِينَ}

{आणि जो कोणी इस्लाम सोडून दुसरा धर्म शोधतो, तो त्याच्याकडून स्वीकारला जाणार नाही आणि तो परलोकात नुकसान झालेल्यांमध्ये असेल.} (८५) सुरह आल इम्रान.

अल्लाहने इस्लाम धर्म घेऊनच सर्व संदेष्टे आणि दूत पाठवले. तरी सर्व पैगंबरांचा धर्म एकच आहे आणि तो म्हणजे इस्लाम, सर्व संदेष्टे एकेश्वरवाद घेऊन आले, जरी त्यांचे कायदे भिन्न असले तरीही.

अल्लाह ने सांगितले :

{وَمَا أَرْسَلْنَا مِن قَبْلِكَ مِن رَّسُولٍ إِلَّا نُوحِي إِلَيْهِ أَنَّهُ لَا إِلَـٰهَ إِلَّا أَنَا فَاعْبُدُونِ}

आणि आम्ही तुमच्याआधी जो कोणी दूत पाठवला त्याच्याकडे हाच संदेश पाठविला की माझ्याशिवाय कोणीही पूज्य नाही, म्हणून माझीच उपासना करा. (२५) सुरह अल-अंबिया.

या एकेश्वरवादावर इस्लामशिवाय कोणताही धर्म कायम राहिला नाही.

इस्लाम हा आज पृथ्वीवरील एकमेव एकेश्वरवादी धर्म आहे.

इतर धर्मकायद्यांशी संलग्न असलेल्या सर्वांचा बहुदेववादामध्ये कमी जास्त काही ना काही वाटा जरूर आहे. पैगंबरांच्या मृत्यूनंतर आणि त्यांनी लोकांना एकेश्वरवादावर सोडल्यानंतर, लोकांनी काळाबरोबर बहुदेववाद स्वीकारला आणि आज पैगम्बरांनी घेऊन आलेल्या शुद्ध एकेश्वरवादावर इस्लामशिवाय कोणताही धर्म उरलेला नाही.

म्हणून, इस्लामच्या शुद्धतेचा सर्वात मोठा पुरावा ज्याकडे हिंदूने लक्ष दिले पाहिजे तो म्हणजे या धर्माचा शुद्ध एकेश्वरवादी संदेश होय.

**१९ - ज्या प्रश्नांची उत्तरे देताना मन गोंधळून जातो त्या प्रश्नांना इस्लाममध्ये उत्तर आहे का: आपण कोठून आलो? आपण या जगात का आहोत? आणि पुढे कुठे जाणार आहोत?**

उत्तर: इस्लामने या सर्व प्रश्नांची उत्तरे कुरआनच्या एका श्लोकात दिली आहेत. आमला पालनकर्ता, त्याची महिमा असो, म्हणाला.

{وَمَا لِيَ لَا أَعْبُدُ الَّذِي فَطَرَنِي وَإِلَيْهِ تُرْجَعُونَ}

{मी 'त्या' ची पूजा का करू नये ज्याने मला निर्माण केले आणि त्याच्याकडेच मी परतविला जाईन} (२२) सुरह यासीन.

तुम्ही कुठून आलात? देवाने मला जन्माला घातले (ज्याने मला निर्माण केले).

आणि मी कुठे जाणार आहे? लवकरच मि अल्लाहकडे जाणार आहे जेणेकरून माझ्या कर्मांचा हिशोब घेतला जाईल (आणि तुम्ही त्याच्याकडे परतविले जाल).

तू या जगात का आलास? अल्लाहची उपासना करण्यासाठी आणि परीक्षेसाठी

मी अल्लाहची पूजा का करावी? ज्याने मला निर्माण केले त्या देवाची मी पूजा करणे स्वाभाविक आहे, कारण सेवक आणि त्याचा प्रभू यांच्यातील नातेसंबंधाचे स्वरूप हे आहे... की सेवक आपल्या परमेश्वराची आणि त्याच्या निर्मात्याची पूजा करतो. (आणि ज्याने मला निर्माण केले त्याची मी पूजा का करू नये !) .

एका आयतीने तीन महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे गोळा केली ज्यात लोक गोंधळलेले आहेत

{وَمَا لِيَ لَا أَعْبُدُ الَّذِي فَطَرَنِي وَإِلَيْهِ تُرْجَعُونَ}

{आणि ज्याने मला निर्माण केले त्याची मी पूजा का करू नये ! आणि त्याच्याकडेच मला परतविले जाईल} (२२) सुरह यासीन.

## २० - तुम्हाला कसे कळले की मुहम्मद, देवाच्या प्रार्थना आणि त्याच्यावर शांती असो, देवाचा दूत आहे?

उत्तर: निरुत्तर करणारे बहुसंख्य पुरावे नैतिक सातत्य आणि पूर्ण निश्चितता दर्शवते.

अॅारिस्टॉटल हा त्याच्या बहुसंख्य कामांमुळे तत्त्वज्ञ ठरला आहे, त्याने सांगितलेल्या एखाद्या वाक्याने किंवा त्याने केलेल्या तत्त्वज्ञानाच्या विश्लेषणाने नाही.

हिप्पोक्रेट्स हा त्याच्या वैद्यकीय प्रकल्पांच्या योगाने डॉक्टर आहे, त्याने केलेल्या शस्त्रक्रियेने नाही.

त्याचप्रमाणे, प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांच्याकडून प्रसारित निरुत्तर करणारे बहुसंख्य पुरावे नैतिक सुसंगतता आणि ते एक संदेष्टा असल्याची पूर्ण खात्री दर्शवितात.

जर तुम्ही त्यांचे (पैगम्बर, त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) चरित्र पाहिले तर, तुमच्या लक्षात की ते अत्यंत सत्यवादी आहेत, आणि त्यांच्या कट्टर विरोधकांच्या कबुलीमुळे त्यांचा सत्यवाद खूप प्रसिद्ध झाला, त्यांच्यावर कधीही खोटे बोलल्याचे किंवा अनैतिकतेचे आरोप केले गेले नाही. नंतर त्यांनी काही अदृश्य बद्दल बातम्या दिल्या ज्या जश्यास तश्या खऱ्या ठरल्या. याशिवाय, ते श्रद्धा आणि सिद्धांत ज्याकडे पहिल्या दिवसापासून त्यांनी लोकांना बोलाविले ते सर्व पूर्व संदेष्ट्यांच्या विश्वासाशी सहमत होते. तरी ते (पैगम्बर, त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), तेच आहेत

ज्यांच्या बाबतीत संदेष्ट्यांनी उपदेश केले आणि हिंदूंची पवित्र पुस्तकांनी त्यांच्या येण्याच्या शेकडो वर्षांपूर्वी त्यांच्या येण्याचे घोषवाक्य केली, हे सर्व त्यांच्या देवदूत (पैगम्बर) होण्याची नैतिक सातत्य आणि संदेशाच्या सत्यतेची पूर्ण खात्री यांचा फायदा देतात.

मग त्याने आणलेल्या सर्वात महान श्लोकाचे काय, जे नोबल कुरआन आहे?

कुराण ज्याच्या बाबतीत अल्लाहने तीच भाषा बोलणाऱ्या लोकांना आव्हान दिले होते की, त्यासारखे (ग्रन्थ) किंवा किमान एक सुरह (अध्याय) तरी घेऊन या, पण ते तसे करू शकले नाही.

{काय त्यांना असे म्हणायचे आहे की त्याने स्वतःच ते रचले आहे? तर त्यांना सांगून टाका : मग तुम्ही सुद्धा त्यासारखी एक तरी सुरह घेऊन या आणि हो अल्लाहशिवाय तुम्हाला शक्य असेल त्याला मदतीसाठी बोलवून घ्या, जर तुम्ही सच्चे असाल (तर करूनच दाखवा).}(३८) सुरह यूनुस

सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र कुराणमध्ये म्हटले आहे

{وَإِن كُنتُمْ فِي رَيْبٍ مِّمَّا نَزَّلْنَا عَلَىٰ عَبْدِنَا فَأْتُوا بِسُورَةٍ مِّن مِّثْلِهِ وَادْعُوا شُهَدَاءَكُم مِّن دُونِ اللَّـهِ إِن كُنتُمْ صَادِقِينَ ﴿٢٣﴾ فَإِن لَّمْ تَفْعَلُوا وَلَن تَفْعَلُوا فَاتَّقُوا النَّارَ الَّتِي وَقُودُهَا النَّاسُ وَالْحِجَارَةُ ۖ أُعِدَّتْ لِلْكَافِرِينَ ﴿٢٤﴾}

{आणि आम्ही आमच्या सेवकावर जे अवतरित केले आहे याबद्दल जर तुम्हाला शंका असेल तर त्यासारखी एक सुरह तयार करा आणि हो अल्लाहशिवाय तुम्हाला शक्य असेल

त्याला मदतीसाठी बोलवून घ्या, जर तुम्ही सच्चे असाल (तर करूनच दाखवा).

मग जर तुम्ही तसे केले नाही आणि तुम्ही तसे करूच शकणार नाही, तर त्या आगीची भीती बाळगा ज्याचे इंधन माणसे आणि दगड आहेत आणि ती अविश्वासूंसाठी तयार केली गेली आहे. }(२४). सूरह अल-बकरा.

अल्लाहच्या या फर्मानावर लक्ष्य द्या

{لَّمْ تَفْعَلُوا وَلَن تَفْعَلُوا}

(जर तुम्ही असे करू शकले नाही, आणि तुम्ही ते कधीच करू शकणार नाही) (२४) सूरह अल-बकरा.

अर्थात : ते असे करू शकले नाही आणि ते त्यासाठी समर्थच नव्हते

महान कुरआन अजूनही बहुदेववादी आणि वक्तृत्ववादी लोकांच्या वक्तृत्वाला आव्हान देत आहे आणि या सर्व बाबतीत ते त्याचा सामना करण्यास असमर्थ आणि तत्सम सादर करण्यापासून दूर आहेत.

डॉ. अब्दुल्लाह दर्राज (अल्लाह त्यांच्यावर दया करो), असे म्हणतात: “पैगम्बरांना (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) या आव्हानाची भीती वाटली नसेल का की यामुळे त्यांचा साहित्यिक उत्साह वाढेल?

ते सर्व त्याच्याशी स्पर्धा करण्यासाठी धावतील आणि ते सर्व त्यासाठी सज्जच होते.

आणि जर त्यां्च्यी वक्तृात्वारच्याव एखाद्या गटाने त्याच्या तोडीचे काही वचने तयार केली असती, जरी काही ठराविक बाबतीत का असेना, तर?

तरी सुद्धा जर त्यांच्या आत्म्याने त्यांना त्यांच्या काळातील लोकांना हे आव्हान देण्यास भाग पाडले असेल तरी ते भविष्यातील पिढ्यांना हे आव्हान कसे काय देऊ शकतात?

हे असे साहस आहे की स्वतःची क्षमता जाणणारा व्यक्ती, नियतीचे उलटफेर आणि आकाशाच्या बातम्यांनी अवगत असल्याशिवाय कधीही त्यासाठी सरसावणार नाही. पण असेच आव्हान त्यांनी जगासमोर ठेवले, तो एक अंतिम निर्णय होता. युगानुयुगे त्याचा सामना करणाऱ्या प्रत्येकाला स्पष्ट असहाय्यता आणि अपयशाला सामोरे जावे लागले.[1]

या बहुदेववाद्यांनी पाहिले की अल्लाहच्या पैगम्बरांशी (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) लढण्यासाठी सैन्य एकत्र करणे आणि विविध पक्षांना तयार करणे, हे कुराणचा विरोध करण्यापेक्षा आणि कुराणाचे आव्हान स्वीकारण्यापेक्षा फारच सोपे आणि सोईचे आहे, आणि त्यांच्या सर्व प्रयत्नांचे हेच सार आहे.

{وَقَالَ الَّذِينَ كَفَرُوا لَا تَسْمَعُوا لِهَٰذَا الْقُرْآنِ وَالْغَوْا فِيهِ لَعَلَّكُمْ تَغْلِبُونَ}

{ आणि अविश्वासू लोक म्हणाले: हे कुराण ऐकू नका आणि त्यामध्ये विघ्न घाला जेणेकरून तुमचा विजय व्हावा.} (२६) सूरह फुस्सिलत.

---

[1] सहिह अल-बुखारी, हदीस : ४८५४.

सर्व अरब, किंवा ज्या राष्ट्रांना आव्हान करण्यात आले होते, ते नास्तिक आणि इतरांना दिलासा देणारे असे काही आणू शकले नाहीत.

अल-अलुसी (त्यांच्यावर अल्लाह दया करो) म्हणतात : "त्यांच्यापैकी कोणीही आजपर्यंत बोलले नाही, किंवा त्याने कोणतेही वर्णन किंवा गुणधर्म व्यक्त केले नाहीत."

जुबेर बिन मुतिम, ज्यांनी अद्याप इस्लाम स्वीकारला नव्हता, म्हणाले : मी पैगम्बरांना, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) मगरीब च्या नमाजीमध्ये सुरह तूर पठण करताना ऐकले आणि जेव्हा ते या वचनावर पोहोचले :

{أَمْ خُلِقُوا مِنْ غَيْرِ شَيْءٍ أَمْ هُمُ الْخَالِقُونَ ﴿٣٥﴾ أَمْ خَلَقُوا السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ ۚ بَل لَّا يُوقِنُونَ ﴿٣٦﴾ أَمْ عِندَهُمْ خَزَائِنُ رَبِّكَ أَمْ هُمُ الْمُصَيْطِرُونَ ﴿٣٧﴾}

ते शून्यातून निर्माण झाले होते किंवा ते स्वतःच निर्माते होते? (३५)

किंवा त्यांनी आकाश आणि पृथ्वी निर्माण केली आहे, नाही, त्यांना खात्री नाही (३६)

किंवा त्यांच्याकडे तुमच्या प्रभूचे खजिना आहेत की ते राज्यकर्ते आहेत? (३७) सुरह तूर.

ते म्हणतात : असे वाटत होते की माझे हृदय जणू उडून जाईल."[७९ ][1]

---

[1] सहिह अल-बुखारी, हदीस : ३९०५.

कुराणमध्ये आश्चर्यकारक रहस्ये आहेत जी मानवी आत्म्यापर्यंत पोहोचतात.

अबू बकर यांचे कुरआन पठण करते वेळेस बहुदेववाद्यांच्या स्त्रिया कशाप्रकारे त्यांच्या घराभोवती गर्दी करायच्या यावर विचार करा, कारण त्या इतक्या आकर्षित आणि प्रभावित झाल्या, की कुरैशचे पुरुष घाबरून गेले .[1]

म्हणून, अरब प्रतिनिधींनी एकमत केले की त्यांनी कुराण ऐकू नये आणि त्यांच्या कुटुंबीयांना ते ऐकवू नये, कारण अविश्वासु राहण्याचा हा एकमेव मार्ग आहे.

आणि पवित्र कुराणच्या आश्चर्यांमधून - आणि कुराणाचे आश्चर्ये संपणारे नाहीत - ते सुद्धा आहे जे अब्दुल्लाह दर्राज (त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो) यांनी कुराणाच्या आयतींचे विविध वेळेमध्ये अवतरित होण्याचे उल्लेख केले आहे, त्यांनतर अल्लाहच्या पैगम्बरांनी काही आयतींना एका सुरह मध्ये आणि काही आयातींना दुसऱ्या सुरह मध्ये लिहिण्याचे हुकूम दिले, शेवटी, प्रत्येक सुरह स्वतंत्र रचना म्हणून दिसते. ते म्हणतात: “कुराणच्या प्रकटीकरणाच्या वेळी, कुराणमध्ये काही मुद्दे होते जे इतर मुद्द्यांमध्ये जोडले गेले होते. एकांनंतर एक अवतरित होणाऱ्या आयतींच्या जोड्ल्यागेल्यांनतर ते स्वतंत्र रचना बनत गेले. काही आयती एका (सुरह) मध्ये सामील केल्या गेल्या तर दुसऱ्या काही दुसऱ्या सुरहच्या हिस्सा झाल्या. आणि हे सर्व पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा

---

[1] पवित्र कुराण पुस्तकाचा परिचय, दि. अब्दुल्ला दर्राज.

आणि शांती असो) यांच्या आज्ञेनुसार होत होते जे त्यांना अल्लाहचे दूत (जिब्राइल) यांच्या कडून मिळत होते.

जर आपण असंख्य तारखा विचारात घेतल्या - कुरआनच्या श्लोकांच्या प्रकटीकरणाच्या तारखा - आणि आपण लक्षात घेतो की हे प्रकटीकरण सामान्यत: विशेष परिस्थिती आणि प्रसंगांशी संबंधित होते, तरी हे आपल्याला प्रत्येक सुरहच्या स्वतंत्र रचनेमध्ये बदलणेच्या प्रक्रियेच्या वेळेबद्दल विचारण्यास प्रवृत्त करते.

जर आपण असंख्य तारखा विचारात घेतल्या - कुरआनच्या श्लोकांच्या प्रकटीकरणाच्या तारखा - आणि आपण लक्षात घेतो की हे प्रकटीकरण सामान्यत: विशेष परिस्थिती आणि प्रसंगांशी संबंधित होते, तरी हे आपल्याला प्रत्येक सुरहच्या स्वतंत्र रचनेमध्ये बदलणेच्या प्रक्रियेच्या वेळेबद्दल विचारण्यास प्रवृत्त करते.

जणू कुराण एका प्राचीन वास्तूचे विखुरलेले आणि मोजलेले तुकडे होते, ज्याची पुनर्बांधणी पूर्वीप्रमाणेच दुसऱ्या ठिकाणी करायची होती, अन्यथा ही तात्काळ आणि पद्धतशीर व्यवस्था एकाच वेळी अनेक सुरांच्या संदर्भात कशी स्पष्ट केली जाऊ शकते?

परंतु भविष्यातील घडामोडी, त्यांच्या विधायी आवश्यकता आणि त्यांच्यासाठी अपेक्षित उपाय, तसेच हे उपाय ज्या भाषिक स्वरूपात सादर केले जावेत आणि त्याऐवजी त्यांची शैलीत्मक सुसंगतता याविषयी अशी योजना विकसित

करताना एखादी व्यक्ती कोणती ऐतिहासिक हमी मिळवू शकते आणि एखाद्या सुरह च्या जागी दुसऱ्या सुरहाची शैलीत्मक सुसंगतता?

मग आपण असा निष्कर्ष काढू शकत नाही का की ही योजना पूर्ण होण्यासाठी आणि ती इच्छित रीतीने साकार करण्यासाठी एका महान निर्मात्याच्या हस्तक्षेपाची आवश्यकता होती, ज्याच्याकडे हा इच्छित समन्वय स्थापित करण्याची क्षमता असावी?"[1]

कुराण हा एक आश्चर्य आहे जो पैगम्बरांच्या (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) सत्यतेवर एक स्वतंत्र प्रमाण आहे.

प्रेषित मुहम्मद यांच्या तर्फे साकार झालेले चमत्कार (अशचर्ये) अनेक आहेत, जे एक हजाराहून अधिक आहेत,आणि त्यांचा काळ जवळचा आहे, आणि त्यातील प्रसारक लोकांमध्ये सर्वात खरे आणि सर्वात धार्मिक आहेत.

आणि ज्या कथनकारांनी हे आश्चर्ये आमच्यापर्यंत पोहोचवले त्यांना खोटे बोलण्याला वैध जाणत नव्हते, मग ते याबद्दल खोटे कसे बोलू शकतात, विशेषतः जेव्हा त्यांना माहित होते की जो कोणी त्यांच्याविरुद्ध जाणूनबुजून खोटे बोलतो, त्याने अग्नीत आपले स्थान पक्के समजावे, जसे की पैगम्बरांनी

---

[1] अल-बुखारी (१२१७), अल-बुखारी (२६१८), अल-बुखारी (३५७८), अल-बुखारी (४१०१), आणि अल-बुखारी (६४५२). या सर्व वेगवेगळ्या घटना आणि तथ्ये आहेत आणि हे एकट्या अल-बुखारीमध्ये आहे!

(त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) स्वतः तसा इशारा दिला आहे.

आणि त्याचे काही चमत्कार (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), त्यांच्या आजूबाजूला असलेल्या हजारो साथीदारांनी पाहिले, आणि त्यापैकी काही डझनभरांनी ते कथन केले, मग या सर्वांमध्ये ते सर्व खोटे बोलण्यावर एकमत कसे होऊ शकतात?

त्याच्या चमत्कारांचे एक उदाहरण, ज्यामध्ये मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते: झाडाच्या खोडाचे हुंदके देण्याची हदीस होय, जी एक सुप्रसिद्ध आणि मुतावतीर हदीस आहे, ज्यामध्ये आहे की पैगंबर (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) एका झाडाच्या खोडावर उपदेश देत असत जेव्हा आपलायसाठी एक मिम्बर (व्यासपीठ) तयार केले गेले आणि पैगम्बरांनी त्यावर उभे राहून प्रवचन देण्यास सुरुवात केली तर झाडाच्या खोदणे एखाद्या मुलाप्रमाणे हुंदके देण्यास सुरुवात केली आणि जो पर्यंत पैगम्बरांनी त्याजवळ जाऊन त्याला मिठी मारली नाही तो तसेच करत राहिला.

ही हदीस ज्या साथीदारांनी (सहाबांनी) वर्णन केली होती त्यामध्ये: अनस बिन मलिक, जबीर बिन अब्दुल्ला, अब्दुल्ला बिन अब्बास, अब्दुल्ला बिन ओमर, उबई बिन काब, अबी सईद, सहल बिन साद, आयशा बिंत अबी बकर आणि उम्म सलमा आहेत.

अशा बातम्यांच्या कथनात खोटे बोलण्यावर असे अनेक साथीदार एकमताने सहमत असतील का?

खरंच, त्यांचे काही चमत्कार तर हजारो साथीदारांनी पाहिले आहेत, जसे की त्यांच्या शुभ बोटांमधला पाण्याचा झरा ज्याद्वारे पंधराशे लोकांनी वजू केले पाणी प्यायले. ही हदीस मुतावतीर आहे आणि अल-बुखारी आणि मुस्लिम यांनी ते वर्णन केले आहे.

तसेच अल्प प्रमाणातील अन्न मोठ्या सैन्यासाठी पुरे होणे, हे देखील साथीदारांकडून वारंवार येत असलेल्या अहवालांद्वारे नोंदवले गेले आणि एकट्या अल-बुखारीने पैगंबराच्या हातून (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) अन्न वाढवण्याच्या चमत्कारांचा उल्लेख त्यांच्या पुस्तकामध्ये पाच जागी केला आहे.[८२ ][1]

जर सत्याचे इतके पुरावे आहेत आणि आश्चर्ये आणि चमत्कारांची विपुलता आहे तर मग एका समजदार व्यक्तीसाठी यासर्वांचा इन्कार करणे कसे शक्य आहे?

हे पैगंबर (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) च्या चमत्काराचे आणखी एक उदाहरण आहे:

पैगम्बरांनी (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) एक्या रात्री कळविले की खूप जोराचा वारा वाहणार आहे आणि लोकांना बाहेर उभे राहण्यास मनाई केली, पण एक

[1] सहिह मुस्लिम, हदीस : ३३१९.

व्यक्ती बाहेर पडली तर त्याला वाऱ्याने त्याच्या जागेवरून उचलून दूरवर फेकून दिले.[1]

आणि पैगम्बरांनी (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) इथिओपियाच्या बादशहा नज्जाशीच्या मृत्यूची बातमी त्याच्या मृत्यूच्याच दिवशी लोकांना दिली (जे त्या युगामध्ये शक्य नव्हते) आणि त्याची नमाज अदा केली..[2]

आणि प्रेषित (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांनी उमर, उस्मान, अली, तल्हा आणि जुबैर (अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न होवो) यांच्या बाबतीत सांगितले की हे सर्व लोकांप्रमाणे आपल्या बिछान्यावर मरणार नाहीत.

. झाले असे की एकदा पैगम्बर (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) आणि उमर, उस्मान, अली, तल्हा व जुबैर एका डोंगरावर चढले होते की अचानक दरड हादरू लागली, तरी प्रेषित (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) डोंगराला उद्देशून म्हणाले : "शांत हो, तुझ्या पाठीवर यावेळेस प्रेषित आहेत किंवा सिद्दीक (अत्यन्त विश्वासू) किंवा शहीद.[3]

त्यांनी स्वतःला प्रेषित सम्बोधले, अबू बकरला सिद्दीक (अत्यन्त विश्वासू) आणि इतर साठी हि भविष्यवाणी केली की ते

---

1 सहिह अल-बुखारी, हदीस : १३३३.
2 सहिह मुस्लिम, हदीस : २४१७.
3 या हदीस सईद बिन अब्दुलकादिर बाशनफर यांनी त्यांच्या 'दलाईल अल-नुबुवह' या पुस्तकात गोळा केल्या आहेत, आणि हे पुस्तक दार इब्न हझमच्या प्रकाशनातून आहे.

शहीद होतील, आणि तसेच घडले जसे प्रेषितांनी (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) सांगिलते होते.

तसेच अशा १५० हदीस आहेत ज्यात प्रेषितांनी (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) अल्लाहकडे प्रार्थना केली आणि त्वरित ती दुआ कबूल झाली आणि लोक त्याचे साक्षीदार झाले.[1]

आणि जेव्हा मक्काच्या लोकांनी अल्लाहच्या प्रेषितांना काही निशाणी दाखविण्याचे आव्हान केले तर त्यांनी चंद्राचे दोन भाग त्यांना दाखविले, इतके स्पष्ट की "हिरा डोंगराच्या" दोन बाजूला ते दोन भाग लोकांनी पहिले. ही हदीस मुतावतीर आहे, म्हणजे ते सत्यतेच्या सर्वोच्च प्रमाणात आहे.

पैगंबर, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) शुक्रवार आणि ईद सारख्या लोकांच्या मोठ्या मेळाव्या वेळी सूरह अल-कमर -ज्यामध्ये चन्द्राच्या विभाजनाचे उल्लेख आहे - चे पठण करीत असत जेणेकरून लोकांना पैगम्बरांनी प्रस्तुत केलेल्या चमत्काराबाबत कळावे. त्याचा उपयोग त्यांनी आपल्या प्रेषित होण्याची सत्यता सिद्ध करण्यासाठी केला.

मग प्रेषितांनी (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) ही बातमी दिली की आदम हे सजीव निर्मितीमध्ये

[1] सहिह अल-जामेअ, ८१८८.

सर्वशेवट आहेत. (अल्लाह ने) त्यांना शुक्रवारी सर्वशेवट निर्माण केले.[1]

ही वस्तुस्थिती आता वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाली आहे. विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की मानव हा पृथ्वीवर दिसणारा शेवटचा जिवंत प्राणी आहे, मग पैगम्बरांना (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), आदम (त्यांच्यावर शांती असो), हे पृथ्वीवर वनस्पती आणि प्राणी यांच्या नंतर शेवटचे प्राणी होते हे कसे कळले?

तर सर्वशक्तिमान अल्लाहचे शब्द पहा

{وَجَعَلْنَا اللَّيْلَ وَالنَّهَارَ آيَتَيْنِ ۖ فَمَحَوْنَا آيَةَ اللَّيْلِ وَجَعَلْنَا آيَةَ النَّهَارِ مُبْصِرَةً}

{आणि आम्ही रात्र आणि दिवसाला दोन चिन्हे बनवली, मग आम्ही रात्रीचे चिन्ह पुसून टाकले आणि दिवसाचे चिन्ह दृश्यमान केले. (१२) सुरह अल-इस्रा.

म्हणून आम्ही रात्रीचा चिन्ह मिटवला: म्हणजे, चंद्र, जो रात्रीचा चिन्ह आहे, चमकत होता, नंतर त्याचा प्रकाश मिटविला गेला.

आणि साहाबांनी हेच अर्थ या आयतीचे लावले आहे. इमाम इब्न कसीर त्यांच्या व्याख्येमध्ये सांगितले की अब्दुल्ला बिन अब्बास, (अल्लाह त्यांच्याशी राजी होवो), म्हणाले: "चंद्र सूर्यासारखा चमकत होता, आणि तो रात्रीचा चिन्ह आहे. मग तो पुसला गेला.

---

1 http://www.nasa.gov/mission_pages/LRO/news/vid-tour.html https://www.youtube.com/watch?v=UIKmSQqp8wY

विचित्र गोष्ट अशी आहे की आज नासाने त्याच्या अधिकृत वेबसाइट आणि अधिकृत चॅनेलवर प्रकाशित केलेल्या विज्ञानाने हा निष्कर्ष काढला आहे: चंद्राच्या जीवनाचे पहिले युग, जेव्हा ते चमकत होते.[1]

अखंड प्रसाराद्वारे हे सिद्ध होते कि अदृश्यय गोष्टींबाबतच्या आयती आणि बातम्या आणि पृथ्वी आणि आकाशातील सूक्ष्म रहस्ये - जे अगणित आहेत - एका माणसाच्या हातून सादर झाले (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), आणि त्यांच्यावर कुराण प्रकट झाले, आधीच्या प्रेषितांच्या शिकवणीवर आधारित धर्म त्यांनी सादर केला, अल्लाह ची मदत त्यांना लाभली आणि त्यांच्या मरणापूर्वी शरियत परिपूर्ण झाली.

हे सर्व तर्क देतात की नक्कीच ते एक संदेष्टा आणि पैगम्बर आहेत!

अदृश्यांबाबत त्यांची वचने (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), हजाराहून अधिक आहेत.

आणि त्यांच्याकरवी सादर आश्चर्ये आणि चमत्कारांचे बयान करणारे त्यांचे साथीदार, सहाबा आहेत, जे सृष्टीतील सर्वात खरे आणि त्यांच्या नंतरचे लोकांपेक्षा सर्वात नीतिमान आहेत.

विचित्र गोष्ट अशी आहे की मोठ्या साहाबांनी चमत्कार व आश्चर्ये पाहण्याआधीच इस्लाम स्वीकारला. त्यांनी इस्लाम

---

[1] प्रूफ ऑफ प्रोफेसीज इन रिझन अँड ट्रॅडिशन, इब्न तैमिया, दार इब्न अल-जौझी , पृ. ५७३, आणि त्याच स्रोतातील समअर्थी, पृ. ३१८.

स्वीकारला कारण त्यांना माहित होते की प्रेषित मुहम्मद, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) सत्यवादी आहेत आणि ते कधीही खोटे बोलले नाहीत.

वरिष्ठ साहाबांची ही स्थिती एक शहाणपणाची स्थिती आहे. पैगम्बरांचा सत्यवादीपणा (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) त्यांची प्रेषितता सिद्ध करण्यासाठी पुरेसा आणि स्वतंत्र पुरावा होता... याचे कारण की : जो व्यक्ती प्रेषिततेचा दावा करतो तो एकतर लोकांमध्ये सर्वात सत्यवान असेन, कारण तो एक संदेष्टा आहे... आणि पैगंबर लोकांमध्ये सर्वात सत्य होते.

किंवा तो लोकांमध्ये सर्वात खोटा असेन कारण त्याने सर्वात महत्वाच्या गोष्टींबद्दल खोटे दावे केले आहे.

आणि नितांत अज्ञानी लोकांशिवाय कोणीही अति सत्यवान व अति खोटारड्या इसमांमध्ये सरमिसळ करणार नाही.[1]

शहाण्या माणसाला खरे लोक आणि सर्वात फसवे लोक यांच्यात फरक करणे किती सोपे असते.

बहुदेववाद्यांनी त्यांच्या मिशनच्या पहिल्या दिवशीच कबूल केले की, मोहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) कधीही खोटे बोलले नाही, म्हणून ते त्यांना म्हणाले: "आम्ही तुझ्याकडून कधीच खोटे ऐकले नाही."[2]

1 सहिह अल-बुखारी, हदीस: ४९७१.
2 सहिह अल-बुखारी, हदीस : ७.

आणि जेव्हा हेराक्लियसने अबू सुफियानला त्यांच्या इस्लाम स्वीकारण्यापूर्वी विचारले: "त्याने जे दावे केले त्या आधी त्याच्यावर खोटे बोलण्याचे आरोप आहेस का?"

अबू सुफयान म्हणाले : "नाही."

हेराक्लियस म्हणाला, "देवाबद्दल खोटे बोलणाऱ्याने लोकांशी खोटे बोलणे सोडले नसते."

मग हेराक्लियस त्याचे प्रसिद्ध वाक्य उद्गारत म्हणाला होता : "जर मी त्याच्याजवळ असतो तर मी त्याचे पाय धुतले असते."

अविश्वासू लोक त्यांच्या संपूर्ण आयुष्यात एक खोटे उघड करू शकले नाहीत, (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), आणि म्हणूनच कुराणने त्यांच्या प्रेषित होण्याच्या आधीच्या स्थितीबद्दल लोकांना माहिती असूनही त्यांच्यावर अविश्वास दाखविल्याची निंदा केली.

{أَمْ لَمْ يَعْرِفُوا رَسُولَهُمْ فَهُمْ لَهُ مُنكِرُونَ}

{किंवा, काय ते त्यांच्या प्रेषिताला ओळखत नाहीत, म्हणून त्याला नाकारतात?} (६९) सुरह अल-मुमिनून.

पैगम्बरांची स्थिती आणि त्यांचे चरित्र हे त्यांचे पैगंबर असल्याचा स्वतंत्र पुरावा आहे

(त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो).

जर प्रामाणिकपणाची कारणे सामान्यतः त्यांच्या प्रेषित होण्याला समर्थन देणारी असतील (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो), तर एक विवेकी हिंदू हे सर्व कसे नाकारू शकेल?

**२१ - काही हिंदूंप्रमाणे अल्लाहवर विश्वास ठेवणे आणि पैगंबरांवर अविश्वास ठेवणे चालेल का?**

उः नाही.

पैगंबरांवर विश्वास नसताना ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवणे पुरेसे नाही जो पर्यंत तो पूर्णतः अल्लाहवर विश्वास ठेवत नाही, जर एक व्यक्ती अल्लाहवर विश्वास ठेवत असेल की तोच निर्माता आहे, अन्नदाता आहे, विश्वाचा सूत्रधार आहे आणि ईश्वरवाणीचा व त्याच्या प्रेषितांच्या इन्कार करत असेल तर याचा अर्थ काय?

हा तर अतिअविश्वास आहे.

खरं तर, देवाच्या प्रकटीकरणाला विरोध करण्यापेक्षा कोणताही मोठा गुन्हा नाही, अल्लाह सर्वशक्तिमान म्हणाला

{إِنَّ الَّذِينَ يَكْفُرُونَ بِاللَّـهِ وَرُسُلِهِ وَيُرِيدُونَ أَن يُفَرِّقُوا بَيْنَ اللَّـهِ وَرُسُلِهِ وَيَقُولُونَ نُؤْمِنُ بِبَعْضٍ وَنَكْفُرُ بِبَعْضٍ وَيُرِيدُونَ أَن يَتَّخِذُوا بَيْنَ ذَٰلِكَ سَبِيلًا ﴿١٥٠﴾ أُولَـٰئِكَ هُمُ الْكَافِرُونَ حَقًّا ۚ وَأَعْتَدْنَا لِلْكَافِرِينَ عَذَابًا مُّهِينًا ﴿١٥١﴾}

१५०. जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांवर ईमान राखत नाहीत आणि असे इच्छितात की अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांच्या दरम्यान दुरावा निर्माण करावा आणि म्हणतात की आम्ही काहींना मानतो आणि काहींना मानत नाही. आणि याच्या दरम्यान एक वेगळा मार्ग काढू इच्छितात.

१५१. निःसंशय, हे सर्व लोक पक्के अविश्वासू आहेत आणि अशा इन्कारी लोकांसाठी आम्ही अतिशय कठोर शिक्षा-यातना तयार करून ठेवली आहे. सुरह अन-निसा.

जो कोणी देवावर विश्वास ठेवतो आणि पैगंबरांवर अविश्वास ठेवतो तो खरोखर काफिर (अविश्वासू) आहे.

म्हणून संदेष्ट्यांपैकी जो कोणी एकाही पैगंबरावर अविश्वास ठेवतो तो अल्लाहवर अविश्वास करणारा असतो कारण त्याने देवाचे प्रकटीकरण नाकारले आहे. म्हणूनच, पुस्तकप्राप्त लोकांमधून यहूदी आणि ख्रिश्चनांनी अविश्वास केला कारण त्यांनी मुहम्मद बिन अब्दुल्लाह (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांच्या प्रेषित होण्यावर अविश्वास ठेवला.

{إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ أَهْلِ الْكِتَابِ وَالْمُشْرِكِينَ فِي نَارِ جَهَنَّمَ خَالِدِينَ فِيهَا ۚ أُولَـٰئِكَ هُمْ شَرُّ الْبَرِيَّةِ}

६. निःसंशय, जे लोक ग्रंथधारकांपैकी इन्कारी झाले. आणि अनेकेश्वरवादी, सर्वच्या सर्व जहन्नमच्या आगीत (जातील), ज्यात ते नेहमी (नेहमी) राहतील. हेच लोक निर्मिती मध्ये सर्वांत वाईट ठरले. (६) सूरह अल-बय्यीनाह.

आणि ते नरकात जातील हे देवाचे वचन खरे आहे.

{فَحَقَّ وَعِيدِ}

{तरी त्याची धमकी सत्य ठरणार आहे.} (१४) सूरह काफ.

तरी केवळ मनुष्याचे हे मानणे की अल्लाह, तोच निर्माता, प्रदाता, जीवन देणारा आणि मृत्यू देणारा आहे, इस्लाम नाही आणि त्याने नर्कापासून मोक्ष ही प्राप्त होणार नाही. परंतु त्याच्या संदेशवाहकांवर विश्वास देखील जरुरी आहे.

म्हणून, देवाच्या अस्तित्वावर विश्वास आणि संदेष्ट्यांवर अविश्वास पुरेसा नाही आणि पुनरुत्थानाच्या दिवशी सेवकाला अल्लाहसमोर फायदा देणार नाही, कारण त्याने अल्लाहची उपासना केली पाहिजे आणि त्याच्या सर्व दूतांवर पूर्ण विश्वास ठेवला पाहिजे.

आणि जर देवाच्या अस्तित्वावर विश्वास पुरेसा असता, तर देवाने त्याचे दूत पाठवले नसते किंवा त्याची पुस्तकेही अवतरित केली नसती, कारण सर्व मानव देवाला अंतःप्रेरणेने ओळखतात.

तरी अल्लाह, ज्याने तुम्हाला निर्माण केले, तुम्हाला मार्गदर्शन केले आणि तुमची तरतूद केली, तो एकटाच उपासनेस पात्र आहे जसे त्याच्या दूत आणि संदेष्ट्यांच्या कायद्यानुसार ठरले.

म्हणून सर्व संदेष्टे आणि त्या सर्वांचे शेवट, मुहम्मद बिन अब्दुल्लाह (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांच्यावर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

### २२- अल्लाहने वाईट का निर्माण केले? किंवा दुसऱ्या शब्दांत: मुस्लिम "वाईटाच्या कोंडीला" कसा प्रतिसाद देतो?

उत्तर: दुष्कर्माची परीक्षा ही हिंदू धर्मातील जवळजवळ सर्वात मोठी समस्या आहे आणि हिंदू धर्माचे तत्वज्ञान असे आहे की जोपर्यंत माणूस वाईटापासून मुक्त होत नाही तोपर्यंत तो विनाशात जगतो, आणि हिंदू धर्म मानतो की पुनर्जन्म एखाद्या व्यक्तीने मागील जन्मात केलेल्या दुष्कृत्यामुळे होते.

हे सर्व चुकीचे आहे. जगात वाईट गोष्टी सहज उपलब्ध आहेत: कारण आपण जबाबदार आहोत.

कारण आपण परीक्षेच्या जगात आहोत.

आपला सर्वशक्तिमान पालनकर्ता म्हणाला

{وَنَبْلُوكُم بِالشَّرِّ وَالْخَيْرِ فِتْنَةً}

आणि आम्ही तुमची परीक्षा वाईट आणि चांगल्याने करू. (३५) सुरह अल-अंबिया.

चांगले आणि वाईट कारण तुम्हाला जबाबदार ठरविले गेले आहे, आणि जबाबदारी हाच तुमच्या अस्तित्वाचा उद्देश आहे.

अल्लाह ने म्हटले

{الَّذِي خَلَقَ الْمَوْتَ وَالْحَيَاةَ لِيَبْلُوَكُمْ أَيُّكُمْ أَحْسَنُ عَمَلًا وَهُوَ الْعَزِيزُ الْغَفُورُ}

{ज्याने मरण आणि जीवन निर्माण केले, हे तपासण्यासाठी की तुमच्यापैकी कोण कृतीत श्रेष्ठ आहे, आणि तो पराक्रमी, क्षमा करणारा आहे} (२) सुरह अल-मुल्क.

जेव्हा आपण जबाबदार ठरलो तर प्रलोभन आणि आपत्ती येणं स्वाभाविक आहे आणि त्याला आपण आपल्यासाठी वाईट समजणं हेही स्वाभाविकच आहे.

वाईट, काही वेदना, आणि अवज्ञा करण्याची क्षमता ही नैसर्गिक गरज आहे आणि स्वतंत्र इच्छा आणि दैवी आदेशाचा स्पष्ट परिणाम आहे.

वाईट, संकटे, दुर्दैव आणि वासना यांची उपस्थिती चांगल्या व्यक्तीचे सर्वोत्तम आणि भ्रष्ट व्यक्तीचे सर्वात वाईट बाहेर आणते.

वाईटाव्यतिरिक्त, आपण असंख्य चांगले जगतो.

आणि देणग्या अगणित आहेत.

वाईट हे सहज उपलब्ध असते आणि आपण ज्या अनंत चांगल्या गोष्टी करत राहतो त्याच्या बरोबरीने पुढे धावत असते.

जर जगात वाईट नसते, तर मी जिथे जन्मलो ते ठिकाण सोडले नसते!

आणि जेव्हा एक सभ्यता होती, आणि कोणतीही शहरे, कारखाने किंवा घरे बांधली गेली नव्हती, आणि लोकांना कामाची गरज नव्हती, आणि लोकांनी रोगाचा प्रतिकार करण्याचा, समस्या सोडवण्याचा किंवा आराम देण्यासाठी कल्पना शोधण्याचा विचार केला नव्हता!

आणि जेव्हा एखाद्या व्यक्तीला त्याच्या जन्माच्या ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची आवश्यकताच नव्हती.

तर कोणतेही वाईट, संकट, आपत्ती, थकवा किंवा समस्या नव्हती ज्यासाठी आपण उपाय शोधावे!

मग थकवा, उशिरापर्यंत जागणे, विचार करणे आणि काम करणे का लागावे?

तरी वाईट ही त्या गरजेमुळे आहे जी या जगात अपरिहार्य आहे!

जरा विचार करा!

पुष्कळ लोक आपत्ती व दुष्कृत्ये सहन करतात, म्हणून ते देवाकडे फिरतात आणि नीतिमान बनतात. महान अल्लाहचा गौरव असो आणि त्याची स्तुती असो.

देवाच्या सर्व पूर्वनिश्चितीमध्ये शहाणपण आणि चांगुलपणा आहे, जरी त्यापैकी काही बाह्यतः वाईट, त्रास किंवा हानी असल्यासारखे दिसत असले तरी शेवटी, ते महान चांगल्या आणि गहन दैवी ज्ञानाने वेढलेले आहेत.

तरी वाईट आहे कारण तुम्ही जबाबदार आहात, तुम्ही मागील जन्मात पाप केले म्हणून नाही.

**२३ - सर्वशक्तिमान अल्लाहच्या अधीन होण्याची निशाणी काय आहेत? किंवा दुसऱ्या शब्दांत: तुम्हाला कसे कळेल की तुम्ही अल्लाहचे मानणारे आहात आणि त्याला पूर्णपणे शरण गेले आहात?**

उत्तर: सर्वशक्तिमान अल्लाहला शरण जाण्याची चिन्हे चार आहेत:

प्रथम: आपल्या जीवनातील प्रत्येक लहान-मोठ्या गोष्टीत देवाची आज्ञापालन करा, सर्वशक्तिमान (अल्लाह) ने म्हटले

{قُلْ إِنَّ صَلَاتِي وَنُسُكِي وَمَحْيَايَ وَمَمَاتِي لِلَّـهِ رَبِّ الْعَالَمِينَ ﴿١٦٢﴾ لَا شَرِيكَ لَهُ ۖ وَبِذَٰلِكَ أُمِرْتُ وَأَنَا أَوَّلُ الْمُسْلِمِينَ ﴿١٦٣﴾}

सांग की माझी प्रार्थना, माझे बलिदान, माझे जीवन आणि माझे मरण हे सर्व जगाचा स्वामी अल्लाह साठीच आहे. (१६२)

त्याचा कोणीही भागीदार नाही, आणि मला तशी आज्ञा देण्यात आली आहे आणि मी सर्वप्रथम आज्ञाधारक (मुस्लिम) आहे. (१६३) (सुरह अल-अनआम)

माझी प्रार्थना, माझे बलिदान, माझे जीवन आणि माझे मरण हे सर्व जगाचा प्रभु अल्लाहसाठी आहे: मी जे काही करतो ते देवासाठी आहे, आणि प्रत्येक कृतीत ईश्वराची सेवा आहे, आणि ही अल्लाहच्या अधीनतेची पहिली निशाणी आणि चिन्हे आहेत.

.

जोपर्यंत तुम्ही पूर्णपणे अल्लाहला शरण जात नाही तोपर्यंत दुसरे चिन्ह: अल्लाहने आज्ञा दिलेल्या गोष्टींचे पालन करणे आणि त्याने मनाई केलेल्या गोष्टी टाळणे हे आहे. आमला पालनकर्ता, त्याचा गौरव असो, म्हणतो

{يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا أَطِيعُوا اللَّـهَ وَرَسُولَهُ وَلَا تَوَلَّوْا عَنْهُ وَأَنتُمْ تَسْمَعُونَ}

{हे श्रद्धावानांनो, अल्लाहची आणि त्याच्या दूताची आज्ञा पाळा आणि ऐकत सुनत असताना त्याच्यापासून दूर जाऊ नका. (२०) सुरह अल-अन्फाल.

सर्वशक्तिमान म्हणाला

{يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا ادْخُلُوا فِي السِّلْمِ كَافَّةً}

{हे विश्वासणाऱ्यांनो, तुम्ही सर्व शांततेत (इस्लाम मध्ये) पूर्णतः दाखल व्हा. (२०८) सुरह अल-बकरा

शांततेत म्हणजे : इस्लाममध्ये.

तुम्ही सर्वांनी शांततेत प्रवेश करा (पूर्णतः इस्लाम स्वीकारा) : म्हणजेच अल्लाहने सांगितलेल्या सर्व गोष्टींचे पालन करा आणि त्याने ज्या गोष्टी मना केल्या आहेत त्यापासून दूर राहा.

देवाने मला कुराणमध्ये जे काही करण्याची आज्ञा दिली आहे किंवा मला त्याच्या प्रेषिताच्या (त्यांच्यावर अल्लाह ची

कृपा आणि शांती असो) सुन्नत (हदीस) मध्ये जे काही करण्याची आज्ञा दिली आहे, ते मी करावे.... त्याने मला जे काही करण्यास मनाई केली आहे त्यापासून मी दूर राहिले पाहिजे. हे देवाला पूर्ण समर्पण आणि अधीनता आहे.

देवाच्या अधीन होण्याचे तिसरे चिन्ह आहे:

आम्ही कुराण आणि प्रेषित मुहम्मद (त्यांच्यावर अल्लाह ची कृपा आणि शांती असो) यांच्या सुन्नतीतील प्रत्येक दैवी कायदे स्वीकारतो, कारण अल्लाहला माहित आहे की त्याच्या निर्मितीसाठी काय योग्य आहे.

{أَلَا يَعْلَمُ مَنْ خَلَقَ وَهُوَ اللَّطِيفُ الْخَبِيرُ}

{बरे काय तोच जाणणार नाही ज्याने निर्माण केले, तो तर अत्यंत सूक्ष्मदर्शी आणि खबर राखणाराही आहे.} (१४) सुरह अल-मुल्क.

सर्वशक्तिमान अल्लाह ने म्हटले

{وَمَنْ أَحْسَنُ مِنَ اللَّـهِ حُكْمًا}

{आणि अल्लाहपेक्षा कोणाचा निर्णय चांगला आहे. (५०) सुरह अल-माइदा.

या जगात आणि परलोकात लोकांसाठी काय चांगले आहे हे अल्लाहला माहीत आहे.

अल्लाहच्या नियमांचे पालन लोकांना शुद्ध करतो आणि त्यांना सुरक्षिततेने जगण्याची हमी देतो.

सर्वशक्तिमान अल्लाह म्हणाला

{وَمَا أَرْسَلْنَا مِن رَّسُولٍ إِلَّا لِيُطَاعَ بِإِذْنِ اللَّـهِ}

{आणि आम्ही प्रत्येक पैगंबर केवळ यासाठी पाठविला की अल्लाहच्या आदेशान्वये, त्याच्या आदेशाचे पालन केले जावे.} (६४) (६४) सुरह निसा.

देवाने संदेशवाहकांना पाठवले नाही जोपर्यंत आपण त्यांचे नियम सोडून इतरांच्या कायद्याचा अवलंब केला नाही.

अल्लाह ने म्हटले

{فَلَا وَرَبِّكَ لَا يُؤْمِنُونَ حَتَّىٰ يُحَكِّمُوكَ فِيمَا شَجَرَ بَيْنَهُمْ ثُمَّ لَا يَجِدُوا فِي أَنفُسِهِمْ حَرَجًا مِّمَّا قَضَيْتَ وَيُسَلِّمُوا تَسْلِيمًا}

{नाही, तेव्हा शपथ आहे तुमच्या पालनकर्त्याची, हे लोक (तोपर्यंत) ईमानधारक होऊ शकत नाही, जोपर्यंत सर्व आपसातील मतभेदात तुम्हाला न्याय-निवाडा करणारा स्वीकारीत नाही, मग जो फैसला तुम्ही कराल, त्यावर मनातून नाराजही नसावेत आणि आज्ञाधारकाप्रमाणे त्यांनी तो मान्य करून घ्यावा.} (६५) (६५) सुरह अन-निसा.

आपण देवाच्या कायद्याला पूर्णपणे अधीन केले पाहिजे, कारण अल्लाहच्या कायद्याचे अधीन होणे हे इस्लामच्या अधीन होण्याच्या लक्षणांपैकी एक आहे!

सर्वशक्तिमान अल्लाहच्या अधीन होण्याचे चौथे चिन्ह : अल्लाहच्या पूर्वनियतीला अधीन राहणे, कारण सर्व काही सर्वशक्तिमान देवाने त्याच्या बुद्धीने पूर्वनियोजित केले आहे, आणि म्हणून मुस्लिम त्याच्या सर्व आज्ञांमध्ये ... चांगल्या आणि वाईटात देवाच्या अधीन असतो.

जर मुस्लिमावर समृद्धी आली तर तो कृतज्ञ होतो आणि जर त्याच्यावर आपत्ती आली तर तो धीर धरतो.

तरी प्रत्येक दुःख हे एखाद्या उद्देशाने व जबाबदारीमुळे येते.

सर्व काही सर्वशक्तिमान अल्लाहने ठरवले आहे: आरोग्य, आजारपण, संपत्ती, दारिद्य... सर्व काही त्याच्या निर्णयानुसार आणि उद्देशानुसार आहे म्हणून मुस्लिमाने पूर्वनियोजिततेवर समाधानी असणे आवश्यक आहे कारण अल्लाहने ते ठरविले आहे.

अल्लाहने म्हटले

{إِنَّا كُلَّ شَيْءٍ خَلَقْنَاهُ بِقَدَرٍ}

{निसंदेह, प्रत्येक गोष्ट आम्ही पूर्वनियोजितपणे निर्माण केली आहे} (४९) सुरह अल-कमर.

अल्लाहने म्हटले

{قُل لَّن يُصِيبَنَا إِلَّا مَا كَتَبَ اللَّـهُ لَنَا}

{सांगून टाका : अल्लाहने आमच्यासाठी जे ठरवले आहे त्याशिवाय आम्हाला काहीही होणार नाही.} (५१) सुरह अत-तौबाह.

अल्लाहने आपल्यासाठी जे ठरवले आहे तेच आपल्या बाबतीत घडेल.

अल्लाहने म्हटले

{وَمَا كَانَ لِنَفْسٍ أَن تَمُوتَ إِلَّا بِإِذْنِ اللَّـهِ}

{आणि अल्लाह च्या परवानगीशिवाय कुणी मरू ही शकत नाही.} (१४५) सुरह आल-इम्रान.

जीवनाची मुदत अल्लाहने ठरवलेली आहे.

विश्वात घडणारी प्रत्येक गोष्ट, जगात फिरणारा प्रत्येक अणू आणि घडणारी प्रत्येक घटना अल्लाहच्या ज्ञानाने, अल्लाहच्या इच्छेने, अल्लाहच्या आज्ञेने, अल्लाहच्या बुद्धीने आणि अल्लाहच्या सामर्थ्याने घडते.

आपले सर्वशक्तिमान प्रभु म्हणाले

{وَخَلَقَ كُلَّ شَيْءٍ فَقَدَّرَهُ تَقْدِيرًا}

{आणि त्याने सर्व काही निर्माण केले आणि ते संपूर्णपणे व्यवस्थित केले.} (२) सुरह अल-फुरकान.

तरी, त्याने, त्याचा गौरव असो, सर्व काही निर्माण केले आणि सर्वकाही व्यवस्थित केले, आणि त्याने जे इच्छिले ते झाले आणि जे त्याने नाही इच्छिले ते नाही झाले.

एक मुस्लिम म्हणून, मला सर्वशक्तिमान अल्लाहच्या सर्व आज्ञांचे पालन करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे, एखादी व्यक्ती अल्लाहची मानणारी (मुस्लिम) बनते.

अशा प्रकारे, एखादी व्यक्ती अल्लाहची मानणारी (मुस्लिम) बनते.

### शेवटी! मी इस्लाममध्ये प्रवेश कसा करू शकतो?

इस्लाम हा अल्लाहचा धर्म सर्व मानवांसाठी आहे.अल्लाह म्हणाले

{إِنَّ الدِّينَ عِندَ اللَّـهِ الْإِسْلَامُ}

{निसन्देहः, अल्लाहजवळ (मान्य) धर्म इस्लाम आहे} (१९) सुरह आल-इम्रान.

इस्लाम हा असा धर्म आहे ज्याशिवाय इतर धर्म अल्लाह स्वीकारत नाही

{وَمَن يَبْتَغِ غَيْرَ الْإِسْلَامِ دِينًا فَلَن يُقْبَلَ مِنْهُ وَهُوَ فِي الْآخِرَةِ مِنَ الْخَاسِرِينَ}

{आणि जो कोणी इस्लाम सोडून दुसरा धर्म शोधतो, तो त्याच्याकडून स्वीकारला जाणार नाही आणि तो परलोकात नुकसान सोसणाऱ्यांमध्ये असेल.} (८५) सुरह आल-इम्रान.

त्यामुळे प्रत्येक हिंदू आणि गैर हिंदूने इस्लाम स्वीकारला पाहिजे.

इस्लाममध्ये, अग्नि (नरक) पासून मुक्ती आणि अल्लाहची प्रसन्नता व स्वर्गप्राप्तीचा विजय आहे.

इस्लाममध्ये प्रवेश करणे ही सर्वात मोठी देणगी आहे, नव्हे तर ते तुमच्या अस्तित्वातील सर्वात मोठी आणि सर्वात महत्वाची गोष्ट आहे.

आणि इस्लाम हे खरे तर अंतःप्रेरणा, तर्क आणि वेदाकडे परत येणे आहे.

इस्लाममध्ये प्रवेश करणे सोपे आहे आणि त्याला धार्मिक विधी किंवा अधिकृत बाबींची आवश्यकता नाही, एका व्यक्तीला फक्त दोन साक्ष द्याव्या लागतील, ते असे सांगत की : मी साक्ष देतो की अल्लाहशिवाय कोणीही पूज्य नाही आणि मी साक्ष देतो की मुहम्मद अल्लाहचे दूत (प्रेषित) आहेत.

आणि यासह तो मुसलमान झाला.

मग तो इस्लामचे पालन करू लागतो.

या साठी मी इस्लाम हाऊस वेबसाइटचे अनुसरण करण्याची शिफारस करतो, जेणेकरून नवीन मुस्लिम आपल्या भाषेनुसार इस्लामचे पालन कसे करावे हे शिकेल.

वेबसाइट लिंक: https://islamhouse.com/ar/

# Index


हिंदू धर्म त्याच्या मूळ शिकवणी, तर्क आणि सामान्य ज्ञानाच्या समतोलात 2
१- हिंदू धर्म म्हणजे काय? 11
२- या गुंतागुंतीतून हा धर्म कसा निर्माण झाला? 12
३ - हिंदूंची श्रद्धा नक्की काय आहे? 13
४- अनेकोनेक मूर्तीसह एका देवाचे प्रतिनिधित्व करण्याची कल्पना हिंदू धर्मात कशी आली? 17
५- निर्माता आणि निर्माण यांच्यातील नातेसंबंधाकडे हिंदू कसे पाहतात? 20
६- हिंदू धर्म जीवन आणि मृत्यूकडे कसा बघतो? 27
७ - हिंदूंमध्ये पुनर्जन्म आणि आत्म्याचे स्थलांतर या कल्पनेचा स्रोत काय आहे? 33
८- हिंदू ब्रह्मांडाकडे कसे बघतात? 36
९- हिंदू धर्मानुसार मानवी शरीर कशाने बनते? 37
हिंदू समाज आहे तरी काय? 42
11- हिंदू खरेच गायींची पूजा करतात का? 48
12- पण हिंदू धर्मात त्यागभावना खूप आहे आणि पापापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला जातो, हे एक वैशिष्ट्यपूर्ण गुण नाही का? 50
13- पण पूर्ण शांतता आणि ध्यानधारणा ही हिंदू धर्माची चांगली गोष्ट नाही का? 52
१४- सध्याच्या हिंदू धर्मात आढळते तसे एकांतवासात निघून जाण्यात गैर काय आहे? 55
१५- वासनेचा प्रतिकार करण्याचा आणि पापांपासून मुक्त होण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता आहे? 57
१६ - इस्लाम हिंदू धर्म का नाकारतो? 60

१७ - प्रत्येक हिंदूने इस्लाम का स्वीकारावा? ....................................................65
१८ - इस्लाम म्हणजे काय?..........................................................................................81
१९ - ज्या प्रश्नांची उत्तरे देताना मन गोंधळून जातो त्या प्रश्नांना इस्लाममध्ये उत्तर आहे का: आपण कोठून आलो? आपण या जगात का आहोत? आणि पुढे कुठे जाणर आहोत?...........................................................................83
२० - तुम्हाला कसे कळले की मुहम्मद, देवाच्या प्रार्थना आणि त्याच्यावर शांती असो, देवाचा दूत आहे?.........................................................................85
२१ - काही हिंदूंप्रमाणे अल्लाहवर विश्वास ठेवणे आणि पैगंबरांवर अविश्वास ठेवणे चालेल का? ......................................................................................101
२२- अल्लाहने वाईट का निर्माण केले? किंवा दुसऱ्या शब्दांत: मुस्लिम "वाईटाच्या कोंडीला" कसा प्रतिसाद देतो?....................................................103
२३ - सर्वशक्तिमान अल्लाहच्या अधीन होण्याची निशाणी काय आहेत? किंवा दुसऱ्या शब्दांत: तुम्हाला कसे कळेल की तुम्ही अल्लाहचे मानणारे आहात आणि त्याला पूर्णपणे शरण गेले आहात?.........................................106
शेवटी! मी इस्लाममध्ये प्रवेश कसा करू शकतो? ......................................111

mr216v1.0 - 03/09/2026